मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत**.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

नवभारत

वर्ष १६ वे] मे १९६३ [अंक ८

वार्षिक वर्गणी ९ रु.] [किरकोळ अंक १ रु.

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष सोळावे | अंक आठवा

नवभारत

मे १९६३

संपादक-मंडळ

आचार्य स. ज. भागवत—प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक

वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,
'गणेश भुवन'-२७६, तेलंग रोड, माटुंगा–मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमरावबाडी, मुंबई २
फोन नं. २३५५४

[मराठी साहित्य महामंडळाने ठरविलेले शुद्धलेखन अनुसरण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे शुद्धलेखनपद्धति अनुसरली आहे. का. सं.]

बौद्धागमार्थसंग्रहः

पाली व संस्कृत] [मूल्य रु. २०

संपादक : डॉ. पी. एल्. वैद्य एम्. ए., डी. लिट्. (पॅरिस)

अखिल भारतीय कीर्तीचे पंडित श्री. वैद्य यांनीं पाली व संस्कृत अशा समग्र बौद्ध साहित्याचें मंथन करून बुद्धचरित्रासंबंधीं व बुद्धाचे उपदेशपर संदर्भ यांत ग्रथित केले आहेत. या ग्रंथाच्या परिशीलनानें बौद्ध धर्माचें वा हीनयान व महायान या दोन्ही बौद्ध संप्रदायांचें सर्वांगीण दर्शन होईल. विद्वान व विद्यार्थी या दोघांना संग्राह्य असा हा संदर्भ ग्रंथ आहे. मूळ पाली व मूळ संस्कृत अशा बुद्धोक्तींचा हा संग्रह आहे.

याचा मराठी अनुवाद महाराष्ट्र राज्य, साहित्य व संस्कृति मंडळ लवकरच प्रसिद्ध करणार आहे.

बुद्धवंस, चरियापिटक, निदानकथा, ललितविस्तर, सुत्तनिपात, महावग्ग, चुल्लवग्ग, सुमंगलविलासिनी, महापरिनिब्बाण, समन्तपासादिका, दीघनिकाय, संयुत्तनिकाय, अंगुत्तरनिकाय, मज्झिमनिकाय, विसुद्धिमग्ग, बोधिचर्यावतार, मिलिन्दपञ्ह, थेरगाथा, थेरीगाथा, मध्यमकशास्त्र, शालिस्तंबसूत्र, समाधिराजसूत्र, लङ्कावतारसूत्र, सद्धर्मपुण्डरीक या ग्रंथांतील बुद्धचरित्र, भिक्षुभिक्षुणीशिक्षण, धर्म, कीर्णक व संगीति अशा पांच विषयावरील संदर्भ यांत घेतले आहेत.

मिळण्याचें ठिकाण —

प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई (सातारा)

अनुक्रमणिका

श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

प्रा. नरहर रघुनाथ फाटक

गेल्या एप्रिल १५ तारखेस प्रा. न. र. फाटक यांच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झाली. त्यांचा जन्म १५–४–१८९३ साली मावळात त्यावेळच्या भोर संस्थानातील जांभळी या खेडेगावात झाला. उंच सह्याद्रीचा परिसर, सुंदर वनश्री, मधुर जलसंचय, जोमदार हवा व काटक प्रकृतीची माणसे हे मावळ भागाचे वैशिष्ट्य होय. त्यांचे बालपण, व किशोरवयाची वर्षे बहुतेक उत्तर हिंदुस्थानात गेली. माध्यमिक शिक्षण पुण्यात न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झाले. उच्च विद्यापीठीय शिक्षणाचे पहिले वर्ष पुण्यात आणि बाकीचे बी. ए. पर्यंतचे उच्च शिक्षण अजमेर, इंदूर व अलाहाबाद येथे झाले. बी. ए. ला ऐच्छिक विषय तत्त्वज्ञान होता व त्याच विषयात ते पदवीधर झाले; परंतु संस्कृत, इतिहास व अर्थशास्त्र हे विषय अत्यंत आवडीचे म्हणून महाविद्यालयीन अध्ययनाच्या काळातच अभ्यसिले. वडिलांची नोकरी उत्तर हिंदुस्थानात झाल्यामुळे राजस्थान, माळवा, उत्तर प्रदेश या भागातील मोठमोठ्या शहरात सुबत्तेच्या काळात पहिल्या उमेदीच्या व शिक्षणाच्या वयात उत्तर भारताचे प्रसन्न, उत्साही व सुखी वातावरण अनुभविले. उपनिषदात याज्ञवल्क्यमुनीने शिक्षणाबद्दल म्हटले आहे की मातृमान्, पितृमान्, आचार्यवान् वेद, माता, पिता व आचार्य यांच्यापासून जेवढे शिक्षण मिळणे शक्य असते तेवढे मिळाले आहे. अध्ययनाला शिस्त असावी लागते तरच अध्ययन दृढ बनून वैचारिक शक्ति येते. उत्तम स्मरणशक्ति व विवेचकबुद्धि असूनही अध्ययनाला शिस्त नसेल तर त्याचा कमी उपयोग होतो. वडिलांच्या प्रेमळ परंतु करड्या देखरेखीखाली मराठी व संस्कृत शिक्षणाचा पाया घातला गेला. तपशीलवार व प्रमाणशुद्ध अध्ययनाची सवय फाटक यांना लागली. उत्तर हिंदुस्थानात मध्यमवर्गीय शिक्षित समाजात त्यावेळी उर्दूची कदर विशेष होती. त्यामुळे उर्दू भाषेचेही संस्कार मिळाले. भारताचा अद्ययावत् इतिहास आणि प्राचीन व अर्वाचीन मराठी साहित्य या विषयात एक मोठी अधिकारी व्यक्ति म्हणून महाराष्ट्रात फाटक यास असाधारण स्थान प्राप्त झाले आहे; या गोष्टीची प्राथमिक तयारी पहिल्या वयातच झाली. ‘रामविजय’, ‘हरिविजय’, ‘दासबोध’ इत्यादि ग्रंथांचे वाचन मातुःश्रींकरिता लहानपणी केले. त्यामुळे प्रासादिक साहित्याची अवीट गोडी लागली व ती कायम टिकली. महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रारंभ होताना व माध्यमिक शिक्षण संपताना नुकत्याच स्थापन झालेल्या पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळाशी व त्यातील संशोधक व व्यासंगी व्यक्तींशी संबंध आला व संशोधनाची गोडी लागली; त्यांच्या ओळखी होऊन मैत्री जडली. कै. पांडुरंग नरसिंह पटवर्धन, कै. तात्यासाहेब मेहेंदळे, सरदार आबासाहेब मुजुमदार, श्री. वा. सी. बेंद्रे, म. म. द. वा. पोतदार इत्यादि मंडळींचे साहचर्य लाभले. श्री. द. वा. पोतदार यांची ओळख दृढ होऊन मैत्री उशिरा झाली. पटवर्धन व बेंद्रे यांचा परिचय अगोदरच दृढ झाला होता. भारत इतिहास संशोधन मंडळाकडे मन इतक्या लवकर ओढले गेले याचे कारण वडिलांच्या ग्रंथसंग्रहातील पारसनीस, खरे, राजवाडे इत्यादि इतिहास संशोधकांच्या ग्रंथांकडे वारंवार नजर जाऊन

या नजरेतूनच इतिहासाच्या महतीचे प्रेम जडले हे होय. इतिहासज्ञानाची पात्रता जशी जशी वाढत गेली तसतशी मराठी व इंग्रजी इतिहाससाधनांचे वाचन करण्याची गोडी वाढली.

शालान्त परीक्षा किंवा महाविद्यालयीन पदवी-परीक्षा यात परीक्षेतील उच्च गुणांक भरपूर संपादन करून डोळयात भरणारे यश फाटक यांना मिळाले नाही. शालान्त परीक्षा व विद्यापीठीय परीक्षा यात विशेष ठसठशीत यश किंवा विक्रम दाखविणारे विद्यार्थी विद्यापीठोत्तर आयुष्यक्रमात विद्वत्तेच्या क्षेत्रात यश वा विक्रम दाखवितातच असे हमी देऊन सांगता येत नाही. यासंबंधात व्यस्त प्रमाण किती आहे हे जरी संख्यानशास्त्राप्रमाणे सांगता आले नाही तरी अपेक्षा-भंग करण्याइतके व्यस्त प्रमाण खास आहे, असे निरीक्षणावरून सांगता येते. किंबहुना विद्यापीठातील यशावरून व विक्रमावरून विद्वत्तेतील भावी यश वा विक्रम अनुमित करणे धोकादायक आहे; विद्यापीठातून उत्तीर्ण झाल्यानंतर बौद्धिक प्रगतीची सीमा संपलेली उदाहरणे कमी सापडणार नाहीत. व्यासंगाने व पांडित्याने नमावयास लावतात अशी जी उदाहरणे सापडतात, त्या उदाहरणांच्या मालिकेत फाटक हे झळकत आहेत.

उच्च वृत्तपत्रकार, उत्कृष्ट शिक्षक व उत्तम पंडित म्हणून श्री. फाटक यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. खाजगी बैठकीत फाटकांची चर्चा चांगली रंगते. त्यात इतस्ततः अनेक विषयोपविषय निघतात. सहजासहजी बहुगामी विद्याव्यासंगाचा प्रत्यय त्यात मिळतो. 'यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवन्ति शास्त्राणि।' ही उक्ति त्यांच्या संवादांना समर्पकपणे लागू पडते. परखड, तिखट, धारदार व उपरोधिक लेखक म्हणून त्यांची प्रसिद्धी आहे; वादात ते कधी हार गेलेले नाहीत; मोठमोठ्या धेंडांची तोंडे त्यांनी बंद केली आहेत. लेखनशौंड व साहित्यसम्राटही त्यांनी गप्प बसविले आहेत. त्यामुळे हे एक उग्र प्रकृतीचे गृहस्थ आहेत असा कयास करून अनेक जिज्ञासू लोक त्यांच्यापासून दूर राहतात, संबंध टाळतात. कित्येक वेळा संबंध आल्यानंतर त्यांच्या हजरजबाबी कडक स्वभावाचे प्रत्यंतर मिळवून कित्येक व्यक्ती त्यांना दुरून रामरामही ठोकतात. दृढ धारणाशक्ति व हजरजबाबीपणा असल्यामुळे त्यांचा धाक जसा वाटतो तसे त्यांचे आकर्षणही वाटते. देशकालप्रसंगांची अचूक नोंदणी करणाऱ्या स्मृतिपटाचे बंदिस्त स्थानासारखे त्यांचे मन आहे. धैर्य धरून त्यांच्या सान्निध्यात जे लोक हट्टाने बैठक मारतात त्यांच्या मनातील धाक हळूहळू नाहीसा होतो; त्याच्यांतील ऋजु व मधुर वृत्तीचा अनुभव येतो; दुरून जे वाटत होते तो भ्रम होता अशी खात्री पटते.

फाटक यांनी अगणित मित्र जोडले आहेत. त्यांच्या स्वभावातील खाचाखोचा संभाळण्याचे ज्यांना साधले ते त्यांचे मित्र बनतातच. हे संभाळण्याची जरूरी जे स्वतःची प्रतिष्ठा मोठी मानतात त्यांना वाटत नसते. परंतु ज्यांना स्वतःचा मोठेपणा संभाळण्याचे महत्त्व वाटत नाही त्यांना फाटक यांच्या स्वभावातील खाचाखोचा समजल्यावर धोरण संभाळण्याचीही गरज नाही. फाटकांचा स्वभाव हा सहानुभूतीचा नित्य वाहता निर्मळ झराच आहे. त्यांच्या स्वभावात एक उष्ण प्रवाह आहे व एक शीत प्रवाह आहे. दोन्हीही प्रवाह सारख्याच मोलाचे आहेत. यांचे केव्हा बिनसेल याचा नेम नाही असा ज्यांचा संभव वाटतो अशाही व्यक्ती फाटक यांच्या मित्रवर्गात आढळतात. कलापूर्ण व उत्तम चिकित्सक असे नमुनेदार लेखन करण्यात सिद्धहस्त असलेल्या श्रीमती दुर्गा भागवतांसारख्या विदुषी फाटकांच्या खाजगी संवादात मशगुल झालेल्या आढळतात. फाटकांचे कोणाशीही जमते असे त्यांच्यावर लोभ ठेवणाऱ्या विविध व्यक्तींवरून

अनुक्रमणिका

अनुमानिता येते. त्यात न्हावी, व्यापारी, कलावंत, धोबी, महार सुद्धा दिसतात. त्यांच्या मित्रमंडळी-मध्ये ढोंगी सोंगी माणसेही सापडतील. मात्र केव्हा फटकारा बसेल याचा नियम नाही हे त्यांनी धरून चालावे लागते. काही ढोंगी सोंगी माणसे मानभावी-पणे वाटेल तसे फटके सोसण्याइतके चिवट असतात. मुंबईसह महाराष्ट्राच्या गेल्या साडेतीनशे वर्षांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक इति-हासातील व्यक्तिविशेष आणि प्रसंगविशेष यांचे तपशीलवार वर्णन मनोरंजक व विवेचक पद्धतीने ऐकायचे असेल तर फाटक यांच्या बैठकीत असावे. विशेषतः अव्वल इंग्रजीपासून आजतागायतचे मह-त्वाचे नाट्यमय प्रसंग व त्यातील व्यक्तिरूप पात्रे यांचे चित्र फाटक शब्दांनी डोळयासमोर उभे करतात. म्हणूनच आधुनिक महाराष्ट्राची व मुंब-ईची जडणघडण कशी झाली याचे तपशीलवार विवेचक व यथार्थ वर्णन करण्यास समर्थ विद्यमान व्यक्तींत फाटकांइतका कोणी असेल असे वाटत नाही.

फाटक यांची वैचारिक बैठक उदारमतवादी रानडे गोखले यांच्या परंपरेतील आहे. भारत इतिहास संशोधन मंडळाचे स्फूर्तिस्थान असलेले कै. वि. का. राजवाडे यांनी अव्वल दर्जाचे फार मोठे इतिहाससंशोधन केले असले तरी त्यांची ऐतिहासिक उपपत्ति पुराणमतवादी आहे. भार-तीय सनातनी राष्ट्रवादाचे अधिष्ठानावर त्यांची ऐतिहासिक उपपत्ति उभारलेली आहे. राजवाड्यांच्या दृष्टिकोणाचा व ऐतिहासिक उपपत्तींचा प्रभाव फाटक यांच्या विचारपद्धतीवर बिलकुल पडलेला नाही. फाटक यांची विवेचक दृष्टि रानडे गोखले यांच्या उदारमतवादाने व बुद्धिवादाने भारलेली आहे. पूर्वजांची थोरवी गाणारी पुराणकथा असे रूप राजवाडे यांच्या परंपरेतील इतिहासकार इतिहासाला देतो. उलट फाटक यांच्या इतिहासदृष्टीला वस्तुनिष्ठा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या गेल्या तीनशे वर्षांच्या इतिहासातील अनेक अद्भुत-रम्य पौराणिक कथांची काल्पनिकता उघडकीस आणली. रामदास आणि शिवाजी या गुरुशिष्यांच्या जोडीतील श्री समर्थ रामदास हे शिवाजीच्या राजकारणात गुप्तरूपे प्रत्यक्ष उलाढाली करणारे राज-कीय गुरु होते; महाराष्ट्रात व सर्व भारतभर संत रामदासांनी महंताचे ११०० मठ स्थापून गुप्त राजकारणाचे जाळे पसरले होते; देशभर पसरलेल्या मुसलमानी राज्यसत्तेचे अंतःस्थ डावपेच, मर्मस्थाने व राजकीय उलाढाली यांची दैनंदिन बित्तंबातमी राम-दासांकडे व शिवाजीकडे पोचविणारी महंत मंडळी या अकराशे मठात राहात होती; अफझुलखानाचा वध, शाईस्तेखानावरील हल्ला, शिवाजीची आग्र्या-हून सुटका इत्यादि घटनांच्या पाठीशी या महंत मंडळींचे गुप्तपणे चाललेले संचार शिवाजीच्या राज-कीय यशास कारणीभूत झाले. अशा तऱ्हेची बृहत्कथा राजवाडे संप्रदायाने रचली होती. या कथेचे काल्प-निकत्व व निर्मूलत्व सिद्ध करण्यास फाटक यांनी निर्णायक असा युक्तिवाद केला. रामदास हे शिवा-जीचे राजकीय गुरु होते की केवळ परमार्थाचे गुरु होते याची पुरी शहानिशा विविधज्ञानविस्तारातील लेखनमालेत (इ. स. १९२९) मध्ये केली. रामदासांचे चित्रशाळेतर्फे प्रसिद्ध झालेले चरित्र व मौज प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशित झालेला रामदास हा प्रबंध त्यांच्या रामदासी समग्र साहित्याच्या व्यासंगाची साक्ष पटवि-तात. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादि संतांच्या प्रासादिक साहित्याचीही आधुनिक सामा-जिक व ऐतिहासिक समीक्षेच्या दृष्टीने त्यांनी आलो-चना चालविलेली आहे, त्यांच्या ज्ञानेश्वर व एक-नाथ या प्रबंधात याचे प्रत्यंतर मिळते. भारताच्या प्राचीन व अर्वाचीन अशा समग्र इतिहासाचा दीर्घ व्यासंग त्यांनी केला आहे; परंतु त्यातल्या त्यात क्रमाने मुसलमानी बादशाही, मराठी राजवट व इंग्रजी अंमल यात जितके अलीकडे यावे तितका

व्यासंगाचा सर्वांगीणपणा वाढता व सखोल बनलेला दिसतो. भारताच्या राष्ट्रीय एकतेची घडण व विशेषतः हिंदु-मुसलमानांच्या सामाजिक व सांस्कृतिक समरसतेची रचना गेल्या ६ शे वर्षांच्या संघर्षात कशी होत होती याचे तपशीलवार विवेचन करून भारताच्या राष्ट्रीयतेच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे सम्यक् स्वरूप निदर्शनास आणणारे जे थोडे इतिहासचिंतक आहेत त्यात फाटक यांची गणना केली पाहिजे. त्यांनी जितके लिहिले आहे त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक लिहिण्याची साधनसामग्री स्वतःच्या स्मरणधारणेच्या दालनात विवेचकपणे त्यांनी साठवून ठेवली आहे मराठ्यांच्या इतिहासातील विशेषतः पेशवाईवरील त्यांची विवरणे अत्यंत विदारक व उद्बोधक अशी त्यांच्या व्याख्यानात व बैठकीतील चर्चेत ऐकावयास मिळतात. त्यांच्या बहुश्रुततेच्या संभाराला सागरातील हिमपर्वताचीच उपमा दिली तर शोभेल. दिसणाऱ्या भागापेक्षा झाकलेला भागच अधिक विस्तृत व भारी आहे. संस्कृत, इंग्लिश व मराठीमधील ललित व वैचारिक साहित्य यांचे त्यांनी केलेले सखोल अध्ययन हे त्यांच्या इतिहासज्ञानाचे एक प्रधान अंग आहे.

साहित्याच्या व इतिहासाच्या मूल्यमापनाचा त्यांचा निकष त्यांच्या निस्पृह विवेचकतेचा सूचक आहे. इ स. १८५७ चे बंड व त्यातील वीरयुवती झाशीची लक्ष्मी यांची कथा आपल्या पूर्वेतिहासातील देशभक्तीची प्रेरणा निर्माण करणारी मानली जाते ५७ चे बंड हे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे युद्ध होय व त्या युद्धातील तेजोमयी शक्तिदेवता झाशीची लक्ष्मी होय; असे तात्पर्य काढण्याचा राष्ट्रीय इतिहासकारांचा प्रयत्न पोकळ व निराधार कल्पनांवर आधारलेला आहे व त्या बंडात राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्रेरणा नव्हती ही गोष्ट जनतेच्या अप्रीतीची व शिष्टांच्या क्षोभाची पर्वा न करता सत्यसंशोधकाच्या निष्ठेने फाटकांनी सप्रमाण सिद्ध केली. इतिहासकाराला सत्याच्या विजयाकरिता समाजसुधारक किंवा धर्मसुधारक यांच्यासारखेच संकटांना तोंड द्यावे लागते; विज्ञानाच्या अनेक पश्चिमी शोधकांना जिवावरील आपत्तीचे प्रहार सहन करावे लागले; तशीच इतिहाससंशोधकावरही पाळी येते; सत्याचे आविष्करण कठोर व कटु असते; अशा इतिहासज्ञाचे उत्कृष्ट उदाहरण फाटक होत हे त्यांनी इ. स. ५७ सालच्या बंडासंबंधी सत्याची बाजू घेऊन दाखवून दिले आहे.

रामदास व ५७ चे बंड या शिवाय तिसरे महत्त्वाचे प्रत्यंतर कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्राची व साहित्याची इ. स. १९३० साली विविधज्ञानविस्तारात तीन लेखांकांनी केलेली समालोचना होय. रानडे व गोखले यांच्या परंपरेने दिलेल्या उदारमतवादाचे निकष वापरून श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या कार्याचे निर्भीड मूल्यमापन करण्याचा श्रेष्ठ मान फाटक यांच्याकडे जातो. विष्णुशास्त्री चिपळूणकर आधुनिक मराठी गद्याची आद्य प्रतिष्ठापक देवता मानली गेली असल्यामुळे त्यांच्या विचारातील दोषांचे उद्घाटन करणे म्हणजे मोठे पाखंडच रचणे होय; हे एक प्रकारचे अब्रह्मण्यम् म्हणून निंदास्पद ठरणारे पातकच मानले जात होते; कै. शिवराम महादेव परांजपे, कै. न. चिं. केळकर, कै. ज. स. करंदीकर इत्यादि मान्यवरांनी पूजनीय देवतेप्रमाणे मानलेल्या चिपळूणकरांचा प्रतिगामीपणा दाखवून त्यांच्या विचारातील वैगुण्य दाखविणे हे मोठ्या नैतिक धैर्याचे दर्शक काम होते. श्री. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांस बदलत्या सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याच्या युगाचा उदय दिसत नव्हता; त्यांचे मन गतयुगाच्या अस्तंगत वैभवाच्या आराधनेत मग्न होते; याच्या स्पष्ट निशाण्या निबंधमालेत गोवलेल्या सापडतात. ज्योतिबा फुले, स्वामी दयानंद व लोकहितवादी यांच्यावरील चिपळूणकरांची अदूरदर्शी व उथळ टीका नव्या

युगाच्या आगमनाची ओझरती वार्तासुद्धा नसल्याचे दर्शक होती. ज्योतिबा फुल्यांनी शंभर वर्षांपूर्वी जे अपेक्षिले ते आज महाराष्ट्र राज्यावर आलेले सत्ताधारी घडवीत आहेत. ज्या सामाजिक रचनेवर फुल्यांनी मर्मभेदी प्रहार केला ती आज मुमूर्षु अवस्थेत पडली आहे. लोकहितवादींनी ब्राह्मणी विद्येवर व ब्राह्मणी विचारसरणीवर शतपत्रांच्या धनुष्यातून बौद्धिक शरसंधान केले व पाश्चात्य विद्येचे आवाहन केले. आता ती शतपत्रे यथार्थ भविष्यवादी ठरली आहेत व लोकहितवादींच्या आकांक्षा पूर्ण होऊन पश्चिमी विद्या भारतीय विद्यासनाची सम्राज्ञी बनली आहे.

फाटक हे उत्कृष्ट चरित्रकार व चरित्रटीकाकार म्हणून नाणावलेले आहेत. त्यांनी भारतीय आधुनिक युगाच्या दोन प्रणेत्यांची म्हणजे म. गो. रानडे व गो. कृ. गोखले यांची चरित्रे लिहिली. त्यापैकी रानडे यांचे चरित्र इ. स. १९२४ मध्ये प्रसिद्ध झाले आणि गोखले चरित्राचे हस्तलिखित आर्यभूषण छापखाना जळला तेव्हा त्या आगीत भस्मसात झाले. फाटक यांचे रानडेचरित्र हे बिनचूक व सुटसुटीत चरित्राचा नमुना आहे. रानडे हे युगकर्ते होते त्या युगाच्या प्रारंभाची रूपरेषा या चरित्रामध्ये प्रतिबिंबित झाली आहे. महान व्यक्तींच्या चरित्रांची नोंद बिनचूक व व्यवस्थित रीतीने समकालीन व्यक्तींनीच केली तर बरी; नाहीतर त्या त्या कालखंडाचा इतिहासच थोडयाबहुत अंशाने विस्मृत व कालग्रस्त होतो असे म्हणावे लागते.

जगातील अत्यंत दीर्घकाल जगलेल्या ज्या काही थोड्या जागतिक संस्कृति आहेत त्यापैकी भारतीय संस्कृती ही एक आहे. परंतु या संस्कृतीचा मोठा दोष म्हणजे हिला कालसंवेदनेचा म्हणजेच इतिहासप्रज्ञेचा अभाव आहे. ही मोठी उणीव आधुनिक भारतीय प्रज्ञावंतांच्या मध्ये सुद्धा वंशपरंपरागत रीतीने आलेली दिसून येते याचे ठळक उदाहरण म्हणजे साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांचे टिळकचरित्र होय. न. चिं. केळकर हे लो. टिळकांचे निकटचे सहवासी व चिर सहकारी होते. तरीदेखील त्यांच्या टिळकचरित्रातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या व प्रसंगांच्या नोंदी कशा साफ चुकल्या आहेत याचे सम्यक् उद्घाटन फाटक यांनी विविधज्ञानविस्तार मासिकात १९२४ व १९२६ मध्ये केळकरांच्या टिळकचरित्रावरील समीक्षापर लेखमालेत केले आहे. ही फाटकांची लेखमाला त्यावेळी खूप गाजली. श्री. केळकर यांना स्वतःचे समर्थन करणे अशक्यप्राय झाले. याचे एकच ठळक उदाहरण द्यावयाचे झाले तर ते असे की, कै. आगरकर व कै. टिळक यांना क्रमाने कऱ्हाडे ब्राह्मण व चित्पावन ब्राह्मण लेखून यांच्यामध्ये जमातीतील भिन्न स्वभावविशेष दाखवून एक लांबलचक साहित्यिक कोटिक्रम केळकरांनी लिहिला आहे; परंतु आगरकर हे कऱ्हाडे नव्हते तेही टिळकांप्रमाणे चित्पावन ब्राह्मणच होते ही गोष्ट पटल्यानंतरही व फाटक यांनी उघडकीस आणलेल्या कालनिर्देशाच्या चुका मान्य होण्यासारख्या असूनही नंतर पुष्कळ कालांतराने केळकरकृत समग्र ग्रंथात अन्तर्भूत केलेल्या टिळकचरित्रातील उघडकीस आणलेले दोष दुरुस्त न करता, आगरकर हे कऱ्हाडे आहेत, अशा प्रकारच्या चुकीच्या नोंदीसह, जसेचे तसे प्रसिद्ध केले आहेत.

कर्व्यांचे महिलाविद्यापीठ व रामरुईया कॉलेज यामध्ये पुष्कळ वर्षे अध्यापनाची वयोमर्यादा ओलांडीपर्यंत फाटक यांनी मराठी साहित्याचे प्राध्यापन केले आहे. या प्राध्यापनाच्या कालखंडात असंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी त्यांच्या हाताखाली शिकून तयार झाल्या. या विद्यार्थी-विद्यार्थिनींना टीकाकार पंडित या नात्याने फाटक जितके पटतात तितके साहित्याचे चोखंदळ रसिक या नात्याने पटत नाहीत,

असे त्यांच्या परोक्ष केलेल्या चौकशीत आढळते. ते निर्भीड प्रखर टीकाकार आहेत ही जशी त्यांची एक बाजू आहे तसेच सहानुभूतिपूर्ण रीतीने हळुवारपणे मर्मग्रहण करणारे रसिक म्हणूनही त्यांची दुसरी एक बाजू आहे हे त्यांच्या निकटच्या सहवासातल्या निरीक्षकांच्या ध्यानात भरते. एखादी गोष्ट पटली तर ते मुक्तकंठाने प्रशंसाही करतात. मात्र त्याकरिता त्यांच्यापाशी जाणाऱ्याने योग्य काळवेळ व मनस्थिति पाहून त्यांच्या समीप गेले पाहिजे. यासंबंधी त्यांच्या मर्मज्ञ रसिकतेबद्दल निर्वाळा देणाऱ्या तीन महाराष्ट्रीय विदुषींचा निर्देश करता येईल. त्या म्हणजे— दुर्गा भागवत, कुसुमावती देशपांडे व मालती बेडेकर या होत. या तिन्ही विदुषींच्या साहित्यिक प्रतिभेची व प्रज्ञेची मोकळ्या मनाने फाटक यांनी वारंवार प्रशंसा केली आहे. कविता, लघुकथा, प्रशस्तकथा (कादंबरी), आत्मचरित्र, वृत्त, प्रवासवृत्त, विनोद, उपरोध, समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र, ललितनिबंध, निबंध, नाटक, नाटिका इत्यादि साहित्याच्या विविध आकृतिविशेषांचा परामर्श फाटक चांगल्या रीतीने घेऊ शकतात. त्यांच्या स्वतःच्या लेखनशैलीला प्रासंगिक व स्वैर वातावरणामध्ये लालित्याचा आकार व रंग लवकर येतो. ते स्वतः वक्तृत्व करीत असताना किंवा चर्चा करीत असताना त्यांच्यातील ललितशैलीचे चमत्कार मधूनमधून प्रकट होतात. परंतु ही त्यांची ललितशैलीची लीला ते विद्यापीठीय दर्जाचे लेखन करू लागले की पूर्ण लुप्त होते. एकप्रकारे करकचून आवळलेले व माहिती ठासून भरलेले असे ते लेखन असते. यास त्यांचे वृत्तपत्रीय लेखनच तेवढे अपवाद होय.

वृत्तपत्रकारांच्या जगातून विधियुक्तपणे सेवानिवृत्त होऊन फाटकांची पुष्कळ वर्षे झाली आहेत. परंतु एक खंदा वृत्तपत्रकार म्हणून त्यांची कीर्ति अजूनही तितकीच उज्ज्वलपणे कायम राहिली आहे. वृत्तपत्राचे संपादक या नात्याने कारभार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर इ. स. १९१८ साली पडली. इ.स. १९१८ ते १९३५ पर्यंत ते वृत्तपत्रांच्या जगात बैठक मारून बसले होते. इ. स. १९१८ ते १९२४ पर्यंत नेमस्त पक्षाचे इंदुप्रकाश हे दैनिक त्यांनी चालविले व इ. स. १९२३ पासून १९३५ पर्यंत कै. कृ. प्र. खाडिलकर यांच्या छायेत नवाकाळ दैनिकाचे संपादकीय काम केले. मुंबईतील दैनिक वृत्तपत्राचा विद्वान व विचक्षण संपादक म्हणून त्यांनी अनन्यसामान्य अशी प्रतिष्ठा मिळविली. गेल्या दीडशे वर्षातील भारताच्या राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक घडामोडींचे व आंदोलनांचे सर्वोत्तम केन्द्रस्थान म्हणून मुंबई ही नगरी मान्यतेस पावली. या मुंबईतील राजकीयदृष्ट्या आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रीय सुशिक्षित वर्गास फाटक यांनी आपली बौद्धिकदृष्ट्या परिणामकारक अशी भूमिका गाजवली. नेमस्तपक्षाच्या फिरोजशहा मेहतांसारख्या महनीय व्यक्तींना आणि प्रार्थनासमाजाच्या अध्वर्यूंना जवळून पाहण्याचा योग लाभला. मुंबईतील व पुण्यातील नेमस्त, जहाल व गांधीवादी अशा लहानमोठ्या व्यक्तींना जवळून समजावून घेण्याचे अनेक प्रसंग आले व त्यांच्या स्मृतिपटलावर ते कायम कोरले गेले. अनेक सार्वजनिक व्यक्तींच्या अंतरंगाचे व बहिरंगाचे दर्शन त्यांच्या तीक्ष्ण समालोचक दृष्टीला घडले. त्यामुळे त्यांचे वृत्तपत्रातील मर्मग्राही व मर्मभेदक असे लेख सार्वजनिक चर्चेचे विषय बनले. ' आलमगीर ' या टोपण नावाखाली समयानुरूप टिप्पणी लिहिण्याचे काम विविधवृत्त या साप्ताहिकात त्यांनी केले. त्यामुळे विविधवृत्त हे साप्ताहिक विचक्षण वाचकवर्गाला अधिक आकर्षक वाटू लागले. हे मात्र येथे लक्षात ठेवले पाहिजे की ' आलमगीर ' या विविधवृत्तातील सदराखाली लेखन करण्याचे काम फाटकांनी लवकरच सोडले. ते लिहीत होते त्या कालावधीत सुद्धा या सदराखाली इतरही टीकाकारांनी लेखन केले आहे.

मुंबई शहराच्या व महाराष्ट्राच्या वैचारिक आंदोलनात वर्तमानकाळी आता सत्तरी उलटत

आली तरी फाटक हे अग्रभागी झळकत आहेत: मुंबई शहरातील मराठी साहित्य संघाच्या व मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या विद्यमाने अलीकडे प्रतिवर्षी प्रदीर्घ व्याख्यानमाला फाटक गुंफत असतात. समाज, धर्म, राजकारण, साहित्य, रामायण–महाभारताच्या समालोचना, सार्वजनिक जीवनातील कर्तबगार व्यक्ति इत्यादि विषयांचा परामर्श या व्याख्यानमालांच्या द्वारा ते घेत असतात. त्यांचा अष्टपैलू व्यासंग व इतिहासाच्या ऐतिहासिक घटनांचे चमकदार विवरण ऐकून चाणाक्ष सुशिक्षित श्रोतृवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या व्याख्यानामध्ये रमलेला दिसतो. या व्याख्यानमालांच्या निमित्ताने त्यांच्या अनेक नवीन पुस्तकांची विस्तृत टिप्पणे तयार झालेली आहेत. ह्या व्याख्यानमालांमध्ये भूतकाळाचा इतिहास प्रत्यक्ष वर्तमानकाळातच घडत आहे इतक्या कुशलतेने ते रंगवीत असतात.

त्यांचे खाजगी जीवन अगदी साधे आहे. वयाच्या ५५ वर्षापर्यंत त्यांची प्रकृति सुदृढ व कणखर होती. पोषाखात रुबाब, आकर्षकपणा वा छाप पाडण्याचा भाग नसतो. अजूनही ते पंचावजाच धोतर नेसतात; जुन्या पद्धतीने क्षौर करतात; पानतंबाखूचा तेवढा शोक आहे; परंतु त्यांचा खरा शोक म्हणजे पुस्तकसंग्रहाचा होय. लक्ष्मीचे वरदान नसले तरी निर्वाहापुरते अन्न व आच्छादन मिळत राहिले आहे. त्यांची श्रीमंती त्यांच्या ग्रंथसंग्रहात दिसते. इतके मर्यादित उत्पन्न असलेल्या व्यक्तीला एवढा मोठा ग्रंथसंग्रह करण्याचा हव्यास म्हणजे एक सात्विक परंतु अनिवार्य व्यसनच समजले पाहिजे. अष्टपैलू व्यासंग असल्यामुळे संस्कृत, इंग्लिश, मराठी व हिंदी या चारी भाषांतील निवडक व संशोधनास व व्यासंगास उपयुक्त अशा उत्कृष्ट शेकडो पुस्तकांचा संग्रह प्रतिवर्षी ते शेकडो रुपये खर्च करून करीत राहतात. त्यांच्याकडे महाराष्ट्रीय किंवा अन्य प्रांतीय शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक, संस्थाचालक, सार्वजनिक कार्यकर्ते यांची त्यांच्याकडे येरझार चालू असते. या बारंवार येणाऱ्या अभ्यागतांची लोभी नजर या ग्रंथावरून फिरत असते. उदार धनिकाप्रमाणे या लोभी अभ्यागतांना हे ग्रंथस्वामी विमुख पाठवीत नाहीत. अनेक अभ्यासु वा जिज्ञासु व्यक्तींना व सार्वजनिक संस्थांना फाटक मुक्तहस्ताने ग्रंथदान करीत आले आहेत. वाई येथे प्राज्ञपाठशाळेच्या केवलानंदस्मारक मंदिराच्या ग्रंथसंग्रहालयातील शेकडो बहुमोल ग्रंथ फाटकांच्या दानौघामधून प्राप्त झाले आहेत. प्राज्ञपाठशाळेच्या ग्रंथालयातील अनेक महत्त्वाची दुर्मिळ संस्कृत, इंग्लिश व मराठी पुस्तके फाटकांची स्वाक्षरांकित आहेत.

महाराष्ट्रातील अनेक संस्थासंचालक फाटकांच्या सार्वजनिक वजनाचा उपयोग करून घेतात व फाटक हे विनासंकोच आपल्या वजनाचा व परिचयाचा फायदा करून देण्यास सज्ज असतात. प्राज्ञपाठशाळामंडळाच्या संचालक समितीचे सुमारे तीस वर्षे फाटक सदस्य आहेत. प्रतिवर्षी वाईस त्यांची एकदा तरी भेट असते. ब्रह्मीभूत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्याशी त्यांचा दृढ परिचय होता. स्वामींवर फाटकांची नितांत भक्ती आहे. या संस्थेच्या विविधकार्यांचा उत्कर्ष होण्याकरिता फाटक निरंतर सन्नद्ध असतात. आता त्यांची सत्तरी जरी उलटली असली तरी उत्साह मात्र तिशीच्या उमेदीतला आहे. शरीरप्रकृति अलीकडे नरम झालेली असली तरी विद्याव्यासंग पूर्वी इतकाच सतत चालू आहे. ते महाराष्ट्र राज्याच्या स्वातंत्र्येतिहास समितीचे सन्मान्य सचिव आहेत. त्यांनी आज जेवढी विद्यासाधना केली आहे त्यातून अजूनही पुढील काही वर्षात विविध विषयावरील महत्त्वाची ग्रंथनिष्पत्ति ते करू शकतील अशी बळकट आशा बाळगता येते. महाराष्ट्रराज्य साहित्य व संस्कृति मंडळाचे ते सदस्य आहेत. त्यांच्याकडे या मंडळाच्या संकल्पित षट्खंडात्मक महाराष्ट्रेतिहासाचा आधुनिक काल हा खंड सोपविला आहे.

प्रा. न. र. फाटक

नारायणरावाचा खून की आत्महत्त्या ? : ३ :

नवाकाळमधील लेखमालेचा शेवट हा या वादांतील दुसऱ्या पर्वाचा शेवट होता. लेखमाला जुलैमध्ये (१९४५) संपली. ती संपता संपता मुंबईतील चित्पावनामार्फत आणि पुण्याच्या संस्कृतिरक्षकामार्फत लेखकाच्या सत्काराचे बोलणे निघाले होते हे सत्काराचे प्रसंग अव्हेरण्याची कारणे पूर्वी वाचकांच्या डोळयावर घातली आहेत. आणखी एका कारणाची वाच्यता येथे केली पाहिजे. नवाकाळमधील लेखकाचा सत्कार याचा उघड अर्थ रानड्यांचा धिक्कार असा निघत होता. या अर्थाबद्दल खात्री पटण्यासाठी फार खोल जायला नको किंवा गोंधळात पडायला नको. रामदासांची नवमी अथवा विष्णुशास्त्री चिपळूणकरांची पुण्यतिथि यांचे दाखले उद्बोधक ठरतील, दासनवमीला ज्ञानेश्वर-तुकाराम यांनी देश बुडत ठेवला होता, रामदासांनी शिवछत्रपतींना हाताशी धरून देश तारला; हा विषय पुरतो; चिपळूणकरांची पुण्यतिथि म्हणजे लोकहितवादी व प्रार्थनासमाजाचे पुढारी यांचे श्राद्ध. लोकहितवादी, रानडे, हे पुरुष इंग्रजांना देवदूत समजून त्याची यथेच्छ स्तोत्रे गाणारे, तर चिपळूणकर हा एकच महात्मा (महात्मा हा शब्द वि. का. राजवाडे यांनी चिपळूणकरांना लावला आहे.) असा निघाला की त्याने इंग्रजाबद्दलच्या निष्ठेला सुरुंग लावला, अशा धोरणाची व्याख्याने दासनवमीच्या व चिपळूणकर पुण्यतिथीच्या दिवशी दिली जातात, हा प्रकार परिचयाचा नसेल असे वाटत नाही. रानडेविरोधी टीकाकाराच्या सत्कारासाठी निवडलेले वक्ते रानड्यांवर जिभेचा पट्टा चालवणार, हे उघडे सत्य डोळयांपुढे ठेवून जेव्हा कै कृष्णराव मराठे सत्काराची कल्पना घेऊन पुण्याहून आले, तेव्हा एका सत्कारसमारंभात पांच दहा जणांनी रानड्यांचे वाभाडे काढण्यापेक्षा रानड्यांच्या पुस्तकातील महत्त्वाचे विषय निवडून त्यावर जे टीकाकाराच्या सत्काराला हुडकले असतील त्यातल्या थोड्याफार इतिहासज्ञांना निवडून त्यास स्वतंत्र व्याख्याने द्यावयास लावले तर ते जास्त चांगले, अशी उलट सूचना मराठ्यांसमोर ठेवली ती त्याना झटक्यासरशी नाकारता येईना. फक्त वक्ते कसे जुळवायचे एवढीच अडचण त्यांच्या संमतीस नडत होती; परंतु ही अडचण दूर करण्याचे काम सोपे होते. म. म. श्री. द. वा. पोतदार, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, कै. चिं. ग. कर्वे यांची व्याख्याने रानडयांच्या पुस्तकावर आधी झाली असल्यामुळे ते व्याख्यानाच्या निमंत्रणाला रुकार देतील ही अपेक्षा अगदीच खोटी ठरण्यासारखी नव्हती. कै. करंदीकर हे व्याख्यान देतील याबद्दल खात्री होती. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातील एका इतिहासप्राध्यापकाने मराठेशाहीच्या इतिहासाचे ' पुनःपरीक्षण ' या नावाचे एक पुस्तक इंग्रजीत लिहिले होते. ते व्याख्यानाला माघार घेणार नाहीत ही समजूत प्रथम खरी व नंतर खोटी ठरली. त्यांची जागा श्री. यशवंतराव फफे यानी भरून काढली. व्याख्याने सात दिवसांची. वरील चौघांना जमेस धरून चार दिवसाची तरतूद केली. ज्याला पहिल्या लेखात ' अधवट इतिहासज्ञ व अर्धवट अर्थशास्त्रज्ञ ' असे म्हटले आहे, त्याला या व्याख्यानाची कुणकुण लागल्यावर आपण या व्याख्यानपर्वणीत झळकावे, असे वाटून तो व्याख्यानाकरिता खटपट करू लागला व त्याचीही सोय लावण्यात आली. उरले दोन दिवस, ते पार पाडण्याची जबाबदारी टीकाकारांवर पडली. म. म. पोतदारांचे व्याख्यान झाले, ते त्यांच्या तंत्राप्रमाणे झाले, टाळयांचा कडकडाट सारखा चालू होता, परंतु पहिल्या निमंत्रणपत्राची संभावना त्यानी नकाराने केली होती. रानडयांच्या पुस्तकाला महत्त्व देऊ नये हेच त्यांच्या नकाराचे कारण होते. दुसरे बऱ्याच आर्जवाचे पत्र गेले, त्याला मात्र त्यांनी मान दिला. श्री. यशवंतराव फफे यांना वक्त्यात घेतले हे पाहून एका वक्त्याने त्यांच्या विषयीचा निराळया व्यवहारातील जुना हेवा स्मरून (त्यांत कोकणस्थ देशस्थ या वादाचे भूत होतेच) खूप जळफळाट व्यक्त केला. इतका की, तो

व्याख्यानच देणार नाही, अशी तो जळफळाट अनुभवणाराची समजूत झाली. व्याख्यानाची वेळ सायंकाळीं ७ वाजण्याची होती. ७ वाजण्याला एक दोन मिनिटे उरली तेव्हा ही स्वारी मंदगतीने सभागृहात उगवली आणि तशीच व्यासपीठावर गेली. तिचेही अघळपघळ वक्तृत्व सुमारे दीड तास श्रोत्यांनी ऐकले. आरंभी व्याख्यानमालेची कल्पना व योजना समजावून देण्याकरिता कृष्णराव मराठे व ज. स. करंदीकर यांनी काही वेळ घ्यावा हे योग्य नव्हे तर क्रमप्राप्तच होते. वक्त्यांना भेटणे, त्यांच्याशी बोलणे, एखादा वक्ता गेल्यावेळी न भेटल्यास त्याच्याकडे पुनः खेप टाकणे, ही दगदग मराठ्यांनी सोसली हे येथे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे अवश्य आहे.

व्याख्याने पुण्यास व्हावयाची तर त्यासाठी योग्य जागा पाहिजे. तशी जागा टिळक स्मारक मंदिर ही होती. त्या जागेचे एक विश्वस्त कै. न. चिं. केळकर असल्याने त्याच्याकडे जागेविषयीची विनंती सादर करताच त्यानी जुलै महिन्यातील ता. २० च्या पुढचा आठवडा देऊ केला. व्याख्यानांचा विषय ऐकल्यावर जागेबद्दल संमति देताना त्यानी अगदी सहजगत्या 'अध्यक्ष कोण ? ' असा प्रश्न केला. तो प्रश्न मराठे आणि व्याख्यानांचा योजक यांच्यापुढे होताच व त्यांचे उत्तर त्यांना सांपडलेले नव्हते. रियासतकार सरदेसाई हे एकच गृहस्थ डोळ्यापुढे होते, परंतु ते कामशेतहून यावयाचे व आलेच तर एखाद्या व्याख्यानाला अध्यक्ष राहतील; व्याख्यानांच्या योजकाला साऱ्या व्याख्यानांना एकच अध्यक्ष असावा व त्याने समारोप करावा, असे वाटत होते. आजच्या व्याख्यानाला करंदीकर अध्यक्ष तर उद्या करंदीकरांच्या व्याख्यानाला दत्तोपंत पोतदार अध्यक्ष, त्यांच्या व्याख्यानाला आणखी कोणी काल उद्यांच्या वक्त्यांपैकी अध्यक्ष, हा प्रकार नको, या योजकाच्या भावनेला केळकरांच्या प्रश्नाने उत्तेजन मिळाले. ' अध्यक्षाचा विचार चालू आहे, पण त्याविषयी निश्चय झालेला नाही ' यावर ' कोणाशी बोलणे, लिहिणे यासारखे सूत उवाच सुद्धा झालेले नसेल तर मीच का अध्यक्ष होऊ नये ' असे केळकर म्हणाले आणि योजकाची सारी अडचण एकदम निकालात निघाली. [ही आठवण पूर्वी सह्याद्रीत प्रसिद्ध झाली तेव्हा रत्नागिरीच्या एकाने सह्याद्रीच्या संपादकाकडे लेखकासंबंधात एक शिवराळ पत्र पाठवून आपली केळकरभक्ति उजवून घेतली, हे येथे नमूद केलेले बरे.] केळकरांबद्दल कोणाचे काहीही मतभेद असले तरी त्यांच्यात वसणाऱ्या विद्येच्या गोडीबद्दल आणि आस्थेबद्दल दुमत होण्याचे भय नाही. ' मीच का अध्यक्ष होऊ नये ? ' या प्रश्नाचे ' आपण अध्यक्ष झाल्याने व्याख्यानांचे आकर्षण वाढेल. दुधात साखर पडल्यासारखे होईल. आपल्या प्रश्नाने अध्यक्षाबद्दलची अडचण अत्यंत समाधानकारक रीतीने सुटली ' अशा अर्थाचे उत्तर मिळाले तेव्हा " केवळ इतिहासविषयक व्याख्यानांचा सप्ताह पुण्याला साजरा झाल्याचे निदान मला तरी आठवत नाही. निरनिराळे वक्ते, त्याचे तसच विषय, त्यांची दृष्टि यांचा व्याख्यानांच्या निमित्ताने परिचय घडेल, जुन्या माहितीची उजळणी होईल, नव्या माहितीची भर पडेल; फार छान प्रसंग आहे " अशा भावार्थाची वाक्ये अतिशय उत्साहाने केळकरांनी उच्चारली. केळकरांनी अध्यक्षाचा प्रश्न सोडविण्यापूर्वी टिळकस्मारक मंदिराचे भाडे घ्यावयाचे नाही, फक्त दिवाबत्ती पंखे, यासाठी जो विजेचा खर्च होईल तो व्याख्यानाच्या योजकांनी भरावा, अशी सवलत बोलून टाकली होती. मात्र आपले उतार वय असल्यामुळे सभास्थानी घरी जाण्याकरिता व तेथून परत घरी येण्याकरिता टांग्याची तजवीज करावी, असे सुचविले. साऱ्या व्याख्यानास अध्यक्ष या नात्याने हजर राहण्याची संमति देऊन त्यांनी जो उपकार दर्शविला, त्यापुढे टांग्याचा खर्च अगदीच क्षुल्लक वाटला. केळकर अध्यक्ष होण्यासाठी हपापलेले असत, असा या आठवणीचा ध्वन्यर्थ काढून कोणी मनात आणल्यास केळकरांची निंदा करण्याचा हेतु प्रस्तुत लेखकावर लादू शकेल. परंतु ज्यांची केळकरभक्ति आंधळी नाही, त्यांना या आठवणीतून केळकरांच्या गुणांचा बोध स्वीकारणे शक्य आहे.

कलेक्टरची व्याख्यानाला परवानगी मिळाली, केळकरांनी जागेची व अध्यक्षाची विवंचना चुटकीसरशी दूर केली, साऱ्या दिवसांच्या व्याख्यानाचे विषय व व्याख्याते ठरले आणि ता. २१ जुलै १९४५ या दिवशी व्याख्यानांचा प्रारंभ झाला. [नवाकाळचे २१ लेख व व्याख्यानसूत्राचा प्रारंभसुद्धा २१ व्या तारखेला हा योग करंदीकरांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात

व्यक्त केला.] प्रतिदिवशी श्रोत्यांची गर्दी वाढत चालली होती. शेवटच्या व्याख्यानाला जवळजवळ सहा हजारपर्यंत श्रोते जमल्याचा अंदाज अध्यक्षांनी वक्त्याला सांगितला. “ ता. १ आगस्ट हा टिळकांच्या पुण्यस्मृतीचा दिवस, त्या दिवशी दरसाल टिळकभक्तांचे पुण्याला जंगी संमेलन होत असते. त्या संमेलनाची गर्दी अशीच मोठी असली तरी फक्त टिळकभक्तांचा तो जमाव असतो. आताच्या सभांना बहुजिनसी श्रोतृवर्ग जमतो. भिन्न व्यवसाय, भिन्न मते असणारांचा हा श्रोतृसमुदाय एवढ्या मोठ्या संख्येने दर दिवशी जमावा हे या व्याख्यानमालेचे खरे यश समजले पाहिजे ” वगैरे आशयाचा केळकरांनी आणखी खुलासा केला. केळकरांनी केलेली व्याख्यान-कर्त्यांची ही निर्व्याज परोक्ष स्तुति सदैव संस्मरणीय वाटण्याजोगी आहे. केळकरांनी स्वतंत्र व्याख्यान देऊन केलेला समारोप मागील व्याख्यानांना शोभण्यासारखा दणकेदार होता. शेवटी बर्वे नांवाच्या गृहस्थांनी आभारप्रदर्शनपर भाषण करून इतिहासांतील सर्ववंद्य थोर व्यक्तींची अनन्वित निंदा करणाराला कठोर प्रायश्चित्त देण्याला पुणेकर समर्थ आहेत, असा इशाराही पुकारला. व्याख्यानमालेला मुंबईचे जाऊन-येऊन २०-२५ श्रोते उपस्थित राहात होते. भारत इतिहास संशोधक मंडळ आणि इतिहासज्ञ याकरिता देशभर ज्याचा गौरवाने निर्देश होतो, त्या पुणे शहरातून रानड्यांच्या खंडनाला कोणीही पुढे येऊ नये व मुंबईत ते काम पार पाडणारा निघावा, याविषयी रानडेप्रकरणाकडे लक्ष असणाऱ्या मुंबईकरांमध्ये अभिमानाची लाट उसळली होती. यामुळे ज्याना शक्य झाले ते पुण्यास व्याख्यानाला गेले. श्रोत्यांची गर्दी ही लोकांमध्ये रानड्यांनी उत्पन्न केलेल्या अस्वस्थतेची साक्ष समजणे प्राप्त आहे.

पहिल्या व्याख्यानात विस्तार होता, परंतु सत्त्व अत्यल्प होते. करंदीकरांनी स्वीकृत विषयाला धरून पुराव्यासह भाषण केले. श्री. फफे यांचे व्याख्यान रानड्यांनी उपयोगात आणलेले फलज्योतिष आणि वैद्यक यांच्या समाचाराचे होते. इतिहासात जन्मकुंडल्यांना आणि वैद्यकाला कोणी वेठीस धरीत नाही; पण रानड्यांनी पुरावा या नात्याने त्यांसही आपल्या लिखाणात अवसर दिल्याने त्याची सत्यासत्यता पारखून रानड्यांची मते खोडण्याला श्री. फफे यांच्याइतका योग्य व्याख्याता दुसरा सापडला नसता. कै. चिं. ग. कर्व्यांनी नाना फडणीसाच्या नीतिमत्तेची छाननी केली. व्याख्यानांच्या मालिकेत ‘ मुझे भी गिनो ’ या न्यायाने घुसलेल्या वक्त्याने १७९५–१८०० (सवाई माधवरावाच्या मृत्यूपासून नाना फडणीसाचा मृत्यु) हा कालखंड विवेचनार्थ घेतला होता; आणि आरंभ केला १७६१ (पानिपत) पासून. श्रोत्यांनी १०–१५ मिनिटे हा विषयान्तराचा गडबडगुंडा ऐकून घेतला व मग ‘ विषयाला धरून बोला ’, ‘ हा तुमचा विषय नव्हे ’ अशा अर्थाच्या आरोळ्या ठोकायला सुरवात केली. श्रोते ऐकत नाहीत, असे पाहून त्याने अध्यक्षांना विनवणी केली की, मी विषयावर लवकरच येईन, आपण श्रोत्यांना शांतवावे. केळकरांना या वक्त्याच्या लायकीबद्दल चांगलीच माहिती असल्याने ते हसतमुखाने उभे राहिले. तत्काळ श्रोत्यांचे आवाज बंद पडले आणि केळकरांनी श्रोत्यांना सांगितले की, वक्ता आपल्या विषयावर येण्याचे आश्वासन मला देत आहे; आपण त्याचे आश्वासन खरे धरू. तथापि तो जे बोलेल तोच त्याचा विषय असे समजून श्रोत्यांनी त्याचे भाषण ऐकावे. ज्यांना असा प्रकार पसंत नसेल, त्यांनी सभा सोडावी, पण आरड्याओरड्याने सभेचे गांभीर्य घालवू नये, अशी वक्त्याच्या वतीने विनंती आहे. केळकरांची केलेली ही वक्त्याची तरफदारी ऐकताना श्रोत्यांमध्ये खूप हशा पिकला. सभा कोणी सोडली नाही, पण सभेची शांतताही पुढे भंगली नाही. वक्त्याने निवडलेल्या कालखंडातील घडामोडींचा अभ्यासच केलेला नसल्यामुळे पानिपतच्या लढाईपासून खडकीच्या लढाईपर्यंतच्या कालक्षेत्रात त्याचा सैरावैरा संचार चालू होता. व्याख्यानमालेत हेच काय ते झडणाऱ्या पाकळ्यांचे फूल होते. त्यांच्यामागून म. म. श्री. दत्तो वामन पोतदारांचा क्रमांक होता. दत्तोपंतांच्या व्याख्यानाला पुस्तकांचे ओझे बरोबर असावे लागते. चारदोन पुस्तकाची हातपिशवी ही नेहमीच ते जवळ बाळगतात, पण व्याख्यानप्रसंगी व्याख्यानविषयाची पुस्तके त्या पिशवीत असलीच पाहिजेत, असा नियम बहुधा चुकत नाही. प्रस्तुत व्याख्यानाच्या दिवशी अर्धे पोते भरेल एवढी पुस्तके त्यांनी आणलेली होती. त्यांपकी पुष्कळातून खुणांचे लांबट कागदी तुकडे लांबवर बाहेर

डोकावत होते. पुस्तके व्याख्यानाच्या टेबलावर व्यवस्थेने (वक्त्याची बाजू सोडून बाकीच्या) तीन जागी लावण्यात १५–२० मिनिटे खर्ची पडली. आज पुस्तकातील पुराव्यांचा भडिमार होईल, अशी ती पुस्तके व त्यांतील खुणांच वाऱ्याने हालणारे कपटे पाहून श्रोत्यांची कल्पना झाली असेल. पण त्या भडिमारातून श्रोते वाचले. पुस्तकरचनेच्या तटबंदीने दत्तोपंतांच्या छातीपर्यंतचा भाग श्रोत्यांच्या डोळ्याआड गेला होता. एखाद्याने बुरुजा आडून लोकांना अर्धवट दिसत बोलावे, असा तो देखावा होता. पुस्तकांचा संभार पाहून इतकी पुस्तके कशाला ? असा सवाल कानावर पडताच " एकदम कालेजात प्रोफेसराचे काम करणाराला या ओझ्याचे रहस्य कळण्याची आशा नको. हायस्कूलचे विद्यार्थी व सामान्य श्रोते यांचे मानसशास्त्र ज्याला ठाऊक नाही, तो असे प्रश्न विचारतो. वक्तृत्वापाशी भरपूर पुस्तके ठेवली म्हणज वक्तृत्वाचे वजन वाढते, लोकावर त्याचा योग्य परिणाम घडतो ". एकीकडे पुस्तके मांडीत दत्तोपंतानी झटकेदार उत्तर दिले. व्याख्यानात फक्त एकच पुस्तक (इतिहाससंग्रह मासिक) उघडून त्यातले नारायणरावाच्या खुनाचे कारस्थान कोणत्या स्वरूपाचे होते याबद्दल राघोबाने केलेली वाच्यता नमूद असलेले पत्र वाचून दाखविले. बाकीची पुस्तके निपचीत राहून दत्तोपंतांच्या व्याख्यानाचे वजन कुणालाही न कळत त्यांच्या लाडक्या कल्पनेप्रमाणे जणू काय वाढवीत होती.

दत्तोपंत व्याख्यानाकरिता उभे राहताच त्यांनी श्रोत्यांना पुस्तकाच्यावरील व आतील बिनोटाच्या डावाची नाटकी चित्रे दाखविली. ती चित्रे व्यासपीठाजवळच्या थोड्याशा श्रोत्यांना दिसली असतील ' ही चित्रे नाटकातील देखाव्याची आहेत. यावरून साऱ्या पुस्तकाची रचनाच नाटकी थाटाची असल्याची खात्री पटेल ' असे बोलून पहिल्या चारदोन वाक्यात त्यानी श्रोत्यांना आकर्षून घेतले व ते आकर्षण अखेरपर्यंत कायम राखून शेवटी त्यावर रानडयांनी नाना फडणीससंबंधांत लोकांनी कसे वागावे म्हणून ज्या सूचना पुस्तकात लिहिलेल्या आहेत. त्या रानडयांवर उलटवून कळस उभारला. नानाने आपल्या कारभारात किती प्रकारच्या द्रोहाची पापे आचरली याची एक लांबलचक यादी रानडयांनीं आपल्या पुस्तकात दिलेली आहे. नानाचे चित्र पाहिल्यास त्या पातकाचे परिमार्जन होण्यासाठी चित्र पहाणाराने सचैल स्नान करावे; अशा धर्तीच्या त्या सूचना आहेत. त्या द्रोहाची यादी सावकाश वाचीत व रानडयांनी ती कशी लागू पडते हे त्याना पटवीत दत्तोपंतांनी ' सारांश काय की हा लेखक नानाद्रोही आहे, असे सिद्ध झाले ' हे वाक्य उच्चारतांनाच टाळ्या कडकडू लागल्या होत्या व वाक्य संपल्यावर टाळयांच्या कडकडाटाने सभागृह बराच वेळ दणाणून गेले. त्यात हशाचेही मिश्रण होते. ज्या पत्राच्या आधाराने नारायणरावाची आत्महत्या रानडयांनी निश्चित केली होती, त्या पत्रातील गारद्यांनी नारायणरावास मारल्याची वाक्ये दत्तोपंतानी वाचून दाखविली. व नारायणरावाचा खूनच झाला ही वस्तुस्थिति श्रोत्यांच्या हृदयावर ठसविली. नानाद्रोही या शब्दातील नानाचा द्रोही व अनेक प्रकारांचा द्रोही हा श्लेष जसा व्याख्यानात स्पष्ट न करताही श्रोत्याना समजला तसाच तो चाणाक्ष वाचकांना आताही समजण्याला हरकत नाही.

त्यानतरची दोन व्याख्यान नवाकाळमधील लेखकाने दिली. एका व्याख्यानात रानड्यांच्या पुस्तकातील विपर्यस्त विचारांचा परामर्श होता तर दुसऱ्यात एकट्या राघोबाच्या चरित्राचे परीक्षण होते. नानासाहेब पेशव्याच्या कारकीर्दीत राघोबा लहानाचा मोठा झाला. त्याच्या गुजरातमधील, जाटवाड्यातील, दिल्ली पंजाबाकडील स्वाऱ्यामधून मराठ्यांना जे विजय लाभले त्याचे श्रेय फौजेबरोबरील खासा स्वारी या नात्याने राघोबाच्या वाट्यास गेले असले तरी प्रत्यक्ष नेतृत्वाची कामगिरी त्याने काहीच केलेली नाही. नानासाहेब, भाऊसाहेब यांच्याविषयी तो मनात मत्सर बाळगून होता, तर धाकटा भाऊ जनार्दन याचा तो उघड हेवा करीत होता, उदगीरच्या लढाईतील राघोबाच्या पत्रांचा मथितार्थ, पानिपतावर तो नव्हता म्हणून लढाई फिसकटली, हा गैरसमज, नानासाहेबाच्या मृत्यूनंतर माधवरावाविरुद्ध त्याने केलेले उठाव व योजलेली कारस्थाने, नारायणरावाचा खून, बारभाईपुढे त्याचा पळ, या पळापळीच्या काळात त्याला मिळालेली ' भरारी ' ही पदवी, (लांब लांब मजला मारून शत्रूस गाठणारा हा या पदवीचा अर्थ नसून शत्रूच्या फौजांना शिताफीने

चुकवून सहीसलामत निघून जाणारा असा मराठीचा अर्थ होता) इंग्रजांच्या आश्रयास जाणे, इंग्रज सोबत्यांनी वर्णिलेले त्याचे दुर्गुण, भाऊच्या तोतयाने केलेल्या धामधुमीच्या वेळी तो तोतयाच अशी खात्री असूनही त्याच्या धामधुमीचा फायदा घेण्याची इच्छा, अखेरीस बारभाईंचा आश्रय व कोपरगावी निधन; अशा रीतीने त्याचे समग्र जीवनवृत्त श्रोत्यांनी ऐकले. राघोबासारख्या दुष्ट कपटी पुरुषाची बायको म्हणून आनंदीबाई ही निंदेचा विषय बनली; वस्तुतः तिचा ‘ध चा मा’ याप्रकरणाशी संबंध नव्हता. ‘ध’रावे हा एक कट व ‘मा’रावे हा दुसरा कट; एकाची खलबते कारभाऱ्याशी व दुसऱ्याची खलबते गारद्यांशी निराळी एकट्या राघोबानेच केलेली होती व या प्रकाराची कबूली गोपिकाबाईंस भेटण्यासाठी तिच्या आग्रहापायी घ्याव्या लागलेल्या प्रायश्चित्ताच्या वेळी खुद्द राघोबानेच दिलेली आहे, ही माहिती श्रोत्यांना थोडी अश्रुतपूर्व वाटली. नारायणरावाचा खून झाला म्हणून त्याच्या अंगी नादानपणा चिकटविण्यात येतो तो कसा चूक आहे, या प्रश्नाचाही विचार दुसऱ्या व्याख्यानात केला होता. गंगाबाईला सती जाऊ न देण्यात ती गर्भवती, न जाणो उद्या तिला मुलगा झाल्यास गादीला मालक लाभेल, असा उदारपणा आनंदीबाईने दाखविल्याच सांगण्यात येते. गंगाबाईला सती जाऊ देणे म्हणजे गार्द्यांनी केलेल्या नारायणरावाच्या छिन्नविच्छिन्न देहाचा अंत्यसंस्कार समारंभाने उघडपणे शेकडो लोकांसमक्ष करणे व असे करणे हे राघोबाला अतिशय धोक्याचे होते, यामुळे गंगाबाईला खोलीत कोंडून नारायणरावाच्या देहाचे मध्यरात्रीस बोभाटा न होऊ देता दहन करण्यात आले. नानासाहेबाच्या बरोबर वागलेल्या ज्या लोकांना आपण वयाने व अनुभवाने वडील म्हणून माधवरावाने आपल्या ओंजळीने पाणी प्यावे असे वाटत होते, ते नारायणराव गादीवर येण्याच्या सुमारास वयाने आणखी वाढल्यामुळे नारायणराव आपल्या कह्यांत राहाण्याला तयार नाही, असे पाहून राघोबाच्या कटांत मिसळले. राघोबा आपल्या तंत्रात वागेल तर ठीक नाहीतर नारायणरावाला कैदेतून सोडून राघोबाला शह द्यावयाचा असा ‘ध’रावेवाल्यांचा दुहेरी उद्देश होता. त्यांना कारभारात आपला वरचष्मा हवा होता. एक राजा जाऊन दुसरा तरुण राजा आला की मागल्या कारभारात वावरणाऱ्यांना आपण मुरब्बी, आपण नव्या राजाहून किती तरी जास्त पावसाळे पाहिलेले, अशी भावना असते, म्हणून ते नव्या राजाला आपल्या शहाणपणाचा तोरा दाखवायला जातात व नव्या सत्तारूढाला ते रुचत नाही; तो आपल्या अधिकाराने त्याच्या शहाणपणाला मानीत नाही. हा प्रकार पेशवाईत घडला. नाराणरावाच्या अंगावर पेशवाईची वस्त्रे चढल्यानंतर जुन्या कारभाऱ्यांशी त्याचे पटेना, जुन्यानव्याचा हा कलह स्वाभाविक आहे. या कलहाने नारायणरावाचा बळी घेतला, आणि ही हत्या राघोबासही बाधली; इतकी की पेशवेपदास आंचवून त्याने १७७३ च्या सप्टेंबर अखेरीस जे एकदा पुणे सोडले ते कायमचेच. पुनः पुण्याचे दर्शन त्याला घडले नाही. राघोबा हा पेशवाईत अवतरलेला शाप होता. पेशवाई साफ बुडविण्याचे काम त्याच्या हातून पूर्ण झाले नाही, ते त्याच्या मुलाने पुरे केले. राघोबाने पेशवाईचा पाया खिळखिळा करून इंग्रजाचे वर्चस्व वाढण्याला संधी दिली हे कबूलच करायला पाहिजे. झालेल्या व्याख्यानातील प्रतिपादनाचा हा थोडासा गोषवारा आहे. व्याख्याने सपल्यावर कृष्णराव मराठ्यांनी वक्ते आणि निवडक स्नेहीसोबती बोलावून चूर्म्याचे लाडू व कॉफी, अशा खाद्यपेयांनिशी एक छोटा समारंभ पार पाडला. अध्यक्षांच्या समारोपाचे स्वरूप मागे वर्णिलेले आहे.

रानड्यांचे पुस्तक व त्याचे कित्येक महिने खरेदीच्या रूपाने होणारे स्वागत, इतिहासज्ञ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तींचे मौन आणि एखाद्या नियतकालिकात होणारा त्या पुस्तकाचा पुरस्कार, याच्या अनुषंगाने मराठेशाहीच्या इतिहासाची शाळाकॉलेजांच्या अभ्यासक्रमातून दिसणाऱ्या दैन्यावर शेवटच्या व्याख्यानात टीका केलेली होती. प्राथमिक आणि माध्यमिक शाळात मराठेशाहीचे निर्विवाद स्वरूपाचे स्थूल ज्ञान महाराष्ट्राच्या विद्यार्थीसमाजात पक्के रुजविल्याखेरीज मराठेशाहीवर यथेच्छ हात टाकण्याचे जे साह्य मधून मधून आचरले जाते ते बंद पडणार नाही; कॉलेजात मराठ्यांच्या इतिहासाला महत्त्व नाही अर्थात स्थानही नाही, संशोधकाचे कष्ट यामुळे वाया जातात. जनतेने आपले इतिहासप्रेम

वादविवादाखेरीज इतिहासज्ञानाची दुर्दशा थांब-ण्याची आशा नको, इत्यादि आशयाचे विचार मांडले गेले होते. त्याचा परिणाम ज्या श्रोत्यांवर झाला, त्यातल्या एकाने शेवटच्या वक्त्याला आपल्या घरी बोलावले. त्यावेळीं पुण्याचे आणखी बरेच चांगले शिक्षणसंपन्न नागरिक उपस्थित होते. ज्याने हा प्रसंग योजला त्याने ख्यालीखुशालीचे संभाषण संपल्यावर 'सामान्य नागरिकाला उपयोगी पडेल, असे मराठ्यांच्या इतिहासाचे आटोपशीर आणि बहुतांशी विश्व-सनीय असे पुस्तक सांगा. सरदेसायांच्या रियासती वाचायच्या म्हणजे एक दिव्यच आहे. त्यांचे नाव घेऊ नका. मी म्हणतो तसे थोडक्यात सारे सांगणाऱ्या पुस्तकाचे नाव बोला.' याप्रमाणे त्याने आपले मनो-गत सडेतोड रीतीने मांडले. सगळे निमंत्रित मुख्य पाहुण्याच्या तोंडाकडे पाहू लागले. दोन तीन मिनिटे स्तब्धतेत गेली. पाहुण्याला एकाही पुस्तकाचे नाव सांगता आले नाही. "जर माझ्या अपेक्षेचे पुस्तक मराठी साहित्यामध्य नसेल तर दोष कुणाचा ? जे अभ्यासी मानले जातात त्यांचा का आमच्यासार-ख्यांचा ?" हा प्रश्न पेचाचा होता. दोष अभ्यास-कांचा हे उत्तर उघड असूनही त्याचा उच्चार पाहु-ण्याला पेचात टाकणारा होता. 'ज्यांनी इतिहासाचा व्यासंग ठेवला आहे व ज्यांना सर्वसामान्य साक्षर जनतेला इतिहासाचे योग्य ज्ञान असावेसे वाटते-तशी तळमळ आहे, त्यानी लहानशा ग्रंथांत इतिहासाचे जास्तीत जास्त उपयुक्त आणि विश्वसनीय ज्ञान देणारे पुस्तक लिहिणे अवश्य आहे असे नाही का तुम्हाला वाटत ?" या प्रश्नाचे उत्तर पाहुण्याच्या आंगलट येणारे असल्याने तो म्हणालाः– "पुणे शहरात बरेच इतिहासाचे अभ्यासी आहेत. तुम्ही पुण्याचे, ते तुम्हाला भेटत असतील, त्याना आग्रह करा. आग्रहा-मागे द्रव्यप्राप्तीची आशा असेल तर ते हे काम कर-तील." "रानड्यांच्या पुस्तकाने इतिहासाच्या अभ्या-साचा पुण्यातील कस जगाला दाखविला आहे. त्यांची शिफारस नको" असे बजावून त्याने पुण्यातील इति-हासज्ञांची नावे घेत घेत त्यांच्या योग्यतेची परीक्षा आरंभली. नंतर 'तुमच्याजवळ पुस्तक छपाईसाठी पैसे नसतील तर मी पैसे देतो, आकडा सांगा. विश्वास वाटण्याकरिता येथे जमलेल्यांच्या साक्षीने म्हणाल तर आता रकम बँकेत या कामाखातर वेगळी ठेवतो' हा गळेपडूपणा साहजीकच नम्रपणाने अव्हेरला गेला. इंग्रजी वाङ्मयात इंग्लंडच्या इतिहासाची पुस्तके आहेत; हिंदुस्थान देशाच्या इतिहासाची योग्य कल्पना देणारी ५०० इतक्या संख्येची पुस्तके इंग्रजांनी शाळाकाले-जांच्या उपयोगापुरतीच नव्हेत तर केवळ ज्ञानोपास-नेच्या स्वान्तःसुखार्थ प्रसिद्ध केलेली आहेत. ती मराठेशाहीची नसून साऱ्या भारताला गवसणी घाल-णारी आढळतात. मराठी भाषेमध्ये तशी पुस्तके नाहीत ही उणीव या संवादांने उघडकीस आणली व ती सर्वांच्या निदर्शनास यावी म्हणूनच ही हकीकत येथे सादर केलेली आहे. त्या प्रसंगानंतर आता सतरा वर्षे लोटली, तरी ही उणीव कायम आहे.

महाराष्ट्रात रानड्यांच्या पुस्तकाने जी खळबळ माजविली, तिचा आणखी एक पुरावा म्हणजे नवा-काळमधील लेखकाला महाराष्ट्राच्या अनेक शहरातून याच विषयावर व्याख्याने देण्यासाठी निमंत्रणे आली हा होय. इंदूर, ग्वाल्हेर, नागपूर, धुळे, दक्षिण हद्राबाद इत्यादि शहरी त्याने सवडीप्रमाणे जाऊन व्याख्याने दिली. प्रत्येक शहरी व्याख्यानाला श्रोत्यांची गर्दी लोटत असे. कॉलेजच्या रजेचे नियम काटेतोल न पाळले गेल्यामुळे रजेच्या कायदेशीर मुदतीच्या बाहेरील दिवसानिमित्त व्याख्यात्याला पगारकाटीचे प्रायश्चित भोगावे लागले. या प्रकाराचा विषाद निरसण्याकरिता त्याने केलेल्या कामगिरीबद्दल संस्थेच्या अहवालात दोन चार ओळींची एखाद्या स्तुतिपर शब्दासह नोंद छापल्याचे त्याला सांगण्यात आले. व्यक्तिशः होणारी व्याख्याने सोडली तर पुण्यातल्यासारखा एक व्याख्यानसप्ताह १९४५ च्या नोव्हेंबरात गाजला. यावेळी व्याख्याते निराळे होते. त्यांत पुण्याचेही एक दोन व्याख्याते– श्री. दि. वि. काळे, श्री. वा. सी. बेंद्रे –होते. यातल्या एका व्याख्यानाला कै. न. चिं. केळकर अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते. ज्या दिवशी ते उपस्थित होते, त्या रात्री त्यांच्या 'तोतयाचे बंड' या नाटकाचा प्रयोग करण्यात आला. तोही त्यांनी पाहिला व भाष-णही केले. वेळासला नाना फडणीसांचे चिरस्थायी दृश्य स्मारक व्हावे, ही कल्पना या धामधुमीच्या काळात बळावली होती. १९४५ पूर्वी नुसता पुण्य-तिथीचा उत्सव करावा एवढेच ध्येय होते. आता ते

बेदलल. त्याकरिता लागणारें द्रव्य जमेल अशी लोकांच्या उत्साहाने बळकट आशा उत्पन्न केली होती. नाटकाचा प्रयोग त्याच हेतूने योजलेला होता. प्रयोगाचे उत्पन्न फारसे लाभदायक ठरले नाही, पण तेथे बऱ्याच देणग्या जाहीर झाल्या. नंतर याच नाटकाचा पुण्यास जो प्रयोग झाला तो द्रव्यदृष्ट्या अधिक लाभाचा ठरला व त्यानच नानाफडणीसांचा अर्धपुतळा, त्यावर मेघडंबरी वगैरे कामे पुढे थोड्याच अवकाशात सिद्धीस गेली. काम करणारांचा स्वार्थत्यागही या सिद्धीत जमेस धरणे आवश्यक आहे.

हे स्मारक ज्या जागेत थाटले ती जागा वस्तुतः नानांची पण त्यांच्या उपाध्ये घराण्यांतील एकाच्या हाती गेलेली होती. केवळ योगायोगाने ती जागा स्मारक मंडळाच्या चिटणीसांनी मिळविली. हा योगा-योग सांगण्यासारखा आहे. ही जमीन त्याच्या तावडी-तून बऱ्या बोलाने सुखासुखी सुटण्यासारखी नव्हती. परंतु हा गृहस्थ कर्जबाजारीपणाच्या चक्रात सापडला तेव्हा एकदा आपले धनको पोलिसाकरवी गिरफदार करणार आहेत अशा भ्रमाने तो पछाडला जाऊन त्याने वेलासहून दडी मारली व मुंबई गाठली. मुंबईत त्याला सोमण हेच आपला बचाव करतील असे वाटून तो सोमणांच्या घरी पोचला. सोमणांनी त्याला राहून घेतले, धीर दिला त्याच्या धावपळीची सर्व कारणे विचारून घेतली. त्याच्या कर्जाची रक्कम रु. २५०० च्या वर थोडीशी होती. ही रक्कम देऊन प्राप्त संकट निवारल्यास त्या रकमेपोटी ती जमीन आपल्याला द्यावी, अशा स्वरूपाची चर्चा सोमणांनी आरंभली. धरपकडीसंबंधाचा ऋणकोचा ग्रह बलवत्तर असल्या-मुळे आढेवेढे घेत घेत त्याने अखेरीस त्या रकमेपोटी जमीन विकण्याची कबूली दिली. 'शुभस्य शीघ्रं' हा न्याय स्वीकारून सोमणांनी त्याच्याकडून साध्या कागदावर पेन्सिलीने ही कबूली लिहविली. एवढया-वरच न थांबता कर्जाची रक्कम व कर्जदार यांना बरो-बर घेऊन वेळासला तावडतोब फेरी मारली. त्या जमिनीचे खरेदीखत कायद्याच्या सर्व संस्कारानिशी पूर्ण करताना आणखी थोडी सोमणांची ओढाताण झाली. हे जागेच्या खरेदीविक्रीचे प्रकरण सुमारे १० दिवसाच्या आत निकालात काढले जाऊन ह्या जागी एक लहानसे स्मारक सध्या उभे आहे. एका गावच्या बोरी-बाभळींना एकमेकांच्या काटयांची उत्तम ओळख असते. अशा अर्थाची मराठी म्हण ध्यानात ठेवून सोमणांच्या खराशीलतेचा विचार करणे अवश्य आहे. परंतु अनुकूल प्रसंग दिसताच त्यांनी मागे पुढे न पाहता हाताचा सढळपणा दाखविला हा त्याचा गुण महत्त्वाचा आहे. नाना फडणीसांचा स्मरणोत्सव अंगा-वर घेताना सोमणांच्या ठिकाणी जी ईर्ष्या वसत होती तिचीही तीव्रता प्रस्तुत औदार्यगुणाच्या द्वारे निद-र्शनास येणारी आहे.

श्री. स. शं. देसाई

कोकणीवाद आणि सत्यशोधन

गतसालच्या डिसेंबर महिन्यात पणजी गोवा येथे भरलेल्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यानी जे भाषण केले, त्याच्यावर गोमंतकातील आणि गोमंतकाबाहेरील कोकणीवाद्यानी टीकेची नुसती झोड उठविली. अक्षरशः शिमगा साजरा केला असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. मुंबई शहरातील एका कोकणी नियतकालिकाने तर तर्कतीर्थांची तुलना महात्मा-गांधीच्या मारेकऱ्याशी देखील करण्यास कमी केले नाही. पण ज्या एका गांधीवाद्याच्या प्रेरणेने कोकणी भाषेची ही चळवळ सुरू झाली, त्या गांधीवाद्याना आपल्या अनुयायांच्या शिवराळ टीकेला लगाम घालण्याची सद्बुद्धि सुचली नाही. यावेळीं त्यांची साधनशुचिता कुठे गेली, असा प्रश्न गोमंतकातील लोकशाहीप्रेमी लोकांना पडल्यावाचून राहिला नाही. ह्या हिटलरी तंत्राचा अवलंब करून कोकणीवादी कोकणीभाषा गोमंतकीयांच्या माथी लादण्याचा अश्लाध्य प्रयत्न करीत आहेत, असा त्यांचा समज झाला आहे.

ह्या प्रस्तावाचे कारण, की, नवभारत मासिकाच्या एप्रिल महिन्याच्या अंकात कुणी नारायण प्रभु ह्या नावाच्या कोकणीप्रेमी गृहस्थानी ' प्रज्ञावंत आणि गोमंतकाचा प्रश्न ' ह्या नावाचा लेख लिहून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या भाषणातील काही मुद्यांबाबत आक्षेप घेतला आहे. त्याचे हे आक्षेप त्यानी जरी वैयक्तिकरीत्या घेतले असले, तरी ते बहुतेक सर्व कोकणीवाद्यांच्या आक्षेपाशी जुळते असल्याने गोमंतकातील कोकणी-मराठी वादाकडे उच्च पातळीवरून बघणाऱ्या माझ्यासारख्या लोकानी त्या आक्षेपाचा समाचार घेणे हे त्याचे कर्तव्य ठरते.

१. श्री. प्रभु हे पृच्छा करतात : " कोकण ह्या शब्दाने कोणता भूभाग दर्शविण्यात आला आहे हे कळत नाही. "

उत्तर : कोकणचा उल्लेख प्राचीन संस्कृत साहित्यात, अशोकाच्या शिलालेखात आणि सुविख्यात चिनी प्रवासी ह्युयानत्सांग ह्याच्या प्रवासवर्णनात आढळतो. ह्युयानत्सांग म्हणतो की, ' कोककिन्न पुलो किंवा कोकण हा देश द्रविड देशाच्या उत्तरेस २००० लीवर म्हणजे अंदाजे ३०० मैलांवर आहे. सुविख्यात बुद्धधर्म प्रसारक मोग्गलिपुत्त तिस्स ह्याने इ. स. पूर्व २४७ च्या सुमारास वनवासी आणि अपरान्त ह्या भागात धर्मप्रसारासाठी शिष्य पाठविले होते, अशी माहिती उपलब्ध आहे. ज्या अर्थी वनवासी आणि अपरान्त अशी दोन नावे प्राचीन साहित्यात आढळतात, त्या अर्थी अपरान्त हे कर्नाटक देशाहून वेगळे असल्याचा निष्कर्ष निघतो. आमच्या मते, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्याना अभिप्रेत असलेले कोकण हे तुळुनाडूच्या उत्तरेकडील असून ते जुने अपरान्त आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेस समुद्रालगतचा, मराठी समाजाची वसती, व मराठी ग्रामसंस्था असलेला प्रदेश कोकण होय, असा त्याचा आशय दिसतो. प्राचीन संस्कृत साहित्यात त्रिंबकपासून कन्याकुमारीपर्यंतचा जो प्रदेश ते कोकण अशी कोकणची व्याप्ती सांगितली आहे. आणि आमच्या माहितीप्रमाणे कोकणीवाद्याना ही व्याप्ती सागरी प्रांताच्या निर्मितीच्या दृष्टीने मान्य आहे. पण कोकणीवादी एक गोष्ट विसरतात की, प्राचीन काळी ह्या लांबच लांब प्रदेशात कदाचित एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचे जरी वास्तव्य असले, आणि त्याची संस्कृतीही जरी एक असली, तरी कालांतराने ह्या प्रदेशात मल्याळी, कन्नड, तुळू आणि महाराष्ट्रीय लोकानी वसाहती केल्याने त्यांची सांप्रतची भाषिक विभागणी झाली. ह्या अर्वाचीन विभागणीस अनुसरून सांप्रतच्या कोकणात मुंबई शहर, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी हे तीन जिल्हे व गोवा आणि कारवार तालुका ह्यांचा अंतर्भाव होतो. ग्रँट डफ ह्या मराठ्यांच्या आंग्ल इतिहासकाराने दक्षिणेस सदाशिवगड

व उत्तरेस तापीनदी अशी कोकणची दक्षिणोत्तर सीमा दिली आहे. ह्या प्रदेशाची लांबी अंदाजे ३०० मैल व रुंदी २५ ते ३० मैल आहे.

२. श्री. प्रभु ह्याची दुसरी पृच्छा : " महाराष्ट्रीय संस्कृतीची व्याख्या न केल्याने विधानाचा खरेखोटेपणा ताडता येत नाही. "

उत्तर : महाराष्ट्रीय संस्कृतीची व्याख्या सरळ आणि सोपी आहे. ज्या प्रदेशात मराठे, भंडारी, कुणबी, महार, इत्यादि लोक राहातात तो देश महाराष्ट्र आणि ह्या मराठी लोकांची संस्कृति म्हणजे महाराष्ट्रीय संस्कृति. कोकणात ठाणे जिल्ह्यापासून कारवारतालुक्यापर्यंतच्या टापूत प्रस्तुत जमाती राहातात म्हणून हा टापू महाराष्ट्राचा भाग आहे. गोमंतकातही ह्या चार जमाती आहेत. तिकडे महारवाडे आहेत. महाराना तिकडे गावकीत हक्क आहेत. गोमंतकातील काही जत्रामध्ये तर महाराचा मान पहिला असतो. महाराचा ढोल वाजल्याशिवाय जत्रातील 'नेमा'स सुरुवात होऊ शकत नाही. हा मराठी महार कारवार तालुक्याच्या पलीकडे आढळत नाही. द्रविड देशात 'परिया' आहेत 'मडिगा' आहेत पण महार नाहीत. अशीच भिन्नता ग्रामदैवतांच्या बाबतीतही ह्या दोन्ही ठिकाणी आढळते. कोकणांत भैरव हे ग्राम दैवत सगळीकडे आढळते. गोमंतकात त्याला बेताळ म्हणतात. शिवाय 'निराकार' किंवा 'निरंकार' हे ग्रामदैवतही गोव्यात आढळते. पण ही तिन्ही ग्रामदैवते कर्नाटकात आढळत नाहीत. 'व्हाईटहेड' ह्या नावाच्या एका इंग्रज मिशनऱ्याने पुष्कळ वर्षामागें लिहिलेले The Village Gods of South India ह्या नावाचे पुस्तक उपलब्ध आहे. ह्या पुस्तकात दक्षिण भारतातील ग्रामदैवतांची आणि अस्पृश्य जमातीची माहिती दिली आहे. त्यात भैरव हे कोकणातील ग्रामदैवत आणि महार जमात आढळत नाही.

कारवार तालुक्याच्या पलीकडील लोकांच्या आडनांवांची गोमंतकातील किंवा कोकणातील आडनावाशी तुलना करता तिकडील आडनावे भिन्न वाटतात. दक्षिणेकडील लोकांची आडनावे व्यक्ति नावाच्या पूर्वी येतात. उदाहरणार्थ : सदानंद कुमठा, गणेश भटकळ, शशिकात होनावर, बेनेगल रामराव, सुशिला कोडीकल, वगैरे. ह्याच्या उलट गोमंतकातील आणि इतर कोकणातील आडनावे व्यक्तिनामाच्या नंतर येतात. उदाहरणार्थ : कुंडईकर, खांडेपारकर, बोरकर, खालवडकर, कारापूरकर, नेगर्सेकर, पेडणेकर, केळूसकर, जोगळेकर, कालेलकर, कालेकर, कार्लेकर, वगैरे. गांव शब्दाच्या अंती असलेली नावे गोमंतकात आणि महाराष्ट्रात पुष्कळ आढळतात. उदाहरणार्थ, मडगाव, मुरगाव, ताळगाव, शिरगाव, मोरगाव, बुधगाव वगैरे. अशी ग्रामनामे कारवार तालुक्याच्या पलीकडे आढळत नाहीत. गोमंतकातील आणि कारवार तालुक्यातील मराठे हे तिकडे घाटावरून आणि कोकणातून गेले आहेत. ही वस्तुस्थिती Os Hindus & a Republica ह्या पोर्तुगीज ग्रंथाच्या लेखकाने मान्य केली आहे. तो म्हणतो की, गोमंतकातील मराठे हे घाटावरून आले. त्यांनी गोमंतकात ग्रामसंस्था स्थापन केल्या. त्यांच्यापूर्वी गोमंतकात ग्रामसंस्था अस्तित्वात नव्हत्या.

उकारान्त आडनावे हे एक महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य गोमंतकातही आढळते. उदाहरणार्थ, धेपे, केंकरे, महांबरे, खटखटे, कडकडे, वगैरे. कारवार तालुक्यात साळुंके, दळवी, पवार, कदम, राणे, सावंत ह्या आडनावाची मराठा घराणी आढळतात. कारवारच्या पलीकडे ही मराठी आडनावे आढळत नाहीत. सानुस्वार एकारान्त ग्रामनामे हेही महाराष्ट्राचे आणि गोमंतकाचे आणखी एक वैशिष्ट्य. उदाहरणार्थ, पुणे, ठाणे, कुर्ले, वेंगुर्लें, शिरोडे, कवळे, पेडणे, वेरडे, पारोडे वगैरे.

एकाच नावाची दोन गावे असल्यास त्यांचा बुद्रुक आणि खुर्द अशा उपाधींनी उल्लेख करण्याचा प्रघात महाराष्ट्रात आहे. तसाच तो गोमंतकातही आहे. उदाहरणार्थ, आंबेडे बुद्रुक आणि खुर्द, मालोळी बुद्रुक आणि खुर्द. तीच गोष्ट मौजेचीही आहे. ग्रामनामामागे 'मौजे' लावण्याची पद्धत जशी महाराष्ट्रात आहे तशीच ती पूर्वी गोमंतकातही होती. पूर्वी गोमंतकातील ग्रामसंस्थांचे आणि देवालयांचे दप्तर मराठीत असे. त्यात गावामागे मौजे लावलेले आढळते. उदाहरणार्थ मौजे काकोडे, मौजे पाळोळे, मौजे नगर्से. आज देखील जुनी माणसे पत्र लिहिताना मौजेचा उपयोग करताना आढळतात.

देसाई, देशपांडे, देशप्रभु ह्या खास महाराष्ट्रीय आडनावेवजा पदव्या जशा महाराष्ट्रात आढळतात, तशाच त्या गोमंतकातही आढळतात. देसाई आणि सरदेसाई ही पदवी गोमंतकातील मराठ्यात आणि ब्राह्मणातही आढळते. कारवारच्या पलीकडे, ह्या पदव्या आढळत नाहीत, कारवार तालुक्यात आढळतात. रणमल्ली हा महाराष्ट्रीय खेळ गोमंतकातील मराठ्यामध्येही आढळतो. कारवार तालुक्याच्या पलीकडे तो आढळत असेल असे वाटत नाही.

गोमंतकात आणि महाराष्ट्रात समायीक असलेल्या गोष्टींचा नामनिर्देश करावयास गेल्यास तो एक ग्रंथच होईल. ह्या लेखाचा विस्तार मर्यादित असल्याने लेखणी आवरती घ्यावी लागते.

३ श्री. प्रभु ह्यांचा तिसरा आक्षेप असा : "इ. स. च्या सातव्या शतकापासून आतापर्यंतच्या इतिहासात गोमंतकाच्या मध्य आणि दक्षिण भागात मराठी सत्तेचा प्रभाव केव्हाच नव्हता. उत्तर भागावरही मराठी अंमल एका शतकापेक्षा जास्त नव्हता. म्हणून इतिहासाची साक्ष काढल्यास तर्कतीर्थांच्या वरील विधानाचा फायदा कर्नाटकालाच मिळण्याची शक्यता आहे."

उत्तर : राजकीय इतिहासाचा अर्थ न समजल्यामुळे हे विधान केले आहे. राजसत्ता कोणाची यावरून प्रदेश कोणत्या समाजाचा हे ठरविणे अशक्य होय. भारतावर मोगलबादशाहांची व इंग्लंडवर रोमन सम्राटांची सत्ता होती म्हणून भारतास मंगोलिया व इंग्लंडला रोमनभूमि कोणी कधी म्हटलेले नाही. श्री. प्रभु ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे गोमंतकाच्या मध्य आणि दक्षिण भागावर मराठी सत्तेचा प्रभाव नसेलही. पण त्याचा फायदा कर्नाटकाला कसा मिळू शकतो ? श्री. प्रभु ह्यानी आपल्या विधानाला ऐतिहासिक पुराव्याचा आधार द्यायला नको होता का ? घटकाभर मान्य करूया की, मध्य आणि दक्षिण गोमंतकावर मराठी सत्तेचा प्रभाव नव्हता. पण अशी स्थिती महाराष्ट्राच्या आणखीही काही भागात होती. उदाहरणार्थ खानदेशात इ. स. च्या सुरुवातीपासून इ. स. १७६० पर्यंत म्हणजे जवळ जवळ सातशे आठशे वर्षेपर्यंत मराठी सत्ता नव्हती. इ. स. च्या सुरुवातीला खानदेशावर औध येथील एक रजपूत राजा राज्य करीत होता. तदनंतर हा प्रांत आंध्रानी जिंकून घेतला. पुढे तो पश्चिम भागातील क्षात्रपाल राजाकडे गेला. तेराव्या शतकात तो अल्लाउद्दीन खिलजीने जिंकला. त्यावेळी तिकडे एक चौहानवंशी राजा राज्य करीत होता. अखेर १७६० साली तो मराठ्यांनी जिंकला. पण चाळीस पन्नास वर्षांनी तो इंग्रजी अमलाखाली गेला. ह्या वरून खानदेश हा महाराष्ट्राचा भाग नाही असे म्हणता येईल का ? असाच इतिहास नाग-विदर्भ, मराठवाडा आणि नगर वगैरे मराठी प्रदेशाचाही थोडयाफार प्रमाणात आहे. उदाहरणार्थ, ठाणे जिल्ह्याच्या उत्तर भागात रजपूत राजे राज्य करीत होते. पोर्तुगीज इतिहासकारानी ह्या राजांचा इतिहास दिला आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज ह्या दोघांनी त्याना आपल्या अंकित केले. ज्याना कोल राजे म्हणतात ते हेच ते रजपूत संस्थानिक होत.

गोव्याचा इतिहास देखील वरच्यासारखाच आहे. गोव्याचा प्राचीन इतिहास सोडल्यास मध्ययुगीन कालात गोव्यावर देवगिरीच्या यादवांनी राज्य केले, हे तरी श्री. प्रभु ह्याना माहीत आहे की नाही ? सुविख्यात कोंकणी साहित्यिक कै. शणै गोयबाब ऊर्फ वर्दे वालावलीकर ह्यानी आपल्या 'गोयकाराली गोया भायली वसणूक' ह्या ग्रंथात म्हटले आहे की देवगिरीचे यादव हे गोमंतकांतील लत्तलपूर ऊर्फ लोटली येथील राष्ट्रकूट राजांचे वंशज होत. लत्तलपूर येथील राष्ट्रकूट राजघराण्यातील एक पुरुष मराठवाड्यात गेला व तेथे त्याने आपले राज्य स्थापन केले. वेरुळचे जगप्रसिद्ध कैलासमंदिर लेणे खोदणारा व घृष्णेश्वराचे मंदिर बांधणारा राष्ट्रकूट सम्राट कृष्णदेव हा ह्याच घराण्यातला होता, असे श्री. शणै गोंयबाब ह्यानी आपल्या ग्रंथात मोठया अभिमानाने सांगितले आहे.

राष्ट्रकूट हे घराणे 'रट्ट' ह्या मराठी जनातून उदयास आले. ह्या राष्ट्रकुटांनी चालुक्य, गंग, केरळ, पांड्य, चोल, पल्लव वगैरे दाक्षिणात्य राजांचा पराभव करून मोठे साम्राज्य स्थापन केले. तुंगभद्रेपासून विंध्यपर्वतापर्यंत त्यांचे साम्राज्य पसरलेले होते. श्री. पु. वा. जोशी हे इतिहासकार आपल्या 'कोकणचा

प्राचीन इतिहास ' ह्या ग्रंथात म्हणतात की, यादवांचे साम्राज्य उध्वस्थ झाले, तरी ह्या वंशातील नागरदेव ह्या नावाचा राजा कोकणात इ. स. १३४७ पर्यंत राज्य करीत होता. त्यावर्षी गुजरातच्या सुलतानाने त्याचा पाडाव करून त्याचे राज्य खालसा केले. आणि श्री. प्रभु म्हणतात त्याप्रमाणे मध्य आणि दक्षिण गोमंतकावर मराठी सत्ता प्रभावी नव्हती, हे खरे नाही. गोमंतकावर यादवांचे राज्य होते हे आम्ही वर सांगितलेच आहे. शिवाजी महाराजांनी मुसलमानाकडून कोकण घेतल्यावर आपल्या सत्तेची वाढ फोंडे महालापर्यंत केली होती. वाडीकर भोसले व मुसलमान ह्यांच्यामध्ये डिचोली, सांखळी वगैरे महालांसाठी युद्धे झाली. पुनः वाडीकर व पोर्तुगीज ह्यांच्यामध्ये युद्धे होऊन वाडीकरांना उत्तर गोव्यास मुकावे लागले. सांगे महालावर आणि केंपे महालाच्या उत्तरेकडील भागावर कोल्हापूरकरांची सत्ता होती. पुढे कोल्हापूरकरांची सत्ता कमकुवत झाल्याने सोंदेच्या राजाने पोर्तुगिजांच्या साहाय्याने हा मुलुख बळकावला. साष्टी, तिसवाडी, आणि बार्देश हे तीन महाल पोर्तुगिजांकडे होते. केंपे महालाचा थोडा भाग, काणकोण महाल आणि शिवेश्वर महाल (कारवार तालुका आणि अंकोला) ह्यावर सोंदेकरांचे राज्य होते. पण सोंदेकर हा मराठ्यांचा मांडलिक होता. शिवाजी महाराजांनी शिवेश्वर महालावर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. सोंदेचा राजा त्यांना खंडणी भरत असे. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतही तो मराठ्यांचा मांडलिक होता. मराठ्यांची कारवारवर सत्ता होती म्हणूनच संभाजी महाराजांना कारवारच्या किनाऱ्यावरील अंजेदिव बेटासाठी पोर्तुगिजांशी युद्ध करावे लागले. राजारामाचे अमदानीत सोंदेचा राजा काही दिवस स्वतंत्र म्हणून वागला असेल. पण शाहू महाराजांचे अमदानीत त्याला पुनः मराठ्यांचे मांडलिकत्व पत्करावे लागले. पुढे तो खंडणी भरण्यास पुनः टंगळमंगळ करू लागला म्हणून पेशव्यांना त्याच्यावर सैन्य धाडावे लागले. त्याने खंडणी भरुन फिरुन मराठ्यांची सत्ता मान्य केली. हैदरअल्ली व टिपू सुलतान ह्या दोघानी सोंदेकरांवर स्वारी केली, तेव्हा पेशव्यांना त्याच्या रक्षणासाठी सैन्य धाडावे लागले होते. त्यावेळी सरदार परशुरामभाऊ पटवर्धन हे कारवार येथे तळ देऊन राहिले होते. ह्या धामधुमीत पोर्तुगिजांनी सदाशिवगड घेतला. पण मराठ्यांनी त्याना तो खाली करण्यास भाग पाडले. ज्या अर्थी सोंदेचा राजा हा मराठ्यांचा मांडलिक होता, त्या अर्थी त्याच्या राज्यावर मराठ्यांची अधिसत्ता होती हे सिद्ध होते. आणि त्यामुळे साहजिकच दक्षिण गोमंतकावरही मराठ्यांचा हक्क पोहोचतो. पुढे पेशवाई बुडाल्यावर कारवार जिल्हा इंग्रजांनी घेतला. व सोंदेच्या राजाला आपल्या उरलेल्या राज्याची शाश्वती वाटेनाशी झाली, म्हणून त्याने तें पोर्तुगिजांना चालवावयास दिले.

श्री. प्रभु ह्याना हा इतिहास माहीत नसावा असे दिसते. तसे नसल्यास " इतिहासाची साक्ष काढल्यास तर्कतीर्थांच्या विधानाचा फायदा कर्नाटकाला मिळण्याची शक्यता आहे " असे त्यानी म्हटले नसते. त्याना आम्ही सांगितलेला इतिहास साधार वाटत नसल्यास त्यानी Arquivo Portugues Oriental. Tomo I, Parte III, Vols I, II, III, IV, V, VI हे गोव्याचे माजी मुख्य न्यायमूर्ति खि. बा. A. B. de Braganca Pereira ह्यानी संपादित केलेल्या पोर्तुगीज कागदपत्रांचे खंड वाचावे. त्याना कदाचित असे वाटले असेल की ज्याअर्थी गोवा विजयनगरच्या साम्राज्यात मोडत होता, त्याअर्थी कर्नाटकाला त्याच्यावर आपला दावा सांगता येईल. पण गोवा हा विजयनगरच्या राज्याचा भाग नसून त्याच्या साम्राज्याचा भाग होता हे त्याना माहीत नसावे. विजयनगरचे साम्राज्य मोठे होते व त्यात गोव्याप्रमाणेच दक्षिण-भारतातील दोन तीन राज्यांच्या काही मुलुखाचा अंतर्भाव होत होता. आज जर कर्नाटकाने त्या मुलुखावर दावा सांगितला तर तो मुलुख त्याला ती राज्ये परत देतील का ? ज्याप्रमाणे विजयनगरच्या साम्राज्यात गोव्याचा अंतर्भाव होत होता, त्याचप्रमाणे मराठे कर्नाटकाच्या बऱ्याच मोठ्या भागावर राज्य करीत होते. कर्नाटकात परवापर्यंत काही मराठी संस्थाने अस्तित्वात होती. ती आता कर्नाटकात विलीन झाली आहेत.

४. " भौगोलिक समान परिस्थितीमुळे आचारविचार व उद्योगधंदे यातही बरेच साम्य आढळते "

असे जे श्री. प्रभु म्हणतात ते खरे आहे. पण ही परिस्थिति केवळ कोकणपट्टीतच एकमेव आणि अपवादात्मक आहे का ? अशी परिस्थिती गुजरातच्या किनाऱ्यावर आढळते, पूर्व भारताच्या किनाऱ्यावर आढळते, गंगेच्या खोऱ्यात आणि सिंधूच्या खोऱ्यातही आढळते. उदाहरणार्थ आंध्र आणि मद्रास ह्या दोन्ही राज्यांच्या समुद्र किनाऱ्यावर राहाणाऱ्या लोकांचे आचार विचार आणि उद्योगधंदे समान आहेत. तीच गोष्ट ओरिसा आणि बंगाल ह्या दोन्ही राज्यांच्या समुद्रकिनाऱ्यावरील लोकांचीही आहे. तेव्हा दोन राज्यातील काही लोकांचे आचारविचार आणि उद्योगधंदे समान असले म्हणून काय निष्कर्ष काढणार ?

५. "गोमंतकात कानडी, मराठी व पाश्चात्य संस्कृतीचे मीलन पहावयास मिळते, असे असता तो महाराष्ट्रीय संस्कृतीचा अविभाज्य भाग कोणत्या आधारावर म्हटला जातो ते स्पष्ट होत नाहीं." असे विधान श्री. प्रभु ह्यानी केले आहे.

हे फार भोंगळ विधान आहे. कानडी संस्कृतीचे महाराष्ट्रात इतरत्र नसलेले असे कोणते लक्षण गोव्यात सापडते ? मराठी व पाश्चात्य संस्कृतीचे मिश्रण सर्व महाराष्ट्रात झाले आहे. कारण सर्व भारतावरच पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडला आहे. गोमंतक हा महाराष्ट्राचा अविभाज्य भाग असल्याचे जे विधान तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात केले, त्या विधानाला आधारभूत असलेला पुरावा आम्ही वर दिलाच आहे. पण श्री. प्रभु ह्याना अभिप्रेत असलेली विलक्षण मिश्र संस्कृति गोमंतकात कुठे आहे ते मात्र आम्हाला माहीत नाही. श्री. प्रभु ह्यानी ते आपल्या लेखात सोदाहरण सांगायला हवे होते. आम्हाला माहीत आहे की, अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत पोर्तुगिजांचे राज्य गोव्यात बार्देश, साष्टी (नंतर ह्याचे दोन महाल पाडण्यात आले) आणि तिसवाडी ह्या तीन महालावर होते. उरलेले सात महाल पोर्तुगिजांना अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला मिळाले. गोव्यात आज दहा टक्के लोकांना देखील पोर्तुगीज भाषा बोलता येत नाही. खिश्चनापैकी बामण आणि चारडे (मराठा) जमातीपैकी काही मूठभर खानदानी घराण्यात तेवढी पोर्तुगीज भाषा बोलली जाते. बाकीच्या खिश्चन लोकांचा धर्म जरी खिश्चन असला, तरी त्याना पोर्तुगीज भाषा मुळीच बोलता येत नाही. फार कशाला त्याचे धार्मिक विधि देखील कोकणीतून होतात आणि त्यांची स्तोत्रे देखील कोकणीतूनच असतात. तेव्हा ह्या बहुसंख्य खिश्चन लोकांची संस्कृति खिश्चन आहे असे म्हणणे अगदीच हास्यास्पद आहे. पुनः ह्या सर्वसामान्य खिश्चन वर्गात आणि खानदानी खिश्चनात वर्गभेदाची एक खोल दरीही आहे. त्याचाही विचार करावयास पाहिजे. मात्र बहुसंख्य खिश्चन लोकांचा (आणि तोही पुरुषांचा. सर्वसामान्य खिश्चन स्त्रिया साड्याच नेसतात) पोषाख पाश्चात्य आहे, एवढे खरे. खानदानी खिश्चन लोक टेबलावर जेवतात (आता हिंदूही जेवतात) तर बहुसंख्य खिश्चन लोक जमिनीवर बसूनच जेवतात. असे असता पणजी, मडगाव व काही अंशी म्हापशे व मुरगाव ह्या चार शहरातील सुखवस्तु खिश्चनांची राहाणी व आचारविचार पाहून श्री. प्रभु हे गोव्यात पाश्चात्य संस्कृती आहे असे म्हणत असतील तर त्यांना कुणी तसे म्हणण्यास प्रतिबंध करू शकत नाही. आता ते गोव्यात कानडी, मराठी व पाश्चात्य संस्कृतीचे मिश्रण बघायला मिळते असे जे म्हणतात, त्याचा मात्र आम्हाला बोध होत नाही. कारण, खिश्चन धर्माधिकाऱ्यांनी आपल्या अनुयायांमध्ये हिंदु लोक व हिंदु धर्म ह्यांच्याविषयी तुच्छतेची भावना निर्माण केल्याने खिश्चन लोक हिंदू लोकांत कधीच मिसळू शकले नाहीत. गोव्यात पोर्तुगीज सत्ता असेपर्यंत तिथले सुशिक्षित खिश्चन लोक स्वतःला सत्ताधारी म्हणून मिरवत व हिंदु लोकांना कमी मानीत, हे काय श्री. प्रभु ह्याना माहीत नाही ? हे झाले पाश्चात्य संस्कृतीचे विवेचन. आता कानडीकडे वळू. गोव्यात काही काळ विजयनगरचे राज्य होते व सोंदेकरांसारख्या छोट्या संस्थानिकाचीही गोव्याच्या दक्षिण भागावर सत्ता होती हे खरे आहे. पण राजभाषा म्हणून कानडीला कधीच स्थान प्राप्त झाले नाही. विजयनगरच्या राजवटीत गोव्यात कुठल्या भाषेत राज्यकारभार चालत असे ते आता कळण्याचा मार्ग नाही, परंतु सोंदेकरांच्या राज्यात राज्यकारभार मराठीतून चालत असे हे आम्हाला माहीत आहे. जिज्ञासूंना सोंदेकरांचे जुने दप्तर

आजं देखील बंघावयास मिळेल. मात्र काही कानडी शब्द कोकणीत रूढ झाले आहेत एवढे खरे. परंतु हे कानडी शुद्ध कोकणीत गोव्यात कानडी लोकांचे राज्य होते म्हणून आले असे म्हणता येत नाही. कारण, कोकणीपेक्षा मराठीत कानडी शब्दांचा अधिक भरणा आहे.

श्री. प्रभु आणखी पुढे म्हणतात : "यासाठी कानडी व मराठी संस्कृतीतील भेद स्पष्ट करून गोव्याची संस्कृती कुणाला जवळची आहे ते ठरवावे लागेल."

गोमंतकाची संस्कृती ही मराठी आहे हे आम्ही वर सोदाहरण सांगितले असल्याने श्री. प्रभु ह्यांच्या शंकेचे आणखी निरसन करण्याची जरूरी नाही. शेकडा साठ टक्के मराठी शब्द असलेली कोकणी मराठीला जवळची आहे की, शेकडा दोन टक्के देखील कानडी शब्द नसलेली कोकणी कानडीला जवळची आहे ते श्री. प्रभु ह्यानीच ठरवावे. पुनः कोकणी ही इंडो–आर्यन बोली असून कानडी ही द्रविड भाषा आहे, ह्याचाही त्यांनी विचार करावा. राजकीय दृष्ट्या गोवा अलग राखण्याच्या कारस्थानास बळी पडून ह्या गोष्टी सोयीस्करपणे विसरू नयेत.

तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात म्हटले होते की, "कोकणी बोलणारी सुमारे सत्तर टक्के प्रजा महाराष्ट्र राज्यात आज राहात आहे. बाकीची तीस टक्के प्रजा गोमंतक व कारवारपर्यंतच्या पश्चिम किनाऱ्यावर पसरली आहे."

प्रस्तुत विधान अर्ध सत्याचे आहे असे श्री. प्रभु म्हणतात व पुढील कारणे देतात.

१. "कोकणी बोलीची निश्चित व्याख्या न केल्याने ठाणा, कुलाबा या जिल्ह्यातील इतर भाषा बोलणाऱ्या लोकांचा समावेश कोकणी बोलणाराच्या संख्येत झाला असणे शक्य आहे."

उत्तर : रत्नागिरी जिल्ह्यातील कोकणी बोलणाऱ्या पांढरपेशा जमाती चित्पावन, कराडे, सोनार, वाणी, भंडारी एक दोन पिढ्यात मूळ बोली सोडून पुणेरी मराठीचा अंगीकार करून मूळची बोली टाकू लागल्याचे चलत् चित्र दिसू लागले आहे. श्री. प्रभु ह्यानी शक्याशक्यतेची भाषा बोलू नये. वस्तुस्थिती काय आहे ते सांगावे. आम्ही कुलाबा, ठाणा वगैरे भागात हिंडलो आहोत. तिकडची भाषा मराठी झाली आहे हे आम्ही पाहिले आहे.

२. "आजपर्यंत झालेल्या कोणत्याही शिरगणतीत कोकणी भाषा बोलणारांची नोंद शास्त्रीय पद्धतीने झालेली नाही."

उत्तर : हे खरे आहे. त्याचे कारण हे की, खानेसुमारी सरकार करीत असते. सरकारने कोकणी ही भाषा आहे हे मान्य केलेले नाही.

३. "भौगोलिक परिस्थितीमुळे कोकणी लोकांना इतर प्रांतात वस्ती करणे भाग पडते या मुद्याचा विचार करण्यात आलेला नाही"

उत्तर : आमच्या मते ह्या मुद्याचा विचार करण्याची आवश्यकता नाही. कारण व्यवसायपरत्वे व अन्य काही कारणावरून एका प्रांतातील लोक दुसऱ्या प्रांतात व एका देशातील लोक दुसऱ्या देशात राहात असतात. उदाहरणार्थ आज मुंबई शहरात एकावन्न टक्के परप्रांतीय लोक राहात आहेत. ही स्थिती जगात सगळीकडेच आढळते.

४. "कर्नाटकातील मंगळूर या शहरातील लोकसंख्येत जवळ जवळ ⅓ कोकणी बोलणारे आहेत. या कोकणी लोकांचा उल्लेख नाही."

उत्तर : मुंबई शहरात आठ लक्ष गुर्जर लोक आणि तीन साडेतीन लक्ष कन्नड लोक राहतात. मंगळूर शहरातील कोकणी लोक हे मुंबईतील गुर्जर अथवा कन्नड लोकासारखेच आहेत. म्हणून तर्कतीर्थांना ह्या लोकांचा विचार करण्याचे कारण नव्हते. त्यांनी मंगळूर शहरातील कोकणी लोकांचा विचार केल्यास त्यांना बंगलोर शहरातील कोकणी लोकांचाही विचार करावा लागला असता. मला मिळालेल्या माहितीप्रमाणे बंगलोर शहरात सातआठहजार तरी कोकणी लोक राहतात.

तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात म्हटले होते : "कोकणी म्हणून जी बोली आहे, तिच्या भाषाशास्त्रज्ञाच्या मते तेरा शाखा आहेत." श्री. प्रभु ह्याना 'बोलीच्या शाखा' हा शब्दप्रयोग अशास्त्रीय वाटतो. पण त्याला इलाज नाही, कारण भारत सरकारने कोकणी ही बोली की भाषा हे सिद्ध करण्याचे कार्य डेक्कन कॉलेजच्या

रिसर्च इन्स्टिट्यूटकडे सोपविले होते. डॉ. कत्रे हे ह्या कमिशनचे अध्यक्ष होत. ह्या कमिशनने संशोधन करून सरकारला अहवाल सादर केला, की कोकणी बोलीच्या १६ शाखा असून कोकणी ही भाषा होऊ शकत नाही. आणि माझ्या समजुती-प्रमाणे हा निर्णय सरकारने मान्य केला आहे. तेव्हा कोकणीवाद्यांना आता उपरिनिर्दिष्ट कमिशनशी हुज्जत घालावी लागेल. श्री. प्रभु ह्याना वाटते की कोकणीला भाषेचा दर्जा मिळावा; व म्हणून कोकणी ही भाषा नाही असे म्हणणाऱ्या भाषाशास्त्रज्ञांची मते त्याना ग्राह्य वाटत नाहीत. वस्तुस्थिती अशी आहे की, भाषाशास्त्र हे लवचिक आहे. एका भाषाशास्त्रज्ञाचे मत दुसऱ्याला मान्य असतेच असे नाही. पण ह्या वादाकडे व्यावहारिक दृष्टिकोणातून बघावे लागते. कोकणी ही जर भाषा असली तर पोर्तुगीज अथवा इंग्रज सत्ताधाऱ्यांनी तिला मान्यता दिली असती. ह्या देशात रूढ असलेल्या सर्व ग्रांथिक भाषांना त्यानी मान्यता दिली. पण ते नवीन भाषा निर्माण करण्याच्या फंदात पडले नाहीत. हे कार्य खिश्चन मिशनऱ्यांनी हाती घेतले. कोकणीत वाङ्मय-निर्मिती झाली त्याचे श्रेय गोव्यातील मिशनऱ्याना दिले पाहिजे.

कुठल्याही बोलीत साहित्यनिर्मिती करणे हे कठीण काम नसते. सोळाव्या शतकात कोकणीत साहित्यनिर्मिती करण्याचे जे काम गोव्यातील मिशनऱ्यांनी केले, तेच काम नंतर भारतातील आदिवासींमध्ये धर्मांतराचे कार्य करणाऱ्या मिशनऱ्यानी एकोणिसाव्या व विसाव्या शतकात केले. त्यानी आदिवासी बोलीतून वाङ्मय-निर्मिति केली; इतकेच नव्हे तर शाळाही काढल्या. आज कलकत्ता आणि पाटणा विद्यापीठात संथाळी भाषेला चेअर्स मिळाल्या आहेत. परंतु बंगाल, बिहार, ओरिसा किंवा मध्यप्रदेश सरकारनी आदिवासी भाषांना कारभाराची भाषा म्हणून मान्यता दिलेली नाही. तसे झाले तर ह्या देशाची भयंकर चिरफाड होईल. कारण भारतात पुष्कळ बोली अशा आहेत की, त्या बोली बोलणारांची संख्या लक्षावधींची आहे. उदाहरणार्थ संथाळी ही आदिवासी बोली जवळ जवळ पस्तीस ते चाळीस लक्ष लोक बोलतात. गोंड, कोल, वगैरे आदिवासींची संख्याही मोठी आहे. ह्या सर्व बोलींना जर आता सरकारने मान्यता दिली तर भारतात अनेक राज्ये निर्माण होतील. भारत सरकारने कोकणीला भाषेचा दर्जा देऊन निराळा प्रांत केला तर राजस्थानची राज्यभाषा मारवाडी वा अजमीरी वा राजपुती करावी लागेल. बिहारचे तीन प्रांत म्हणजे भोजपुरी, मैथिली व मघई या ग्रंथनिविष्ट भाषांचे तीन प्रांत करावे लागतील; व हिंदी राजस्थानची वा बिहारची राज्यभाषा म्हणून स्वीकारता येणार नाही. भारतातील कुणाही देश-प्रेमी मनुष्याला ह्या देशाची अशी चिरफाड नको असणे साहजिक आहे. कोकणीवादी कोकणी भाषेला ग्रांथिक भाषेचा दर्जा मिळावा म्हणून जी चळवळ करीत आहेत ती स्वतःच्या स्वार्थासाठी. त्यात राष्ट्रप्रेमाचा लवलेशही नाही हे आता त्या वादाकडे तटस्थतेने बघणारानाही देखील पटले आहे. जी गोष्ट पूर्वी अस्तित्वातच नव्हती ती निर्माण करण्याचा हट्ट ते धरून बसले आहेत. असो. लेखाचा विस्तार वाढत चालला आहे, म्हणून श्री. प्रभु ह्यांच्या आणखी निवडक अशा आक्षेपांचा समाचार घेऊन हा लेख आटोपता घेतो.

१. "मराठी भाषेच्या कोणत्याही बोलीत नसलेले उच्चार कोकणीत आहेत. असे उच्चार बंगाली, गुजराथी या भाषेतून आढळतात."

वऱ्हाडी, नागपुरी, खानदेशी बोलीनाही हेच विधान लागू पडेल. खानदेशी बोलींत जे बंगाली वा गुजराती शब्द आहेत त्यातील बरेच शब्द मराठीच्या अन्य प्रदेशात सापडत नाही. हीच गोष्ट वऱ्हाड वा नागपूर कडील बोलींची आहे. प्रभूंचा वैचारिक गोंधळ कमालीचा झाल्याचे हे एक नमुनेदार उदाहरण म्हणता येईल. परंतु श्री. प्रभु ह्यानी उदाहरणे दिली नसल्याने त्यांच्या ह्या विधानाचा विचार सविस्तर करता येत नाही.

२. "तद्भव शब्द- कोकणीत मराठीहून वेगळे" याची उदाहरणे दिलेली नाहीत. ह्यासही वरील प्रमाणेच उत्तर समजावे.

३. "प्रत्यय- बरेच विभक्तिप्रत्यय व क्रियापदांची रूपे करताना वापरात येणारे प्रत्यय वेगळे."

वस्तुस्थिती अशी की, द्वितीया- चतुर्थीचा म्हाका, तुका ह्यातील का हा प्रत्यय सोडल्यास बाकीचे सर्व विभक्तीचे प्रत्यय मराठी- कोकणीचे सारखे आहेत.

अनुक्रमणिका

प्रत्यय लागताना सामान्यरूपही मराठीप्रमाणे होते. उदाहरणार्थ- घोड्याला घोड्याक, गावाला गावाक. रामाने रावणास मारिले, रामान् रावणाक मारले (तृतीया); फातर्पेच्यान गोंय लागी (पंचमी); आमचो देश, आमची कोकणी, आमचे गोंय (षष्ठी). गावात पीडा आणू नको (मराठी); गावात पिडा हाडूं नाका (कोकणी); देवावर भरिभार (मराठी), देवार भरिभार (कोकणी सप्तमी)

४. "म्हणी व वाक्प्रचार भिन्न"

उत्तर : श्री. प्रभु ह्यांचे हे विधान बरोबर नाही. कारण, मराठींतील आणि कोकणीतील पुष्कळशा म्हणी सारख्या आहेत उदा. शहाण्याला शब्दाचा मार (मराठी), शाण्याक उत्तरा मार (कोकणी); अति तेथे माती (मराठी), अती थै माती (कोकणी); अंथरुण पाहून पाय पसरावे (मराठी), हातुळण पळौन पाय करचे (कोकणी); आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे (मराठी); कुड्डो मागता एक डोळो, आणि देव दिता दोन डोळे; देव तारी त्याला कोण मारी, (?) (मराठी), देव तार्ता ताका कोण मार्ता (?) (कोकणी); आई वाढीना, बाप (भीक) मागू देईना (मराठी); आवै वाण्णा बापुय भीक मागपा दिना (कोकणी); आळशास दुणे काम व लोभ्यास दुणा खर्च (मराठी), आळशाक दुणो वाव्र, किपिणाक दुणो खर्च (कोकणी); वगैरे. मराठीत आणि कोकणीत समायिक असलेल्या म्हणी आम्ही येथें विस्तारभयास्तव देऊ शकत नाही. अर्थात सगळ्याच म्हणी सगळीकडे सारख्या नाहीत हे येथे कबूल केले पाहिजे. खुद्द कोकणीत देखील सगळीकडे सारख्या म्हणी नाहीत. आणि कारवारी कोकणी लोकांच्या बहुसंख्य म्हणी तर गोमंतकातील कोकणीतील म्हणीहून वेगळ्या असतात. असो.

श्री. नारायण प्रभु ह्यांच्या बहुतेक सर्व मुख्य आक्षेपांची उत्तरे आम्ही दिली असल्याने त्यांच्या इतर आक्षेपांचा विचार करण्याचे कारण नाही. कोकणी ही एक बोली असून कोकणीवादी तिला ग्रांथिक भाषेचा दर्जा देऊ पाहातात हे आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. कोकणी ही पुरातन काळापासून ग्रांथिक भाषा म्हणून चालत आली आहे असा प्रचार ते करतात, व पोर्तुगिजांनी कोकणी साहित्य जाळून टाकले असा आरोप त्यांच्यावर करतात. पण समंजस आणि वस्तुस्थितीची कल्पना असलेल्या गोमंतकीय मनुष्याला हा आरोप मुळीच मान्य नाही. कोकणीवादी मंडळीस सत्याची चाड राहिली नसल्याचाच हा पुरावा होय. कोकणीवाद्यांना आमचा सवाल आहे की प्राचीन काळी कोकणी साहित्याची निर्मिती केवळ पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या गोव्यातच तेवढी होत होती की इतर कोकणातही होत होती? ते इतरत्र निर्माण होत नव्हते असे मानले तरी ते गोव्यातील कोकणीचे साहित्य इतरत्र सात महालातही जात नव्हते काय? पोर्तुगीजांच्या ताब्यातील गोव्यातील कोकणी साहित्य धर्मसमीक्षा मंडळाने जाळून टाकले असे मान्य केल्यास इतर गोव्यातील कोकणी साहित्य कुठे गेले? कारण, गोव्याचे इतर सात महाल पोर्तुगिजाकडे आले तेव्हा गोमंतकातील धर्मांतराची लाट ओसरलेली होती व इक्विझिशनच्या अधिकारावर मर्यादा घालण्यात आली होती. म्हणून ह्या सातही महालातील हिंदु मंदिरे शाबूत राहिली व धर्मांतरही तिकडे झाले नाही. अशा स्थितींत ह्या सातही महालातील मध्ययुगीन साहित्य गेले कुठे?

आपल्या लेखाचे शेवटी श्री. प्रभु हे म्हणतात :

"जोपर्यंत देशातील विचारवंत आपली प्रज्ञा व्यवहारिक फायद्याच्या विचारापासून अलिप्त ठेवून सत्य शोधनासाठीच तिचा वापर करणार नाहीत व निर्भीडपणे आपले विचार मांडण्यास कचरतील तोपर्यंत देशाच्या प्रगतीची सुरुवात झाली असे म्हणता येणार नाही."

*

श्री. प्रभु ह्याना आमची विनंती आहे की त्यानी कोकणीवाद्यांना प्रथम हा उपदेश करावा. कारण ते सत्यावर पांघरूण घालून असत्याचा प्रचार करीत आहेत. विचारवंत हे बेजबाबदारपणाने वागू लागले की, त्यांचे अनुयायी बेताल बनतात. ह्याचा प्रत्यय कोकणीच्या चळवळीत दिसून येत आहे.

*

श्री. पन्नालाल सुराणा

संरक्षणाची तयारी व १९६३-६४ ची अंदाजपत्रके

या वर्षी अंदाजपत्रकांची अपेक्षा केवळ भीतियुक्त जिज्ञासेतून केली जात नव्हती. 'नेमेंचि येतो मग पावसाळा' प्रमाणे करवाढ येणार हे सर्वांना माहित होते. देशाच्या संरक्षणाच्या तयारीसाठी पुढील वर्षी काय काय केले जाणार आहे याची रूपरेषा या वर्षीच्या अंदाजपत्रकात येणार होती. संरक्षणाच्या योजना जाणून घेण्याच्या दृष्टीनेच प्रत्येकजण अंदाजपत्रकाची अपेक्षा करीत होता. केंद्रसरकारकडून शंभर-सव्वाशे कोटी रुपयांची व महाराष्ट्रराज्य सरकारकडून दहा-वीस कोटींची करवाढ होईल असा अंदाज होता. महाराष्ट्रराज्य सरकारने अवघी पंचाणव लाखाची करवाढ केली. त्यामुळे लोकाना ते फारसे जाणवले नाही. भारत सरकारने मात्र दोनशेपंचाहत्तर कोटीची करवाढ जाहीर केली. हा डोस सगळ्यानाच फार मोठा वाटला. प्रत्येकाला आश्चर्याचा धक्का बसला!

ही करवाढ योग्य की अयोग्य हा विषय सांगोपांग रीतीने चर्चिला जाणे आवश्यक आहे. पण या लेखाचा व्याप मात्र मर्यादित ठेवला आहे. केंद्रसरकार व संबंधित राज्यसरकारे यांच्या अंदाजपत्रकात संरक्षणाच्या दृष्टीने काय काय तरतुदी आहेत, आपल्या संरक्षणाच्या गरजांच्या मानाने त्या पुरेशा आहेत की नाहीत, याची चर्चा या लेखात करावयाची आहे.

संरक्षणाची तयारी म्हणजे केवळ लष्करी तयारी नव्हे. आधुनिक कालातील युद्धतंत्र अशा प्रकारचे झाले आहे की लष्कराच्या पाठीमागे फार मोठे औद्योगिक व अन्यप्रकारचे आर्थिक सामर्थ्य उभे असावे लागते. म्हणून आपल्याला संरक्षणाच्या तयारीसाठी केवळ सामर्थ्य वाढवून भागणार नाही. देशाचे शेती व औद्योगिक उत्पादन वाढविणे, एकंदरीतच आर्थिक विकासाची गति वाढविणे, आवश्यक आहे. आर्थिक विकासासाठी नियोजनाच्या मार्गाने कार्यक्रम आखले जात होतेच. १९६१-६२ पासून तिसरी पंचवार्षिक योजना कार्यवाहीत आणली जात आहे. ती योजना बरीच महत्त्वाकांक्षी स्वरूपाची बनविण्यात आलेली आहे. तेव्हा ती शंभर टक्के कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न केला म्हणजे पुरे. लष्करी तयारीसाठी त्यात काटछाट करू नये. फक्त काही कार्यक्रमांचा क्रम बदलावा लागेल एवढेच. सीमा प्रदेशांच्या विकासावर व पायाभूत उद्योगधंद्यावर अधिक भर देणे यांना अग्रक्रम देण्यासाठी आवश्यक तेवढाच फेरफार तिसऱ्या योजनेत केला जावा ही भूमिका देशात जवळजवळ सर्वांना मान्य झाली आहे. तेव्हा १९६३-६४ च्या अंदाजपत्रकात आर्थिक विकासाची गति राखली गेली आहे की नाही हे प्रथम पाहिले पाहिजे.

लष्करी खात्यावरील खर्च

भारतसरकारला या वर्षी लष्करी खात्यावर खूपच अधिक खर्च करावा लागणार म्हणून केंद्राकडून राज्य-सरकारांना मिळणाऱ्या मदतीत यावर्षी कपात केली जाईल व म्हणून राज्यसरकारानी ७० ते १०० कोटी रुपये जादा उभारले पाहिजेत असे भारत सरकारने जानेवारीमध्ये जाहीर केले होते. याचा अर्थ असा की तिसऱ्या योजनेतील आपापला वाटा पार पाडण्यासाठी राज्यसरकारांनी आपले उत्पन्न अधिक वाढवायला हवे होते. त्यादृष्टीने पाहता बहुतेक राज्य सरकारांची अंदाजपत्रके असमाधानकारक आहेत असे दिसते. पंधरा राज्यांपैकी आंध्र, बिहार, म्हैसूर, मद्रास व पश्चिम बंगाल, या पाच राज्यांनी अजीबात करवाढ केली नाही. उत्तर-प्रदेशच्या अर्थमंत्र्यांनी सांगितले की नवे कर बसविण्याचा विचार आम्ही नंतर करू! (उत्तर प्रदेशच्या अंदाजपत्रकात रु. ५ कोटींची तूट आहे. योजना कार्यक्रमासाठी एकूण रुपये ९२·६४ कोटी खर्च होणार आहेत. त्यापैकी ५७·६० कोटी केंद्र सरकारकडून मिळतील अशी अपेक्षा

अनुक्रमणिका

आहे.) – बाकीच्या नऊ राज्यांची मिळून करवाढ रु. ३०·२० कोटींची आहे.[१]

म्हणजे श्री. मुरारजीभाईंनी व्यक्त केलेल्या अपेक्षेपेक्षा फारच कमी पैसा राज्य सरकारांनी उभा केला आहे. केंद्रसरकारने केलेल्या काही करवाढीतला हिस्सा राज्य सरकारांना मिळेल. तरी पण राज्यसरकारांना तिसऱ्या योजनेतील या वर्षाचा आपला वाटा पूर्ण करण्यासाठी आवश्यक तेवढा पैसा उपलब्ध होईल असे दिसत नाही. बिहारने तर आपल्या नियोजक कार्यक्रमात २१ कोटींची कपात केली आहे! म्हैसूर व मद्रास राज्यानाही नियोजन खर्चात कपात करावी लागणार आहे.

केंद्र सरकारने मात्र भांडवली खर्चाचा कार्यक्रम पुरेशा प्रमाणात आखला आहे. १९६३–६४ साली केंद्र सरकार योजनेवर रु. १२२६ कोटी खर्च करणार आहे. ही रक्कम तिसऱ्या योजनेच्या एकूण खर्चाच्या २२ टक्क्यापेक्षा थोडी अधिक आहे. तिसऱ्या योजनेच्या पहिल्या वर्षात १५ टक्के व दुसऱ्या वर्षात १९॥ टक्के खर्च झालेला आहे. त्यामानाने या वर्षीच्या २२॥ टक्क्याची तरतूद ही समाधानकारक असली तरी त्याचा अर्थ असा होतो की राहिलेल्या दोन वर्षात ४३ टक्के खर्च करावा लागणार. एकंदरीत केंद्र सरकार आर्थिक विकासाची गति १९६३–६४ साली पूर्वी योजल्याप्रमाणे ठेवू शकेल असे दिसते. पण राज्य सरकारांच्या हिश्यात मात्र काही प्रमाणात उणीव राहील.

लष्करी तयारीचे स्वरूप

आता १९६३–६४ च्या अंदाजपत्रकाप्रमाणे लष्करी तयारी कसकशी होणार आहे ते पाहू. त्याआधी लष्करी तयारी किती केली पाहिजे ते पहायला हवे. सध्या संरक्षणाची तयारी वाढवायला हवी, असे आपण म्हणतो तेव्हा चीनच्या संभाव्य हल्ल्यापासून संरक्षण करता येणे व त्याचबरोबर लडाखमधील चीनने व्यापलेला भाग परत मिळविणे असे दोन उद्देश आपल्या मनात असतात. चीनच्या तुलनेने आपल्याला लष्करी तयारी करायला हवी हे उघड आहे.

चीनचे लष्करी सामर्थ्य पुढीलप्रमाणे आहे. भूदलात खडी फौज २० लाखाची आहे. त्यात अवजड तोफांच्या ५-६ डिव्हिजन्स, १० चिलखती डिव्हिजन्स, व ३ छत्रीधारी सैनिकांच्या डिव्हिजन्स आहेत. शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांच्या उत्पादनात बरीच प्रगति झालेली आहे. चीनकडे छोटी शस्त्रे पुरेशी आहेत, पण दारुगोळा अपुरा आहे. उखळी तोफा, हातबॉंब व बंदुका यांचे उत्पादन भरपूर होते. छोट्या तोफा, ट्रक्स यांचे उत्पादन चालू आहे. मोठ्या तोफा व रणगाडे यांच्यासाठी मात्र रशियावर अवलंबून रहावे लागते. चीनला स्वयंचलित बंदुकाही मिळाल्या आहेत.

चीनच्या नौदलात अधिकारी व खलाशी मिळून ५०,००० लोक आहेत. वेगवेगळ्या प्रकारची ५०० जहाजे आहेत. त्यांचा दर्जा सामान्य आहे. नव्या युद्ध-नौकांची बांधणी सुरू आहे.

चीनचे हवाईदल मात्र चांगलेच सामर्थ्यशील आहे. त्यांत ३,००० जेट फायटर्स (मिग–१५, मिग–१७ व मिग–१९), १००० मध्यम पल्ल्याची जेट बॉंबर्स, ३००–४०० टेहळणी विमाने-हेलिकॉप्टर्स– आहेत. १०,००० वैमानिक आहेत. मिग जातीची विमाने बनविण्याचा कारखाना उभारण्यात आला आहे.

याशिवाय प्राथमिक लष्करी शिक्षण झालेले २ ते ३ कोटी नागरिक आहेत.

भारताचे सामर्थ्य

भारताचे लष्करी सामर्थ्य पुढीलप्रमाणे आहे :– भू-दलात ५ लाख सैनिक आहेत. त्यापैकी खडी फौज ३ लाखाची आहे. हत्यारे व दारूगोळा ब्रिटिश बनावटीचा व जुन्या पद्धतीचा आहे. सामग्री व शस्त्रांची निर्मिति २० ऑर्डनन्स कारखान्यातून होत आहे. स्वयंचलित शस्त्रांचे उत्पादन गेल्या २–३ महिन्यात सुरू झाले आहे. ट्रक्सचे उत्पादनही सुरू झाले आहे.

प्राथमिक लष्करी शिक्षण झालेले सुमारे ९ लाख लोक आहेत. (एन्. सी. सी. चे अडीच लाख व लोकसहाय्यक सेनेचे साडेसहा लाख)

---

१. राज्यवार करवाढीचे आकडे पुढीलप्रमाणे (कोटी रुपये)– आसाम– १·६२; गुजरात– ४·०५; जम्मू काश्मीर– १·००; केरळ– ४·८५; मध्यप्रदेश– १·९१; महाराष्ट्र– ०·९५; ओरिसा– ६·००; पंजाब– ५·३२; राज्यस्थान– ४·५०

अनुक्रमणिका

नौदलात १ विमानवाहू जहाज, २ क्रूझर्स, ३ विनाशिका, १४ फ्रिगेट्स्, १२ सुरुंग सफाई जहाजे, व शिवाय तेलवाहू, टेहळणी, मोटर लाँचेस आहेत. पाणबुडी मात्र एकही नाही. जहाजाची बांधणी नुकतीच सुरू झाली आहे. नौदलात १४०० अधिकारी व १३००० खलाशी आहेत.

आपल्या विमानदलात सुमारे १००० विमाने आहेत, व त्यापैकी ६०० बाँबर्स आहेत.[२]

चीनच्या व भारताच्या लष्करी बळाची तौलनिक कल्पना वरील माहितीवरून येते. आपले सामर्थ्य बरेच कमी आहे. पण याचा अर्थ असा मात्र नव्हे की आपले सामर्थ्य चीनच्या बरोबरीचे केले नाही तर आपल्याला देशाचे संरक्षण करता येणार नाही, किंवा चीनने हल्ला केला तर त्यात आपला पराजय होईल असे म्हणण्याची कारणे दोन आहेत. एक तर चीनला आपले सर्व लष्करी सामर्थ्य भारताच्या विरुद्ध उभे करता येणार नाही. चीनच्या सीमा काही कमी लांब नाहीत. फोर्मोसाकडून हल्ला होण्याचा धोकाही कायम आहे. त्यामुळे त्यांचे नौदल व बरेचसे भूदल कायमचे गुतून पडले आहे. (आपलीही दोन लाख सेना काश्मीरात अडकून पडली आहे म्हणा !). दुसरे असे की, आजच्या काळात रशिया व अमेरिका हे दोन देश सोडले तर इतर कुठलाही देश स्वतःच्या बळावर युद्ध चालवू शकेल अशी स्थिति राहिलेली नाही. प्रत्येकाला मित्रराष्ट्रांची मदत घ्यावीच लागते. ती किती मिळेल हे त्यावेळची जागतिक परिस्थिति व संबंधित देशाचे या बाबतचे धोरण यावर अवलंबून राहील.

म्हणून आपण चीन विरुद्ध संरक्षणाची तयारी करावयाची याचा अर्थ चीनशी शस्त्रस्पर्धा सुरू करायची असा नव्हे. तसे करायचे ठरविले तर आपल्या सर्व विकासयोजना गुंडाळून ठेवाव्या लागतील. सामान्य माणसाचे जीवनमान आजच्या निम्म्याने करावे लागेल; आणि आपण लष्करी सामर्थ्य अशा प्रकारे वाढवित आहोत असे पाहून चीन आणखी वेगाने आपले सामर्थ्य वाढवू लागेल. अशा शस्त्रस्पर्धेला अंतच राहणार नाही. त्यात आपला आत्मनाश फार लवकर ओढवेल ही भीती अधिक.

म्हणून संरक्षणाची तयारी करताना चीनचा अचानक हल्ला झाला तर त्याला त्वरित प्रतिकार करता येणे व आपल्या औद्योगिक प्रदेशाचे संरक्षण करणे यासाठी किमान आवश्यक तेवढी तयारी करावी लागेल. युद्ध सुरू झाल्यावर मित्रराष्ट्रांची मदत घ्यावी लागेल, यात अजिबात शंका नाही. अशी मदत योग्यत्यावेळी व योग्य त्याप्रकारची मिळावी या दृष्टीने धोरणे आखून बोलणी झाली पाहिजेत.

संरक्षणासाठी किमान आवश्यक लष्करी सामर्थ्य किती हे ठरविणें कठीण आहे. लष्करी तज्ज्ञांचे म्हणणे असे की आपले भूदल दुप्पट केले पाहिजे. शस्त्रे व दारुगोळा यांचा दर्जा व पुरवठा सुधारला पाहिजे. नौदलाचा फार विकास करण्याचे कारण नाही. मुंबई, कलकत्ता, यासारख्या महत्त्वाच्या बंदरांचे संरक्षण करण्याची तयारी असली म्हणजे पुरे. विमानदलाचा मात्र खूप मोठ्या प्रमाणावर विकास करावा लागेल.

खर्चाची व्यवस्था

१९६२-६३ च्या अंदाजपत्रकात लष्करी खर्चाची तरतूद पुढीलप्रमाणे होती. — (कोटी रुपये) भूदल - २२३, नौदल - १९, विमानदल - ७८, पेन्शन ई - २१, भांडवली खर्च - ३१ — एकूण ३७२.[३] त्यात आणीबाणीची परिस्थिति जाहीर झाल्यानंतर वाढ करावी लागली. तिन्ही दले व इतर खर्च मिळून रु. ४५८·१७ कोटी झाला. भांडवली खर्च रु. ५२·९४ कोटी झाला व इतर खर्च रु. ९१ लाख झाला. म्हणजे अंदाजपत्रकातील ३७६ कोटीवरून ५०५ कोटींवर हा आकडा न्यावा लागला. म्हणजे रु. १२९ कोटी जास्त खर्च आला. त्यापैकी रु. ४७ कोटी राष्ट्रीय संरक्षण निधीतून व रु. ९ कोटी इमर्जन्सी

२. वरील माहिती India : 1962 हे सरकारी प्रकाशन व लोकमित्र, भारत संरक्षण खास अंक, (२६ जानेवारी १९६३) मधील प्रा. अविनाश जोशी यांच्या ‘ चीन व भारताचे तौलनिक युद्धबल ’ हा लेख यावरून घेतली आहे.

३. India 1962 मध्ये एकूण रु. ३७२ कोटीचा आकडा आहे, तर अर्थमंत्र्यांनी आपल्या अंदाजपत्रकी भाषणात ३७६ कोटीचा आकडा सांगितला आहे.

विम्यातून मिळाले. बाकीचा खर्च तुटीच्या अर्थभरण्यातून करावा लागला.

१९६३–६४ च्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्यावर एकूण रु. ८६७ कोटींची तरतूद असून त्यापैकी रु. ७०८·५१ कोटी तिन्ही दले व इतर खर्चासाठी आहेत. रु. १०६ कोटी भांडवली खर्चासाठी आहेत. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात संरक्षणखर्चाच्या तरतुदीचा फक्त एवढाच तपशील देऊन असे म्हटले आहे की 'राष्ट्रहिताच्या दृष्टीने अधिक तपशील सांगणे योग्य होणार नाही.' पण नेहमीइतकी माहिती पुरविण्याने फारसे बिघडले असते असे वाटत नाही. कारण या आकड्याचा थोड्याशा बारकाईने अभ्यास केला तरी बऱ्याच गोष्टी कळू शकतात. (शत्रूच्या हेरखात्याला तर यापेक्षा कितीतरी अधिक गोष्टी कळत असाव्यात असे वाटते. पण तो मुद्दा वेगळा!)

भूदलाचे बळ दुप्पट करायचे गेल्या ३–४ महिन्यापूर्वीच बोलले जात होते. गेल्यावर्षी भूदलावर रु. २३३ कोटी खर्चावयाचे योजले होते. येत्या वर्षी त्याच्या दुप्पट म्हणजे साधारणपणे रु. ४५० कोटी खर्चिले जातील असे दिसते. नौदलावर गेल्यावर्षी रु. १९ कोटी खर्चिण्यात आले. त्यात थोडीतरी वाढ होणारच. म्हणजे १९६३–६४ साली नौदलावरच कमीतकमी रु. २५ कोटी खर्च होतील. पेन्शन वगैरेचा खर्च सुमारे रु. २५ कोटी होईल. आणि बाकी राहिलेला सुमारे रु. २०८ कोटी इतका खर्च विमानदलावर केला जाईल असे दिसते.

भूदलाची संख्या दुप्पट करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रकातील तरतूद योग्य आहे. पण त्या बाबतीत भीति इतकीच वाटते की, एका वर्षात हा कार्यक्रम होऊ शकेल का ?. सैनिकभरती केल्यानंतर सुसंघटित सैन्यरचना (*Formation) करण्यासाठी १२ ते १५ महिन्यांचा काळ लागतो. तोही पुरेसे अधिकारी तयार असतील आणि इतर काही अडचणी (उदा. प्रत्यक्ष लढाई) आल्या नाहीत तर! आपल्याला अधिकाऱ्यांची भरती व शिक्षण येथपासून सुरुवात करावयाची आहे– तशी थोडीफार झाली आहे पण त्याला वेळ लागणार –तेव्हा खरोखर भूदल १९६३–६४ सालात दुप्पट होऊ शकेल असे वाटत नाही. तरी जितका जास्तीत जास्त प्रयत्न त्या दिशेने करणे शक्य आहे, तितका केला पाहिजे.

सैन्याला चांगली साधनसामग्री, शस्त्रे–दारूगोळा व हिमालय पर्वतातील लढाईसाठी आवश्यक त्या इतर वस्तु यांचा पुरवठा वाढवावा लागेल. त्यावरील खर्चाचे प्रमाण मोठे असेल. ४५० कोटीतून त्याची सोय होऊ शकेल असे वाटत नाही. मित्र राष्ट्रांच्या मदतीतूनच हा खर्च करावा लागेल.[४]

नौदलावर सध्या विशेष भर देण्याचे कारण नाही हे आपण वर पाहिलेच. तेव्हा त्या बाबतीत अंदाजपत्रकातील तरतूद समाधानकारक आहे असे म्हणायला काही हरकत नाही.

विमानदलावर १९६२–६३ च्या अंदाजपत्रकातील तरतुदीच्या मानाने जवळ जवळ तिप्पट रक्कम १९६३–६४ च्या अंदाजपत्रकात ठेवलेली दिसते. आपल्या कुवतीच्या मानाने ही रक्कम गौरवास्पद मानली पाहिजे. पण गरजेच्या मानाने मात्र ही रक्कम फार कमी आहे. चीनने गेल्या ऑक्टोबरात मोठ्या प्रमाणावर चढाई सुरू केली ती नेफाच्या बाजूने. नेफाला लागून आसामचा प्रदेश आहे. त्यात चहाचे मळे व तेलाच्या खाणी आहेत. कोळशाचे साठेही असावेत असा अंदाज आहे. त्याच्या पश्चिम-दक्षिणेला प. बंगाल व बिहारमधील खनिज संपत्तीने समृद्ध व औद्योगिकदृष्ट्या अतिशय गजबजलेला प्रदेश आहे. चीनच्या हल्ल्यांचा जोर वाढला तेव्हा त्याच्या संरक्षणाची मोठीच काळजी वाटत होती. सुदैवाने काही अनवस्था प्रसंग ओढवला नाही.

पण यापुढे केवळ सुदैवावर विसंबून चालेल का ? तिबेटच्या बाजूने परत हल्ला करायचा झाल्यास चीन विमानदलाचा वापर करण्याची बरीच शक्यता आहे. त्यावेळी हवाई हल्ल्यापासून त्या प्रदेशाचे संरक्षण

४. लष्करासाठी एकूण खर्च किती करावा लागणार, त्यापैकी आपण किती करणार, व मित्र राष्ट्रांच्या मदतीतून किती भागवला जाणार याबद्दलची आकडेवारी लोकांना समजणे आवश्यक आहे. अर्थमंत्र्यांच्या अंदाजपत्रकी भाषणात १९६२–६३ या वर्षात मित्रराष्ट्रांकडून लष्करीसाह्य किती झाले याचा आकडा दिलेला नाही तीही आकडेवारी द्यायला पाहिजे होती.

करणे अशा दोन्ही दृष्टीने आपली तयारी असायला हवी. तज्ञांचे असे मत आहे की आपल्याकडे निदान २००० लढाऊ विमाने असली पाहिजेत. तसेच विमानविरोधी तोफा व रडारनियंत्रित मिसाईल्स यांचीही तरतूद असली पाहिजे. योग्य जागी पुरेसे हवाई-तळ व हे सर्व सांभाळण्यासाठी कुशल वैमानिक यांची गरज ओघाने आलीच.

वैमानिक दल

हे सर्व करावयाचे तर रु. २०८ कोटीची रक्कम अतिशय तोकडी आहे. सध्या आपल्याजवळ सहाशे लढाऊ विमाने आहेत; आणखी चौदाशे विमाने घ्यायची असली तर त्यासाठी सुमारे दोन हजार कोटी रुपये लागतील. इतर साधनसामग्रीचा खर्च वेगळा. हे सगळे आकडे उघडउघड आपल्या आवाक्याबाहेरचे आहेत. या अंदाजपत्रकात संरक्षणासाठी जी तरतूद केली त्यासाठी पावणेतीनशे कोटीची करवाढ करावी लागली. हीच भारतीय जनतेला व अर्थव्यवस्थेला पेलेल की नाही याची शंका आहे. तेव्हा विमानदल पुरेसे सामर्थ्यशाली करायला पाहिजे असलेला पैसा उभारणे शक्य नाही.

म्हणून विमानदलासाठी परकीयांची म्हणजे मुख्यतः पाश्चात्य राष्ट्रांची मदत घेणे अपरिहार्य आहे. याच संदर्भात "हवाई छत्री" चा वाद झाला. चीनचा हवाई हल्ला आला तर पाश्चात्य देशांनी-म्हणजे मुख्यतः अमेरिका व इंग्लंडने- आपल्या मदतीला यावे असे सुचविले गेले होते. एवढ्यावरच कम्युनिस्टांनी कल्पनेच्या वावड्या उडविल्या की हवाई-संरक्षण मिळविण्यासाठी भारतात परकीयांना हवाईतळ दिले जाणार !

असे कोणी नुसते कुजबुजले तरी पं. नेहरूंचा संताप अनावर होणे स्वाभाविक आहे. प्रथम काँग्रेस खासदारांच्या सभेत 'हवाई छत्री' च्या कल्पनेचा त्यांनी अव्हेर केला. नंतर ता. २१ फेब्रुवारी १९६३ रोजी लोकसभेत याविषयावर विचारल्या गेलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, "भारताचे संरक्षण हे या देशाच्या सैन्यानेच केले पाहिजे. आवश्यक ती साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत मित्र राष्ट्रांकडून मिळणाऱ्या मदतींचे आम्ही स्वागत करूच ... पण हवाई छत्री सारखी कल्पना मात्र मान्य करता येणार नाही.–" कुठल्याही परकी राष्ट्राला भारतात तळ दिला जाणार नाही. तशी सूचना कुठल्या देशाकडून आलेलीही नाही. असेही त्यांनी जाहीर केले.

इतपत ठीक आहे. पण आपले हवाईदल सुसज्ज बनवावयाचे असले तर काय करायला हवे व परकीय राष्ट्रांकडून कोणत्या स्वरूपाची किती मदत पाहिज आहे हे स्पष्टपणे सांगायला हवे. लष्करी मदतीबाबतची भारताची आतापर्यंतची भूमिका अतिशय संदिग्ध राहिली आहे. 'मदत तर हवी, पण आपल्या तोंडाने मागायची कशी ?' असा नववधूला शोभणारा संकोच भारत सरकार दाखवीत आहे. आपल्या अलिप्ततेच्या धोरणाला वाजवीपेक्षा जास्त हळुवारपणे जपत 'मित्र राष्ट्रांकडून मिळणाऱ्या मदतींचे आम्ही स्वागत करू." असे पुटपुटणे चालले आहे. अलिप्ततेचे धोरण आपण सोडावे असे आज कोणीही सुज्ञ मनुष्य म्हणणार नाही. योगायोग असा की, अमेरिका देखील तसे म्हणत नाही, पण आपल्याला मदत कोणती व किती हवी हे मात्र स्पष्टपणे सांगितले पाहिजे व तिचा उपयोग कसकसा करावयाचा हे आतापासून ठरविले पाहिजे.

हवाई दलाच्या विकासाबाबत दूरगामी धोरण आखले पाहिजे. योग्य त्या ठिकाणी, योग्य त्या प्रकारचे विमानतळ व तत्सम इतर तळ बांधणे, विद्युत्चलित प्रक्षेपणास्त्रे व आधुनिक विमाने मिळविणे, व त्यासाठी वैमानिकांना आवश्यक ते शिक्षण देऊन तयार करणे, असा विविध कार्यक्रम आखला पाहिजे. यातील विमाने व प्रक्षेपणास्त्रे मिळविणे हा भाग सर्वस्वी परकीय मदतीवर अवलंबून ठेवावा लागेल. विमानतळ बांधणे व वैमानिकांची संख्या वाढवून त्यांना शिक्षण देणे, यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चाची तरतूद आपल्याला देशातल्या देशात करावी लागेल. हा आकडा नक्की किती असेल हे सांगणे कठीण आहे. सुरुवात म्हणून १९६३-६४ च्या अंदाजपत्रकातील संभाव्य वाटणारी या बाबीवरील रु. २०८ कोटीची तरतूद ठीक आहे. पण पुढील वर्षापासून या बाबीवरील तरतूद मोठ्या प्रमाणावर वाढवावी लागेल असे दिसते.

अनुक्रमणिका

लष्करी भांडवली खर्च

लष्करी भांडवली खर्चासाठी १९६३-६४ च्या अंदाजपत्रकात रु. १०६ कोटीची तरतूद आहे. वास्तविक आपली गरज यापेक्षा खूपच जास्त आहे. स्वयंचलित शस्त्रे, त्यासाठी लागणारा दारूगोळा, हिमालयासारख्या डोंगराळ प्रदेशातील लढाईसाठी लागणारे अन्य साहित्य, रणगाडे, जीपगाड्या व ट्रक्स इत्यादि लष्करी वस्तूंचे उत्पादन आपल्याला देशातल्या देशात करावयाला हवे, या सर्वच कामासाठी खूप मोठ्या प्रमाणावर भांडवल लागणार हे उघड आहे. अर्थात आपल्याला रु. १०६ कोटींपेक्षा जास्त तरतूद करणे शक्य नाही ही गोष्ट समजू शकते. पण खर्च बराच अधिक करायचा आहे. हे नमूद करून जेवढ्या रकमेची भरपाई करता येत नाही. तेवढी तूट आहे असे दाखवायला काय हरकत होती? ती तूट बऱ्याच अंशी परकीय मदतीने भरून काढणे शक्य आहे, की अशा प्रकारचा तपशील प्रसिद्ध करणे देशहिताचे नाही असे सरकारचे मत आहे?

संरक्षणाच्या तयारीच्या दृष्टीने भारतसरकारच्या १९६३-६४ च्या अंदाजपत्रकाची चर्चा येथपर्यंत केली. आता आणखी दोन मुद्यांचा विचार करून हा लेख संपवायचा आहे.

एक मुद्दा असा की, संरक्षण तयारीच्या दृष्टीने सीमा प्रदेशांतील दळणवळणाच्या व वाहतुकीच्या साधनांचा विकास करणे, लडाख, नेफा, व इतर सीमेवरील प्रदेशात रस्ते बांधणे, हा एक भाग झाला. तसेच देशातील महत्त्वाच्या पुरवठा-केंद्राचा सीमाप्रदेशाशी संबंध जोडणे अत्यंत आवश्यक आहे. मुंबई, कलकत्ता, कानपूर, गोरखपूर, इत्यादि ठिकाणांपासून सीमाप्रदेशापर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूक करता येण्यासाठी मुख्यतः रेल्वे मार्गाची गरज आहे. आज गंगेच्या उत्तरेला नॉर्थ-ईस्टर्न रेल्वेची मिटरगेजची सिंगल लाइन आहे. त्याभागात ब्रॉडगेज डबल-लाईन बांधण्याची गरज आहे. रेल्वे मंत्र्यांनी आपल्या अंदाजपत्रकी भाषणांत अशी फुशारकी मारली आहे की आणीबाणीच्या काळात लष्कराचे काम करूनही रेल्वेने नागरी वाहतुकीचा खोळंबा होऊ दिला नाही. यासाठी त्यांचे अभिनंदन करायला हरकत नाही. पण सीमाप्रदेशांशी दळणवळण सुलभ करण्याच्या दृष्टीने कोणत्या नव्या योजना हाती घेतल्या आहेत याचा मात्र त्यानी उल्लेखही ला नाही. कलकत्ता, सिलिगुरी हा ब्रॉडगेज मार्ग तिसऱ्या योजनेत आधीच ठरला होता. त्या मार्गाच्या बांधणीची प्रगति चालली आहे एवढेच त्यानी म्हटले आहे.

नेफा, नागालँड, मणिपूर, व त्रिपुरा या प्रदेशांशी होणारे दळणवळण आसाममधूनच करावे लागते, त्यासाठी आसामला दररोज ६८१ वॅगन्सची गरज आहे. सध्या मिळतात २६० वॅगन्स. या परिस्थितीत काही सुधारणा होणार आहे की नाही याचाही रेल्वेमंत्र्यांनी खुलासा केलेला नाही.

यानंतर दुसरा प्रश्न सीमेवरील राज्यांच्या विकासाचा. १९६३-६४ सालात या दिशेने काय केले जाणार आहे याबाबतचे सुसंगत, तपशीलवार निवेदन कोणीही मंत्र्याने केलेले नाही! काश्मीर व पंजाब या राज्यांनी विकास योजनात कपात केलेली नाही, ही समाधानाची गोष्ट आहे. उत्तर प्रदेशने आणीबाणीमुळे निर्माण झालेल्या कामासाठी रु. ७.९ कोटींची तरतूद केली आहे.

आसामने आपल्या गरजांचे निवेदन जानेवारीमध्ये केंद्र सरकारला सादर केले होते. त्यापैकी रेल्वे वॅगन बाबतचा उल्लेख वर आला आहे. इतर बाबी पुढील प्रमाणे-

एक ब्रॉड गेज रेल्वे लाईन हवी. नदीतील वाहतुकीसाठी पूर्व पाकिस्तानातील जहाज कंपनीवर अवलंबून रहावे लागते. त्याचा परिणाम काय होतो हे गेल्या नोव्हेंबरात पाकिस्तानी खलाशानी केलेल्या संपावरून लक्षात आले आहे. म्हणून शक्यतो वाहतूक रेल्वेमार्गाने व्हावी, व ब्रह्मपुत्रेतून सरळ गंगेत येता यावे यासाठी या दोन नद्यांना जोडणारा कालवा बांधण्यात यावा. गोडाउन्स अधिक प्रमाणात बांधण्यात यावेत. भारतातील सरासरी विद्युत्‌निर्मिती दरडोई ३१-६९ Kwh आहे. तर आसामात ते प्रमाण २-४५ Kwh आहे. तेव्हा विद्युत् निर्मितीचे प्रमाण वाढविले पाहिजे. त्यासाठी तिसऱ्या योजनेत ४२ कोटींची मागणी केली होती. तर २७॥ कोटी मंजूर झाले होते. आता आणीबाणीच्या परिस्थितीत अधिक मंजूर व्हायला हवेत.

आसामातील पुरांचा प्रश्न मोठा आहे. १९६२-६३ सालात पुरामुळे २३ कोटीचे नुकसान झाले. पूरनियंत्रण कार्यक्रमासाठी आसामने ९ कोटीची मागणी केली,

अनुक्रमणिका

तर त्यापैकी १ कोटी मंजूर झाले. जमिनीची धूप रोखण्याचा प्रश्न आहे. तसेच आसामात अन्न डब्यात भरण्याचा धंदा चांगला चालू शकेल. सैनिकांना अन्न पुरवठा करणे त्यामुळे सुलभही होईल. सीमेंट, कागद कारखाने काढणेही शक्य आहे. खासी व गारो टेकड्यात कोळसा बराच आहे. तेव्हा या दिशांनी उद्योगधद्यांची वाढ करणे शक्य आहे.

आसाम व पलीकडील प्रदेशाशी देशाच्या इतर भागाचा संबंध सिक्कीम व पूर्व पाकिस्तान याच्यामधील पश्चिम बंगालच्या ३५ मैलाच्या चिंचोळ्या पट्ट्यातून ठेवता येतो. हा धोका लक्षात घेऊन आसाम, नेफा, नागालॅंड, मणिपूर, व त्रिपुरा यांचा विकास करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. या सर्व प्रदेशातील कार्यक्रमांचे चांगले संयोजन झाले पाहिजे. भारत सरकारने आपली ही विशेष जबाबदारी मानून काहीतरी करायला हवे. अर्थमंत्र्यांच्या अंदाजपत्रकी भाषणात या बाबत किंवा आसामने सादर केलेल्या मागण्याबाबत काहीही खुलासा वा उल्लेखही नाही. या प्रदेशाचा विकास हा संरक्षण-तयारीतील महत्त्वाचा भाग आहे हे भारत सरकारला मान्य नाही काय ?[५]

---

५. हा लेख ता. १२–३–६३ रोजी लिहिला होता. त्यानंतरच्या काळात अंदाजपत्रकांच्या आकड्यात काही फेरबदल झाले आहेत. गुजरातने नव्या करवाढीपैकी काही गोष्टी मागे घेतल्या आहेत. भारत सरकारने संरक्षणखात्यावरील खर्च रु. ८६७ कोटी वरून रु. ८२६ कोटीवर आणला आहे.

पण आकडेवारीच्या तपशिलात वरील सारखे काही किरकोळ बदल झाले असले तरी त्यामुळे लेखातील विवेचन व प्रतिपादनात बदल करण्याचे काही कारण दिसत नाही. –लेखक (१३–४–६३).

श्री. सदाशिव आठवले

" भारतीय संस्कृतिकोश " आणि –

कोशरचनेचे मंत्रतंत्र

एक मानवप्राणी केवळ सत्तर ऐंशी वर्षे जगतो. त्याची एकट्याची बौद्धिक कुवतही फार कमी असते. पण अखिल मानवजातीने गेल्या पांच हजार वर्षांत जमा केलेले ज्ञान प्रचंड आहे. कुणाही एकाच्या इवल्याशा मेंदूत ते मावणारे नाही. मात्र सर्व समाज मिळून हे ज्ञान टिकवून धरतो, वाढवितो. प्राचीन काळी माणसांनी मौखिक परंपरेने ज्ञानाची जपणूक केली. कालांतराने ते लिहून आणि छापून सांभाळले जाऊ लागले. तथापि ज्ञानाचा पसारा एवढा वाढलेला आहे आणि तो सतत असा वाढतो आहे की माणसाला त्यातले कव्हा काय घ्यावे आणि काय टाकावे; किती लक्षात ठेवावे आणि किती सोडून द्यावे हे कळेनासे होते. अशा दिङ्मूढ अवस्थेत स्वतःला सावरण्यासाठी माणसाने ज्या अनेकविध व्यवस्था लावून दिल्या आहेत त्यातलीच कोशरचना ही एक आहे.

कोशकल्पनेचा उगम आणि कोशकार्याचा विकास वगैरे तपशीलात शिरायला इथे अवकाश नाही. तथापि एका कोशकृतीचे [भारतीय संस्कृति कोश : " प्रथम खंड, अं ते औक्षण; संपादक पं. महादेवशास्त्री जोशी; प्रकाशक पं. महादेवशास्त्री जोशी भारतीय संस्कृतिकोश मंडळासाठी; प्रथमावृत्ति शके १८८४ (सन १९६२).] मूल्यमापन करावयाचे असल्यामुळे आधी कोश म्हणजे काय, तो कुणासाठी आणि कशासाठी असतो आणि मग तो कसा असावा ह्याची काही एक निश्चित कल्पना असल्यावाचून विशिष्ट ग्रंथाविषयी अभिप्राय सुसंगत वाटणार नाही.

कोश म्हणजे संकलन; संग्रह. हजारो लाखो ग्रंथांतून आणि स्फुट लेखातून विखुरलेले ज्ञान सारांशरूपाने एके ठिकाणी आणण्याचा विलक्षण खटाटोप. वाचनालयातील ग्रंथांनी आणि नियतकालिकांनी भरलेल्या शेकडो कपाटातली माहिती सारस्वरूपात एका कपाटातल्या एका खणात आणून ठेवण्याचा उद्योग. आपल्या मर्यादा लक्षात घेऊन माणूस एखाद्या दुसऱ्या विषयाचाच अभ्यास करतो. तेच आपले क्षेत्र असे ठरवतो. पण हे ज विज्ञान आणि मानव्यविद्या; वनस्पतिशास्त्र, खगोलशास्त्र; राज्यशास्त्र, मानसशास्त्र; चित्रकला, स्थापत्यशास्त्र वगैरे विभाग, पोटविभाग पडतात ते काही ध्वनिरोधक आणि प्रकाशरोधक भिंतींनी एकमेकांपासून वेगळे पाडलेले नसतात. त्या नुसत्या सोयीसाठी मारलेल्या रेषा आहेत. सर्व विषयांचे परस्परावलंबित्व अभ्यासकाला जाणवेच लागते. व्यवहार्यता ध्यानी घेऊन अभ्यासक आपल्या आवडीप्रमाणे समाजशास्त्रासारखा एखादाच विषय आपला म्हणून निवडील. पण भौगोलिक परिस्थिति, उपजीविकेची साधने; परंपरा वगैरे नीट समजल्याशिवाय समाजजीवन उलगडणार कसे ? तेव्हा भूगोलाचा, अर्थशास्त्राचा, इतिहासाचा अभ्यास प्राप्तच होतो. हे अन्य, पोषक, पूरक असे विषय तो संपूर्णपणे वाचू शकणार नाही. पण आवश्यक तेवढी माहिती त्याला सहजतेने मिळाली पाहिजे. संदर्भकोशाने ही सोय चांगली होऊ शकते.

समाज म्हणजे काही केवळ अभ्यासकांचा समुदाय नाही. उपरोक्त अभ्यासक सोडले तर समाजातील बहुसंख्य माणसे आपापले छोटेमोठे व्यवसाय करीत सुखाने जगत असतात. पण ही सर्व माणसे उदरनिर्वाहाखेरीज प्रवास, सहली, ऐतिहासिक स्थळे पहाणे, वस्तुसंग्रहालयांना भेटी देणे, नाटकाला जाणे, चित्रपट पहाणे, खेळांतून भाग घेणे अशा अनेकविध गोष्टी करीत असतात. कळत न कळत चित्रविचित्र सांस्कृतिक जीवन जगत असतात. ह्या सर्व माणसांना–सोयीसाठी ह्यांना आपण सर्वसामान्य माणसे म्हणू – संदर्भ कोशाची आवश्यकता आहे. एका गावी एक माणूस

शिंपी काम करीत राहतो आहे. ह्याला आपल्या धंद्यासंबंधी अधिक माहिती हवी असेल तर संदर्भ-कोशात ' शिवणकला ' ह्या नोंदीखाली त्याला स्थूल स्वरूपाची माहिती मिळायला पाहिजे. तिथेच त्याला त्या विषयावरच्या अधिक तपशीलवार आणि अद्ययावत् ग्रंथांची यादीही मिळाली पाहिजे. 'वेशभूषा ह्या नोंदीखाली त्याला देशोदेशींच्या पोषाखाच्या तऱ्हा काय आहेत ते सापडले पाहिजे. हा शिंपी रात्री एखाद्या नाटकाला जातो. नाटक त्याला फार आवडते. ते नाटक शेक्सपिअरच्या ' ऑथेल्लो ' ह्या नाटकाचे रूपांतर होते असे त्याला कोणीतरी सांगतो. त्याला कुतूहल निर्माण होते. ' एवढे चांगले नाटक मुळांत लिहिणारा शेक्सपिअर कोण ? ' गंमत म्हणून हा शिंपी ' हुतूतू ' खेळतो. खेळतांना भांडण होते. खेळाच्या एका नियमासंबंधी वाद होतो. बरोबर नियम काय आहे ? तो घारापुरी पहातो आणि म्हणतो ' हे कुणी बांधले ? का बांधले ? ' दैनंदिन जीवनातील अशी अनेकविध कुतूहले, अशा कितीतरी पृच्छा, कित्येक शंका सांगता येतील. प्रत्येकाच्या प्रत्येक शंकेचे संपूर्ण समाधान करता येईल असा कोश रचणे अशक्य आहे. पण कोणत्या लोकांच्या कोणत्या शंकांचे, कोठपर्यंत निरसन करायचे ह्यासंबंधी काही एक विचार पक्का करून कोशरचना करता येते- तशीच ती केली गेली पाहिजे.

स्थूलमानाने विश्वकोश हे सर्वसंग्राहक अशा स्वरूपाचेही असू शकतील आणि विशिष्ट ज्ञानविभागापुरतेही रचता येतील. इंग्रजीत व इतर युरोपीय भाषात सर्वसाधारण ज्ञानकोशांखेरीज " सामाजिक शास्त्रांचा ज्ञानकोश ", " विज्ञान कोश " " धर्म आणि नीतिशास्त्र कोश "; " वैद्यकीय ज्ञानकोश " अशा विविध प्रकारच्या रचना झालेल्या आहेत. मराठी भाषेतही " महाराष्ट्र ज्ञानकोश "; "सुलभ विश्वकोश " ह्यांच्या जोडीने " भरतखंडाचा अर्वाचीन कोश "; " चरित्र कोश "; " व्यायाम ज्ञानकोश " अशा तऱ्हेची कामे झालेली आहेत. साधारणपणे असे म्हणता येईल की सर्वसंग्राहक कोशातून जास्तीत जास्त विषयांची थोडी थोडी माहिती देण्याचा प्रयत्न असते तर विभाग कोशातून विशिष्ट विषयांची शक्य तेवढी अधिक माहिती पुरविण्याचा हेतु असतो. हे सारे नियोजित जागेत, पृष्ठसंख्येत, बसवायचे असल्याने माहिती थोडी म्हणजे किती, जास्त म्हणजे किती, काय घ्यावयाचे आणि काय वगळावयाचे ह्याची सुस्पष्ट कल्पना असावी लागते.

कोश सर्वसाधारण प्रकारचा असो की विशिष्ट स्वरूपाचा असो : तो ज्ञानकोश असतो. त्यांत माहिती यावयाची असते. म्हणूनच तो ' शब्दकोशा 'हून वेगळा असला पाहिजे. " लॉटरी " म्हणजे " सोरट " एवढे सांगितले की शब्दकोशाचे काम संपले. विश्वकोशात ' लॉटरी ' ही संस्था काय आहे, तिचा इतिहास, तिची सद्यःस्थिति आणि मानवी जीवनातील तिचे स्थान ह्यावर संपूर्ण माहिती आणि वाटल्यास थोडेबहुत भाष्यही येते. विश्वकोश केवळ ' सूची ' सारखाही असत नाही. " Indian writers' who's who " अशा प्रकारच्या कोशात किमान अमुक इतके लेखन केलेल्या प्रत्येक लेखकाचे, संपूर्ण नाव, पत्ता, जन्मतारीख, त्याच्या पुस्तकांची नावे अशी जुजबी माहिती येईल. ज्ञानकोशासारख्या कृतीमध्ये ह्यापैकी अनेक लेखकांचे उल्लेखही होणार नाहीत तर काहींच्या वाङ्मयीन कार्याचे तपशीलवार मूल्यमापन होईल.

आता पं. महादेवशास्त्री जोशी ह्यानी संपादिलेल्या ' भारतीय संस्कृति कोशा'कडे वळावयाचे. ग्रंथनामावरून आणि संपादकीय निवेदनावरून इथे नुसता शब्दकोश किंवा सूचि करावयाची नसून ज्ञानकोश उभारावयाचा आहे असे दिसते. ' भारतीय संस्कृति ' ह्या विषयापुरता तो मर्यादित रहावयाचा आहे हेही स्पष्ट होते.

कोशाला विस्तृत प्रस्तावनेची आवश्यकता असते. कोशात काय येणार आहे, काय येणार नाही; जे येणार आहे किंवा नाही ते का; कशाला किती जागा देण्यात येणार आहे व ती का हे विशद केलेले असावे लागते. तसेच कोशात नोंदी कोणत्या क्रमाने येतील हे दाखविलेले असले पाहिजे. ती विशिष्ट क्रमपद्धति का स्वीकारली ह्याचाही खुलासा योग्यच होईल. पुढे एखाद्या विषयावर माहिती हवी असेल तर कोशातून ती कशी काढावी, नोंदी, पूरक नोंदी, संबंधित नोंदी आणि ह्यांची एकंदर व्यवस्था कशी आहे ह्याबाबत वाचकाला नीट मार्ग-

दर्शन झाले पाहिजे. कोशाचे स्वरूप आणि मर्यादा स्पष्टपणे सांगून ठेवणे संपादकाच्या, आणि वाचकांच्या दोघांच्याही, हिताचे आणि सोईचे होते. इंग्रजी आदि करून युरोपीय भाषांतील आणि मराठीतीलही बहुतक सगळ्या कोशकारांनी ही सगळी खबरदारी घेतलेली आहे.

पं. महादेवशास्त्री जोशी ह्यांच्या 'भारतीय संस्कृति कोशा'लाही ' संपादकीय निवेदनाने ' प्रारंभ होतो. भारतीय संस्कृतिकोश मंडळाच्या एकोणीस संस्थापक सभासदांची नावे समजतात आणि पाठोपाठ हा "भारतीय संस्कृतीचा व्यापक आणि तपशीलवार " ज्ञानकोश होत आहे ही माहितीही मिळते. नंतर ' संस्कृतीची व्याख्या, ' ' भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य ' आणि ' भारत-महामानवतेचा सागर ' ह्या भागशीर्षकाखाली येणारा मजकूर वाचून संपादकाच्या वैयक्तिक मतांची काहीशी कल्पना येते खरी, परंतु कोशात नेमके काय मिळेल ह्याचा बोध मात्र होत नाही. तो बोध होतो पृष्ठ ४ ते ६ वरील कोशात ज्या. विषयांची " तपशीलवार माहिती यावयाची आहे त्यांच्या लांबलचक यादीवरून. ह्या यादीवरून असे वाटते की भारतीय संस्कृतीबाबत आपले काहीही अडले किंवा कोणत्याही एखाद्या लहानसहान गोष्टीबद्दल सुद्धा आपल्याला काही माहिती हवी असली तर ती ह्या कोश उघडला म्हणजे हमखास मिळेल. "भारताच्या विविध सांकृतिक परंपराचे, प्रवाहांचे आणि अविष्कारांचे साररूप पण सर्वांगीण दर्शन वाचकांना आणि जिज्ञासूंना घडावे " (पृ. ४) हे मुळी या कार्याचे उद्दिष्ट असल्यामुळे आपल्या सर्व अडचणी आता संपल्या असा एक दिलासा मिळतो. आणि क्षणभर आपण श्वास सोडतो. संदर्भ कसे पहावेत; अकार विल्हे (खर म्हणजे अंकारविल्हे !) क्रम कसा आणि का लावला आहे, एखाद्या विषयावरची माहिती किती नोंदीखाली पहावी वगैरे सारखे खलासे असते तर बरे झाले असते असे वाटते [हे काम कशारीतीने करावे ते डॉ. केतकर संपादित महाराष्ट्र ज्ञानकोशाच्या सहाव्या विभागाच्या (अ ते अर्थशास्त्र) सुरवातीस दिलेल्या ' रचनापरिचय ' व ' अंतरंगपरिचय ' ह्यावरून किंवा चित्रावशास्त्री कृत प्राचीन चरित्रकोशाच्या ' कोश कसा पहावा ' ह्या टिपणावरून सहज समजण्यासारखे आहे] तथापि हे सगळे सोडून देऊन प्रत्यक्ष कोश चाळू लागल्यावर काय दिसते ?

(१) 'अहमदाबाद' 'अहमदनगर' 'औरंगाबाद' ' अलाहाबाद ' ' इंदूर ' अशा अनेक स्थळांच्या नोंदीच झालेल्या नाहीत. केवळ मूळ संस्कृत नावाच्याच नोंदी करावयाच्या असतील असा संशयाचा फायदा द्यावा की काय असे मनात येते तोच ' अलीगढ ' दिसते. ' अजमेर ' ' आग्रा ' ' अटक ' अशा इतर अनेक शहरांच्या नोंदी आढळतात, त्याचप्रमाणे ' एकसाला ' ' एरंडोल ' ' उरेन ' अशी पाराणिक, ऐतिहासिक कथांशी निगडीत म्हणून आलली अनेक लहानसहान स्थळही येतात मग स्थळांच्या नोंदींचे तत्त्व तरी काय हे कसे उलगडावे ?

(२) निवेदनात दिलेल्या यादीप्रमाणे 'पुण्यश्लोक राजेमहाराजे '; ' राष्ट्रीय महापुरुष ' तसेच ' वैदिक पौराणिक व ऐतिहासिक राजवंश ' यावयाचे आहेत. मग दिल्ली येथे गादी स्थापन करणारा पहिला राज्यकर्ता, ' अनंगपाल ' (तोमर) काश्मीरचा श्रेष्ठ राजा ' अवंतिवर्मा '; पाण्ड्य राजवंशाचा संस्थापक ' अरिकेसरी ', उत्तर दिग्विजय करणारा राष्ट्रकूट राजा ' इंद्र ३ रा ' आणि भारतीय संस्कृतीवर आपल्या संस्कृतीची छाप बसविणारा ' अलेक्झांडर ' हे पुरुषविशेष कोठे आहेत ? आणि ' अहल्याबाई होळकर ' ही स्त्रीविशेष तरी कुठे आहे ? ' होळकर ' खाली येईल असे कसे म्हणावे ? ' ईश्वरचंद्र विद्यासागर ' जर ' ई ' खालीच येतात तर अहल्याबाई ' अ ' खाली नको काय ?

(३) राज्यशास्त्रीय स्वरूपाच्या ' अमात्य ' ' एकराट ' वगैरे नोंदी केलेल्या आहेत; पण ' अधिराज्य ' ' अष्टप्रधान ' वगैरे नाहीत.

(४) ' औताद ' म्हणजे सूफी लोकांच्या कल्पनासृष्टीतले जगाचे चार आधारस्तंभ ' ओचना ' म्हणजे धेड जातीचा धार्मिक मेळा आणि ' उपेक्षिता ' म्हणजे नायिकेचा एक प्रकार असे शब्दार्थ देण्याची आवश्यकता वाटते पण साहित्यशास्त्रातील ' उपमा ' आणि तर्कशास्त्रातील ' उपमान ' ह्या नोंदी करण्याची जरूरी

वाटत नाही. तेव्हा ह्या कोशाची बैठक तरी काय असा प्रश्न पुन्हा पुन्हा पडत रहातो.

(५) 'अमरनीति' नांवाचा दक्षिणेतील एक भक्त; 'अंबाबाई' नांवाची समर्थ रामदासांची एक शिष्या; 'अनोतिगसंगति' म्हणून अर्ध्या मांड्या झांकणारे श्रमणींसाठी एक वस्त्र; 'अंध' नांवाचा भागवत पुराणात वर्णिलेला एक नद, 'उत्तरकूलग' नांवाच्या गंगेच्या उत्तर तीरावर वास्तव्य असलेला जैनांचा एक पंथ; 'उम्मज्जग' म्हणून ज्याचा अनुयायी एकच बुचकळी मारून स्नान आटोपतो असा प्राचीन जैनपंथ ह्या व अशा कित्येक नोंदी कशासाठी घेतल्या आहेत? आपल्या सांस्कृतिक जीवनात त्याना काय व कितीसा अथ आहे?

– बरे, 'तपशीलवार' माहिती द्यायची असल्यामुळे कुणाला तरी, केव्हा तरी जरूर लागेल तेव्हा सगळे आले पाहिजे म्हणून दिले असे संपादक म्हणू शकणार नाहीत.

--कारण वाचकाला बौद्धपरंपरेतील प्रसिद्ध स्त्री 'अंबपाली' कोठे भेटत नाही ('अंबपालीवन' मात्र लागते!) 'अजामिल' 'अनारकली' 'एकलव्य' 'अतीश दीपंकर' ओदंततुरी' (पालांच विद्यापीठ) 'अंगकोरथोम', 'अंगकोर वट' अशा कमी जास्त महत्वाच्या, पण समर्थशिष्या 'अंबाबाई' हून निश्चितपणे अधिक आवश्यक अशा अनेक नोंदी चक्क सुटलेल्या आहेत. 'उत्तम श्लोक' नांवाच्या अत्यंत सामान्य मराठीकवि का घेतला आहे आणि जातककथा प्रसिद्ध 'आर्यशूर' का नाही ह्या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधणे मोठे बिकट आहे खरे.

भारताच्या सांस्कृतिक जीवनावर इंग्रजांसारख्या अभारतीयांनी काही परिणाम केला असण्याची शक्यता कोशकारास अजिबात दिसत नसावी. तेव्हा 'अँड्रयूज' ('दीनबंधु)'; 'अरुंडेल' 'एल्फिन्स्टन' अशी नावे कोशात येण्याचे कारणच काय?

वर अनेक उदाहरणे देऊन असे दाखविले की कित्येक नोंदी निष्कारण केल्या गेल्या आहेत तर कित्येक व्हायला पाहिजे होत्या अशा नोंदीचा पत्ताच नाही. अमुक कारणासाठी अमुक नोंद आली आणि अमुक आली नाही अशा स्वरूपाचा काही खुलासा वर घेतलेल्यापैकी एखाद्यादुसऱ्या उदाहरणापुरता कदाचित् करता येईलही पण वर उल्लेखिलेल्या आणि न उल्लेखिलेल्या अशा शेकडो नोंदी बाबत जो भोंगळपणा झाला आहे तो असमर्थनीय– कदाचित् अक्षम्यही– आहे. आता ज्या नोंदी झालेल्या आहेत त्यापैकी 'अश्मयुग' वगैरे नोंदीसारखे काही अपवाद सोडून उरलेल्यांचे स्वरूप काय आहे हे दोन तीन उदाहरणे घेऊन पाहू.

(१) 'अज' ह्या नोंदीखाली (अ) विष्णूचे एक नाव (आ) तुषित देवतातला एक आणि (इ) ब्रह्मदेवाचे एक नाव असे तीन प्रकार सांगितले हे ठीक झाले.

परंतु (अ) 'अज' नावाची एक जमात (आ) 'अज' नांवाचा रघुकुलातला एक प्रसिद्ध राजा आणि (इ) 'अज' हा एक यज्ञीय पशु ह्या तीन प्रकारांचे काय?

शब्द नीट विचारपूर्वक वापरले नाहीत तर काय घोटाळे होऊ शकतात हे 'अपर्णा' ह्या नोंदीच्या वाचनाने स्पष्ट होईल. तपस्विनी पार्वती झाडाची पर्णेही खाईनाशी झाली म्हणून 'पुरातत्ववेत्ते' तिला अपर्णा म्हणतात. ह्यात मूळ "पुराविदः" चे पुरातत्ववेत्ते असे रूपांतर करून हा दुसरा शब्द Archaeologists ह्या अर्थी रूढ झाला आहे ह्याची दखल घेतलेली नाही.

(३) नोंदीखाली दिलेली माहिती किती सामान्य स्वरूपाची अपुरी व चुकीचीही आहे हे फक्त एकच उदाहरण घेऊन पाहिले तरी पुरे:

'अर्जुनायन' ही नोंद घ्या. कोशातील अकरा ओळीत आलेल्या माहितीत अगदी द्यायलाच पाहिजेत अशा तपशीलांचा मागमूसही नाही. ह्यांचे गणराज्य होते ही फार महत्त्वाची गोष्ट सांगितलेलीच नाही. कोणत्याही एका राज्यकर्त्याचे नाव नसलेली व "अर्जुनायनानाम् जयः।" (अर्जुनायनांचा विजय असो) अशी मुद्रा असलेली इ. स. पूर्वीच्या पहिल्या शतकातली नाणी सापडलेली आहेत वगैरे फार मोलाची अशी माहिती अजिबात येत नाही.

अशी आणखी पुष्कळ उदाहरणे काढून दाखविता येतील. पण त्याने नुसता लेखविस्तार होईल, आणखी काही साधणार नाही म्हणून एवढ्यावरच

थांब्रणे ब्रे. तज्ञांपुढे, जिज्ञासूंसमोर कोश आहेच त्यांनी वाटल्यास अधिक खोलात शिरावे.

येथे नम्रपणे असे सांगू इच्छितो की अशा प्रकारची कामे अधिक चांगली, अधिक निर्दोष व्हावीत, अधिक उपयुक्त ठरावीत ही अभ्यासकांची आणि सामान्य जिज्ञासूंची इच्छा मात्र मी बोलून दाखवीत आहे. दोषैकदृष्टीने वाकडेच पहावे अशी बुद्धि नाही. पण जे दृष्टोत्पत्तीस आले ते अधिक अवलोकनासाठी व विचारासाठी जनतेपुढे ठेवावे अशा स्वरूपाचा हा एक प्रयत्न आहे.

अशा तऱ्हेची कामे अजूनही महाराष्ट्रात अनेक अडचणींना तोंड देत नेटाने आणि निष्ठेने करावी लागतात. तथापि काम थातुरमातुर झाले तरीसुद्धा प्रतिकूल परिस्थितीत केले; एकट्यादुकट्याने केले म्हणून प्रशंसनीय म्हणायचे असा 'कवतिकांचा' काळ आता राहिला नाही. एखादी चार पानी लघुकथा चांगली वठली नाही तर पुन्हा लिहिता येते; नाहीतर सोडून दिली तरीही चालू शकते. पण प्रचंड प्रमाणावर चालू केलेल्या कोशासारख्या कार्याचे बाबतीत दुरुस्तीचा खटाटोप आवाक्याबाहेरचा ठरतो. म्हणून मुळातच फार काळजी घ्यावी लागते. 'भारतीय संस्कृति कोशा'चे बाबतीत ती घेतली गेलेली नाही असे मोठ्यां खेदाने पण स्पष्टपणे म्हटले पाहिजे. अन्य काहीतरी म्हणता येईल पण ते 'अनृतं अपि प्रियं ब्रूयात्" च्या जातीचे होईल !

'भारतीय संस्कृतिकोश' खंडाच्या दर्शनाने एवढे मात्र निश्चित वाटते की ही अशा प्रकारच्या कोशाची कल्पना फारच चांगली आहे. नव्या जिज्ञासू, अभ्यासू महाराष्ट्राला अनेकविध संदर्भग्रंथ उपलब्ध झाले पाहिजेत. सर्वसाधारण कोशांबरोबरच, विशिष्ट विषयांचे कोशही नव्या पिढ्यांच्या हातात पडले पाहिजेत. 'भारतीय संस्कृति कोश' तर पाहिजेच पाहिजे. सरकारने, विद्यापीठांनी, विद्वानांनी-सर्वांनी ही गरज ओळखली पाहिजे. आणि कार्यप्रवण झाले पाहिजे. मात्र सर्वांच्या सहकार्याने परिश्रमाने जे व्हायचे तो कोष असावा; कोषाचा षोक नको.

श्री. ना. गो. चापेकर

चरणव्यूह

चरण म्हणजे चौथा भाग. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चार वेदांपैकी प्रत्येक वेद हा त्या चार वेदांचा चरण होय. व्यूह शब्दाचा अर्थ समुदाय असा भाष्यकारांनी केला आहे. परंतु तो कितपत बरोबर आहे याची शंका वाटते. आधी एका वेदाचे चार वेद करावयाचे आणि पुन्हा ते समुदित करावयाचे हे जरा चमत्कारिक दिसते. माझ्या मते चारी वेदांसंबंधी ज्यामध्ये माहिती सांगितली आहे अशा तऱ्हेची रचना असा काहीतरी अर्थ करणे योग्य होईल.

चरणव्यूह ही पुस्तिका वेदाच्या अर्थाच्या भानगडीत पडत नाही. वेदपारायण करण्याचे जे भिन्न प्रकार आहेत त्यांची माहिती या ग्रंथात दिलेली आढळेल. यावरून मुख्यत्वेकरून हा ग्रंथ वैदिकांकरिता आहे असे दिसते. हा "ग्रंथ" सुमारे २००० अक्षरांचा आहे. निर्णयसागर छापखान्यात या ग्रंथाची छापील पोथी दोन आण्याना मिळू शकते. फलश्रुतीचा पाचवा खंड सोडला तर याचे साहजिकच चार खंड होतात. एकेका खंडात एकेका वेदाची माहिती दिलेली आहे. एखाद्या कॉलेजमधील प्राध्यापकाने आपल्या पहिल्या व्याख्यानाचे टाचण करावे ह्याच स्वरूपाचे हे टाचण आहे.

चरणव्यूहाच्या शेवटी शौनकाला नमन केलेले आहे. आश्वलायनाने सुद्धा गृह्यसूत्राच्या अखेरीस शौनकाला नमन केलेले आहे. ते गृह्यसूत्र शौनकाचे नाही. तद्वतच हा चरणव्यूह शौनकाचा नसावा असे म्हणणे ओघानेच प्राप्त होते. आश्वलायनाचा असावा असे मला वाटत नाही. कारण तो त्याला शोभण्यासारखा नाही. अर्थात् त्याचा कर्ता कोण हे समजण्यास मार्ग नाही. शौनकाचाच हा ग्रंथ आहे असे मानण्यास काही योग्य कारण दिसत नाही. एका वैदिक ब्राह्मणाने रचलेले हे लिखाण असावे. एका काळी तीनच वेद होते. अथर्ववेदाला वेदत्व प्राप्त झाले नव्हते हे या चरणव्यूहाच्या लेखकाला माहित असल्याचे दिसत नाही. अगदी बरोबर बोलावयाचे म्हणजे हे विधान चरणव्यूह-कारांपेक्षा भाष्यकारांना लागू आहे. त्याचे आरंभीचे वाक्य असे: 'यदुक्तं चातुर्वेद्यं चत्वारो वेदा विज्ञाता भवन्ति तत्र ऋग्वेदो यजुर्वेदः सामवेदोऽथर्ववेदश्चेति' शौनकाच्या नावावर लहानमोठे अनेक ग्रंथ आहेत. त्यापैकी 'बृहत्देवता' हा एक होय. वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या मते ज्याला अर्धवट संस्कृत येत होते अशा माणसाने तो रचला असावा. त्या ग्रंथात अनेक अशुद्धे असल्याचे त्यानी वाचकास पटवून दिले आहे. अर्थात् ऋग्वेद प्रातिशाख्य लिहिणारा वैयाकरण शौनक हा नसावा असे म्हणण्यास हरकत नाही. याच कारणाने माझ्या मते चरणव्यूहाचाही कर्ता व्याकरण-कार शौनक नसावा.

चरणव्यूहाचा पहिला भाग ऋग्वेदविषयक आहे. आरंभीच चार वेदांचा नामनिर्देश केल्यावर "तत्र ऋग्वेदस्याष्टौ स्थानानि भवन्ति" असे म्हटले आहे. ऋग्वेदाची आठ स्थाने आहेत. लेखकाने स्थान शब्द कोणत्या अर्थाने योजला आहे ? पाठभेदावरून, तसेच भाष्यकारांच्या म्हणण्यावरून स्थान, भेद व शाखा हे समानार्थी शब्द असावे असे वाटते. चर्चा, श्रावक, चर्चक, श्रवणीयपार, क्रमपार, क्रमपद, क्रमजटा आणि क्रमदंड हे ते आठ भेद होत, चर्चा म्हणजे अध्ययन, श्रावक-अध्ययन सांगणारा, चर्चक म्हणजे शिष्य आणि श्रवणीय म्हणजे ऐकण्यास योग्य असा वेद. त्याचा पार म्हणजे समाप्ति. ही आठांपैकी चार अंगे. दुसऱ्या चार पदांनी चार पारायणे सुचविली आहेत असे भाष्यकार म्हणतात. संहिता, क्रम, जटा व दंड हे पारायणाचे प्रकार आहेत. या आठ स्थानांपैकी पहिली चार स्थाने व दुसरी चार स्थाने यांचा अर्था-अर्थी काही संबंध दिसत नाही, वेद, गुरु आणि शिष्य ही पठणाची वास्तविक अंगे म्हणता येतील; पण समाप्ति हे पारायणाचे स्वतंत्र अंग धरण्यात विशेष

अनुक्रमणिका

स्वारस्य दिसत नाही. क्रम, जटा, दंड हे म्हणण्याचे प्रकार आहेत. किती पदे घ्यावयाची; अनुलोम, विलोम कसा करावयाचा, ते ह्यांच्या अभ्यासाने सुचविले जाते. या म्हणण्याला पारायण असे नाव आहे. पारायण म्हणजे पुरे करणे. घनादि आणखी सुद्धा पठणाचे प्रकार आहेत. तथापि चरणव्यूहकार चार पारायणेच सांगतो.

या पारायणाच्या शाखा असे सांगून आश्वलायनी, सांख्यायनी, शाकल, बाष्कल व मांडूकेय ही त्यांची नाव सांगितली आहेत. 'एतेषा वेदपारायणानां पंचशाखा भवन्ति' असे भाष्यकार महीदास म्हणतो, परंतु याचा अर्थ वेदपारायणातून आश्वलायनादि पाच शाखा उद्भवल्या असा नाही. ऋग्वेदाच्या या शाखा अगोदरच अस्तित्वात असल्या पाहिजेत; कारण 'तेषामध्ययनम्' या चरणव्यूहातील सूत्रावर भाष्य करताना 'तेषां आश्वलायनादि शाखानां समानाध्ययनं सूचयति' असे म्हटले आहे. सारांश अध्ययनाची पद्धति सर्वांची सारखीच असली पाहिजे. शाखा कशा पडल्या हे चरणव्यूहकार सांगत नाही. त्या होत्या तशा त्याने वर्णिल्या इतकेच. या शाखाभेदाबद्दल आपणास तर्कच करावयास हवा. वैदिक आर्यांच्या निरनिराळ्या टोळ्या अगर जमाती सिंधु नदीच्या पलीकडून भारतात येऊन निरनिराळ्या ठिकाणीं वस्ती करून राहिल्या असे वारंवार म्हटले जाते. आणि ते निराधार आहे असे दिसत नाही. ऋग्वेदात अग्न्यर्चनाचे वर्णन आहे. त्यावरून असे दिसते की, देवाना यज्ञासाठी म्हणजे सोमपानासाठी आव्हान करणारे मंत्र प्रत्यही स्वतंत्र रचण्यात येत होते.

"युगान्तरे अन्तर्हितान् वेदान्" या वचनावरून कोणत्याही कारणाने का असेना हा रोजचा अर्चनविधि बंद पडला. तथापि तोपावेतो रचलेले मंत्र लोकांच्या पाठामध्ये असणे संभवनीय आहे. हे सर्व मंत्र अथवा ऋचा फाटाफूट झाल्यानंतर एकाच माणसाकडे असणे शक्य नाही. निरनिराळ्या माणसांकडे निरनिराळे मंत्र असणे अधिक संभवनीय दिसते. माणसांकडे मंत्र असणे याचा अर्थ त्यांच्या ते पाठात असणे अथवा त्यांच्यापाशी ते लेखरूपाने असणे असा समजणे संयुक्तिक होईल. या कारणाने युगान्तरी रचलेले काही मंत्र काही माणसांना ज्ञात असतील तर दुसरे मंत्र दुसऱ्या कित्येकांना अवगत असतील. हेच शाखाभेदांचे कारण संभवते. परंतु हा संभव मनात न आणता वैदिक समाज एकजिनसी होता आणि गुरुपरंपरेने वेदाध्ययन करण्यात आल असा सर्वसाधारण समज उत्पन्न झाला. यामुळे गुरुपरंपरा सिद्ध करण्याची धडपड सर्वत्र झालेली दिसते. परंतु त्यात इतकी धरसोड आहे की त्यावर विश्वास ठेवणे कधीही शहाणपणाचे होणार नाही. उदाहरणार्थ, आपण काही आचार्य घेऊ. महीदास म्हणतो, व्यासाने पैलमुनींना ऋग्वेद शिकविला. तोच वेद पलमुनींनी प्रमितीस शिकविला. प्रमितीने पूर्वीच्या अध्ययनात जटा, विकृतीची भर घालून तो वेद बाष्कल, बोध्य, याज्ञवल्क्य,[१] पराशर, अग्निमित्र या शिष्यांना व आपला पुत्र मांडूकय या सहा जणांना शिकविला.

यावरून माडूकय हा इन्द्रप्रमितीचा पुत्र ठरतो. याच भाष्यात पुढ असे म्हटले आहे की, मांडूकेयशिष्य वेदमित्र याचा शाकल्य नावाचा मुलगा होता. शाकल्याने दंडविकृतीची भर घालून तोच वेद मुद्गलादि इतर ऋषींना शिकविला. आणखी पुढे बाष्कल, पैलशिष्य होता आणि बाष्कलि हा बाष्कलाचा पुत्र. या बाष्कलीने पूर्वी सांगितलेल्या सर्व शाखांतून निराळे मंत्र काढून वालखिल्यसंहिता रचली. आता ह्या प्रमाणे ही जर अखंड गुरुपरंपरा होती तर शाखाभद असिद्ध होतो हे उघड आहे. वरील गुरुपरंपरेच्या विरुद्ध अनेक वचने संग्रहीत करिता येणे शक्य आहे. प्रथम आपण वालखिल्यसंहितेचाच विचार करू. वालखिल्य मंत्र हे प्रत्येक वेदाला परिशिष्टाप्रमाणे जोडलेले आहेत. ज्याला पदपाठ नाही तो वालखिल्य मंत्र अशी वालखिल्याची सामान्य व्याख्या करिता येते. शिवाय, पारायणात वालखिल्य मंत्र म्हणू नयेत असा निर्बंध आहे. तात्पर्य, मूळ मंत्रातून काही मंत्र गोळा करून ते अस्पृश्यांप्रमाणे बाहेर फेकून देणे हे सामान्य बुद्धीलाही पटण्यासारखे नाही.

वरील माहिती भाष्यकारांनी दिलेली आहे. ती फारशी विश्वसनीय आहे असे वाटत नाही. अगदी आरंभापासूनच आपण थोडासा विचार करू. व्यासाने

१. हा यजुर्वेदकर्त्या याज्ञवल्क्याहून निराळा.

अनुक्रमणिका

एका वेदराशीचे चार विभाग केले असे बहुतेकजण आजपर्यंत सांगत आले आहेत. परंतु मला वाटते या शब्दांना काही अर्थ नाही. वेदाची एक रास होती म्हणजे काय होते? ती हस्तलिखिताची रास होती का? आणि त्या राशीवर दोन आडव्या काठ्या मारून तिचे चार भाग केले असे का या लोकांना सुचवावयाचे आहे? ही अशक्यप्राय गोष्ट खरी मानणेच शक्य नाही. म्हणून तिचा जास्त विचार करण्याचे कारण नाही. आता व्यासांनाच सर्व वेद मुखोद्गत होता व त्याचे त्यांनी चार भाग कल असे मानले तर ते कोणत्या तत्त्वाला अनुसरून केले याची माहिती कोणी देत नाही. शिवाय, हे जर एका माणसाचे कृत्य होते. तर तेच ते मंत्र चारही वेदात का यावे, याचेही स्पष्टीकरण कोणी करीत नाही. सारांश, व्यासांनी एका वेदाचे चार वेद करून आपल्या चार शिष्यांस एकेक वेद पढविला ही अगदी कपोलकल्पित तशीच वेडगळपणाची कल्पना आहे. व्यासाने आपल्या शिष्यांना वेद पढविले असे सांगण्यात येते. तेव्हा असा प्रश्न विचारावासा वाटतो की, हा पढविण्याचा अधिकार व्यासांना दिला कोणी? व्यासाला 'आचार्य' या पदवीने कोणाही संबोधिले नाही. असो. ह्या आख्यायिकेत फक्त एकेकच वेद शिकविला एवढीच आपणास माहिती मिळते. पण हा भाष्यकार त्याच्याही पुढे जाऊन म्हणतो की, व्यासाने पदक्रमासह ऋक् संहिता पैल शिष्याला शिकविली. यावरून हे उघड होते की, या गृहस्थाला ऋक् संहितेचा पदपाठ शाकल्याने केला याची वार्ताही नव्हती. ऋक् संहिता व्यासापासून पैल शिकला; पैलाने इंद्रप्रमितीला शिकविली आणि इंद्रप्रमितीने आपला मुलगा मांडूकेय याला दिली. आणि तीच मांडूकेयाने आपला मुलगा जो शाकल्य त्याला दिली. यावर प्रश्न असा उद्भवतो की, सध्याच्या संहितेस शाकलसंहिता म्हणण्याचे कारण काय? व्यासाच्या, इंद्रप्रमितीच्या किंवा मांडूकेयाच्या नावाने ती का संबोधिली जाऊ नये? तसेच शाकल संहितेहून मांडूकेय संहिता निराळी कशी असू शकेल? या असल्या माहितीवर विसंबून राहणे धोक्याचे आहे. जेथे माहितीच अर्धवट, अपुरी व विसंगत आहे अशा माहितीवरून काढलेली अनुमाने व निर्मिलेले सिद्धान्त चुकीचे ठरले तर आश्चर्य नाही. उदाहरणार्थ, शाकल व शाकल्य हे एकाच व्यक्तीचे नाव होते किंवा ते दोघे पितापुत्र होते याबद्दल वाद आहे. तसेच मांडूकेय हे व्यक्तीचे नाव होते अथवा पैतृक नाव होते याचीही वानवाच आहे. ऐतरेय आरण्यकात ऋग्वेदाचा अध्यात्मपर अर्थ हा लावी असे म्हटले आहे. यावरून संहिता नुसती पाठ म्हणणाऱ्या आजच्या ब्राह्मणाप्रमाणे मांडूकेय वैदिक ब्राह्मण नव्हता. मांडूकेयाच्या नंतरचा शाकल्य, यानेच पदपाठ केला. याचा अर्थ संहितेचा अर्थ लावण्याचा पहिला प्रयत्न शाकल्याने केला. असे समजले पाहिजे. हे खरे असेल तर मांडूकेयाने अध्यात्मपर अर्थ लावला-पदे न पाडलेल्या संहितेचा लावला-असे म्हणणे प्राप्त आहे. निरनिराळ्या वेदांच्या स्वरचिन्हांचा उल्लेख भाष्यकारांनी केलेला दिसत नाही.

शाखानिर्देशानंतर ऋग्वेदसंहितेची दहा मंडले व चौसष्ट अध्याय आहेत, असे या व्यूहात स्पष्ट म्हटले आहे. लक्ष वेधण्यासारखी गोष्ट ही कीं, दशमंडलांतर्गत चौसष्ट अध्याय हे एका शाकल शाखेचे नाहीत. हा उल्लेख ऋग्वेदाच्या पांचही शाखासंबंधाने आहे. यावरून शाकल्यव्यतिरिक्त बाकीच्या शाखांच्या स्वतंत्र संहिता आहेत ही समजूत निराधार दिसते. यानंतर वर्गसंख्या, पदसंख्या व अक्षरसंख्या इत्यादि सांगून व्यूहाची ऋग्वेद खंडापुरती समाप्ति झाली आहे.

उत्तम श्लोक वाङ्मय-मंडळ, उम्बरखेड (वऱ्हाड) या संस्थेतर्फे जो चरणव्यूह प्रसिद्ध झाला आहे त्यामध्ये संपादकांनी अतिशय महत्त्वाची माहिती दिलली आहे. ती माहिती म्हणजे बाष्कल व सांख्यायन यांच्या म्हणण्यात आणि शाकल संहितेच्या म्हणण्यात असलेला फरक संपूर्णपणे सांगितलेला आहे. म्हणून त्यांची दोन कोष्टके येथे उतरून घेणे अवश्य आहे.

अथ ऋग्वेदीयो बाष्कल संहिताक्रमः ॥

प्रारंभः		अन्तः
अग्निमीळे १।१।१	—	श्रुष्टिमन्तम् १।९३।१२
नासत्याभ्याम् १।११६।१	—	जुषध्वम् १।१३९।११
इमं स्तोमम् १।९४।१	—	उतद्यौः १।११५।६
वेदिषदे प्रिय १।१४०।१	—	हरिश्रियम् ८।५०।१०
अग्नआयाह्य ८।६०।१	—	सोमस्य पीतये ८।९४।१२
यथा मनोसां ८।५१।१	—	चनसंनशे ८।५५।५
आत्वा गिरो ८।९५।१	—	विघ्ननेकम् १०।८८।१८

एक एवाग्नि ८।५८।२ -- सर्वम् ८।५८।२
यमृत्विजो ८।५८।१ -- संवित् ८।५८।१
यावन्मात्रमुषसो १०।८८।१९ — सुसहासति
१०।१९१।४
संज्ञान मुशना -- चतुष्पदे
-प्रथम परिशिष्टम्, पृ. ६.

— आकडे मंडल, सूक्त व ऋचा यांचे आहेत.

ही कोष्टके अभ्यसनीय आहेत. निरनिराळ्या शाखांच्या स्वतंत्र संहिता धुंडणारांची निराशा होईल.

ह्यात ५ सूक्तांचे मंत्र ऋग्वेदीय खिलांतील आहेत. ८।५८।१ हें एकच मंत्राचे सूक्त दिसते. संज्ञानसूक्त तर स्वतंत्रच आहे. बाष्कल शाखा असली तरी संहिता शाकलच.

अथ ऋग्वेदीयः सांख्यायन संहिता क्रमः
अग्निमीळे ऋ. १।१।१ – पुरस्तात् (८।४८।१५)
अग्निप्रवः (ऋ. ८।८।९।१ – नआयुः (८।५९।७)
अग्नआयाह्य (८।६०।१) – सुसहासति (१०।१९१।४)
संज्ञान सूक्त ऋ. १५ संज्ञान मुशना०

इति सांख्यायन संहिता. – द्वितीय परिशिष्टम् पृ. ३ आश्वलायन व मांडूकेय या दोन शाखांविषयी काहीही लिहिलेले नाही.

सांख्यायन संहितेत वालखिल्यसूक्तांचा अंतर्भाव झालेला आहे.

' संज्ञान मुशना, हे सूक्त शाकल संहितेच्या शेवटी परिशिष्टात दिलेले आढळते. उलट, सांख्यायन संहितेत संहितेचा भाग म्हणून शेवटचे सूक्त येते. संज्ञान मुशना या दोन शब्दांनी संज्ञान सूक्ताचा आरंभ होतो. या सूक्ताचे चार वर्ग असून पंधरा मंत्र आहेत. येथे ऋग्वेदाची माहिती संपली.

यापुढील खंड यजुर्वेदविषयक आहे. यजुर्वेदात ८६ भेद असून मंत्रसंख्या ११०८ दिली आहे. या संहितेचे दोन वेळा पठण केले म्हणजे तो वैदिक पदपार या संज्ञेस होग्य होतो. तसेच तीन वेळ पठणाने त्याला क्रमपार ही संज्ञा मिळते. हे विधान मैत्रायणी संहितेला लागू आहे. यावरून भाष्यकार निष्कर्ष काढतो की, मैत्रायणीयांना पदक्रमाध्ययन संहितेहून वेगळे नाही. मैत्रायणीयांचे सहा भेद सांगितल्यावर पूर्व, उत्तर व नैर्ऋत्य या दिशांमध्ये वाजसनेयी शाखेचे पंधरा भेद असल्याचे वर्णिले आहे. वाजसनेयी वेदात एकोणीसशे मंत्र आहेत. तैत्तिरीय शाखेचे मुख्य दोन भेद सांगितले असून त्यापैकी एका शाखेचे (खांडिकेयांचे) पाच भेद आहेत. सत्याषाढी, हिरण्यकेशी, बौधायनी, आपस्तंत्री, औधेयी हे खांडिकेयांचे पोटभेद मानले जातात. 'मंत्रब्राह्मणयोर्वेदस्त्रिगुणं यत्र पठ्यते । यजुर्वेदः सविज्ञेयो अन्ये शाखांतराः स्मृताः ।' चरणव्यूहकारांच्या मतें मंत्र-ब्राह्मणरूपी जो वेद तोच खरा यजुर्वेद होय. बाकीच्यांना शाखा म्हणतात. मंत्र आणि ब्राह्मण हे लक्षण फक्त तैत्तिरीय शाखेलाच लागू पडते. अशा या वेदाचे तीनदा अध्ययन करावे असा अर्थ 'त्रिगुणं यत्र पठ्यते' या वचनाचा करणे संयुक्तिक होईल. कारण पूर्वीच सांगितल्याप्रमाणे मैत्रायणी संहितेचे द्विगुणं अध्ययन करणारा पदपार होतो असा अर्थ भाष्यकारांनी पूर्वी केला आहे. पण येथे मात्र संहिता, पद, क्रम या रीतीने जे पठण ते त्रिगुण पठण असे म्हणतो. याच्याही पलीकडे जाऊन संहिता व ब्राह्मण या उभयतांचेही त्रिगुणत्वाने म्हणजे उदात्त, अनुदात्त, स्वरित या स्वरांसहित पठण ते त्रिगुणपठण होय असेही विरोधाची पर्वा न करता म्हणतो. या तीन स्वरात सांगितलेले पठण दुसऱ्या कोणत्याही शाखेत नाही असे या भाष्यकाराचे म्हणणे आहे. वाजसनेयी हे वेदाचे की शाखेचे नाव ? मैत्रायणी शाखेचे लोक वाजसनेयी संहितेचे अध्ययन करितात असेही भाष्यकार सांगतो! ध्यानात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, चरणव्यूह शुक्ल व कृष्ण यजुर्वेद असा भेद करीत नाही. भाष्यकारांनी आणखी एक विशेष सांगितलेला आहे तो असाः विवाह, सोमयज्ञ, श्राद्ध व अग्न्याधान या कर्मात वाजसनेयाने स्वजातीशी संबंध करावा नाहीतर तो पतित होतो. आणखीही महत्त्वाची माहिती भाष्यकारांनी दिली आहे.

नर्मदेच्या दक्षिणेस यजुर्वेदाची आपस्तंबी, ऋग्वेदाची आश्वलायनी, सामवेदाची राणायनी व अथर्ववेदाची पिप्पला या चार शाखा असून त्या शाखांचे अध्ययन करणारात परस्पर यज्ञविवाहसंबंध होतो. नर्मदेच्या उत्तरेस माध्यंदिनी, सांख्यायनी, कौथुमी व शौनकी ह्या चार शाखा अनुक्रमे यजुर्वेद, ऋग्वेद, सामवेद, व अथर्ववेद यांच्या असून त्यांचाही परस्पर संबंध (यज्ञ, विवाह इत्यादि कर्मात) विहित आहे. सह्याद्रिशिखरापासून व कृष्णा, तुंगभद्रा व गोदावरी

यांचे तीरी आंध्र देशापर्यंत (तैलंगण) शाकल व आश्वलायन या दोन शाखा आहेत. नर्मदेच्या उत्तरेस गुर्जर देशात ऋग्वेदच आहे. त्याची तिकडे सांख्यायनी शाखा व कौषीतकी ब्राह्मण आहे. आंध्रापासून दक्षिण देशात–आग्नेयेकडे असलेल्या देशात गोदासागरापर्यंत यजुर्वेदाच्या तैत्तिरीय व आपस्तंबी शाखा आहेत. अध्वर्यु, उद्गाता व होता यांची कर्मे सांगणारी शेकडो सूत्रे आहेत. जेथे त्यांचा परस्पर विवाह व यज्ञसंबंध होतो तेथे त्या सूत्रांचे ज्ञान सफल होते. सह्याद्रीपासून नैऋत्येस असलेल्या समुद्रापर्यंत परशुराम क्षेत्राचे सन्निध हिरण्यकेशी शाखा आहे. मयूरपर्वतापासून गुजराथच्या सरहद्दीपावेतो मैत्रायणी शाखा असून वायव्यसरहद्दीपर्यंत तिचा प्रसार आहे. अंग (बिहार), वंग (बंगाल), कलिंग (ओरिसा), कानीन (गौड) व गुजराथ देशांत वाजसनेय वेदाची माध्यंदिनी शाखा आहे. याज्ञवल्क्याने शुक्ल यजुर्वेदाची जी प्रथम कण्व शाखा तिचा सर्व देशात प्रसार केला[२]. भाष्यकार विसंगतिदोष मानीत नाही असे दिसते.

या ग्रंथात ज्या शाखांचा उल्लेख केलेला आहे त्या शाखाहून अधिक शाखा नाहीत असा कोणीही गैरसमज करून घेऊ नये. मूळ ग्रंथकार व भाष्यकार याना माहित होत्या तेवढ्याच शाखा त्यानी दिल्या आहेत; रघुवीरसिंगाच्या वैदिक जर्नलमध्ये भारद्वाज गृह्यसूत्र प्रसिद्ध झाले आहे. त्यात यजुर्वेदाची यावनी शाखा दिलेली आढळते. या शाखेचे स्वरूप काय व तिला यावनी म्हणण्याचे कारण काय याचे संशोधन अद्याप कोणी केल्याचे दिसत नाही.

यजुर्वेदानंतर अर्थातच सामवेदाचा क्रम लागला. सामवेदाचे हजार भेद आहेत असे व्यूहकार आपणास सांगत आहेत. परंतु अनध्यायाच्या दिवशी अध्ययन करणारे होते त्याना इंद्राने नष्ट केले, म्हणून शाखाही नष्ट झाल्या अशी आख्यायिका भाष्यकारांनी नमूद केली आहे. सामवेदातही वालखिल्यांचा समावेश झालेला आहे. भाष्यकार म्हणतात, सध्या गुजराथेत कौथुमी, कर्नाटकात जैमिनी व महाराष्ट्रात राणायनी अशा तीनच शाखा अस्तित्वात आहेत. या खंडात भाष्यकारांनी भागवत द्वादश स्कंधाच्या आधारे माहिती दिली आहे. ती अशी की, जैमिनीचा अति बुद्धिमान शिष्य सुकर्मा याने सामवेद या वृक्षाच्या सामांचे एक हजार भेद केले.

यानंतर अथर्ववेदाच्या खंडात अशाच प्रकाराची माहिती देऊन शेवटच्या फलश्रुति खंडाने चरणव्यूहाची समाप्ति केली आहे. गर्भिणी स्त्रीला चरणव्यूह ऐकवला असता तिला पुत्रसंतति होईल. अशाच प्रकारची फले या खंडात वर्णिली आहेत. या कारणाने चरणव्यूहाचे महत्त्व वाढेल अशी चरणव्यूहकारांची कल्पना असावी.

चरणव्यूहाचा अभ्यास विचार करणाऱ्याला बोधप्रद झाल्याशिवाय राहणार नाही. प्रथमतः शाखाभेद व गुरुपरंपरा यांचा मेळ कधी घालता येणे शक्य नाही. अव्याहत गुरुपरंपरा चालू असती तर शाखाभेद होण्याचे कारणच नव्हते. दुर्दैवाने याचा विचार कोणी करीत नाही.

या व्यूहाच्या अभ्यासाने उत्तरध्रुवावर वैदिक आर्यांची वस्ती होती ही गोष्ट मनावर अधिकच ठसते. हिमपाताने वैदिक आर्यांची पांगापांग झाल्यावर उत्तरध्रुवावरील यज्ञपद्धतीची परंपरा सुटणे साहजिक आहे. हे जरी सोडून दिले, तरी सिंधु नदीच्या पलीकडून वैदिक आर्यांच्या निरनिराळ्या जमाती निरनिराळ्या काळी भारतात शिरून निरनिराळ्या ठिकाणी वास्तव्य करून राहिल्या ही गोष्ट जाणत्यांना मान्य होण्यासारखी आहे. अर्थात् प्रत्येक जमातीने आपापला संप्रदाय वेगळा स्थापन करणे सामाविक होते. वस्तुतः उत्तर ध्रुवावरील अर्चन विधीमध्ये हौत्राबरोबर याजुष मंत्र होतेच. सामवेदाला तर स्वतंत्र असे अस्तित्वच नव्हते. गाण्याच्या पद्धतीवर ऋचा म्हणणे हेच उद्गात्याचे काम. याजुष मंत्र गद्यात असत. भारतात आल्यावर याजुष मंत्रवाद्यांनी सवता सुभा स्थापिला. त्यामुळेच त्यांच्या ग्रंथात काव्याबरोबर गद्यही आले. सामवेद्यांना स्वतंत्रता कशी करून घेता आली हा एक प्रश्नच आहे. असा तर्क करण्यासारखा आहे की, शाकल संहितेत ज्यांचा अंतर्भाव झाला नाही. असे ऋक् मंत्र निरनिराळ्या जमातीत प्रचलित असावेत. त्यांचा या संप्रदायस्थापकांनी उपयोग करून

२. ही माहिती लेखकाला प्रत्यक्ष अथवा ऐकीव असणे स्वाभाविक आहे.

घेतला असल्यास नवल नाही. शिवाय, भारतात आल्यावर अग्निपूजनाच्या प्रसंगाने पूर्वीच्या ऋक् मंत्रांचे अनुकरण म्हणून नवीन मंत्रांची रचना करणे असंभवनीय नव्हते. यांनाच खिलमंत्र म्हणत असतील. पूर्वीच्या ऋग्वेदाच्या अभिमान्यांनी हे खिलमंत्र परिशिष्ट म्हणून मानले. त्यांचा समावेश अव्वल ऋग्वेदांत करण्याचे त्यानी साफ नाकारले. फार काय, पारायणप्रसंगी खिलमंत्र म्हणावयाचे नाहीत असा त्यांचा कटाक्ष होता. पुढे कित्येक आचार्यांनी या मंत्रांचा समावेश आपल्या संहितेत करून आपल्या संप्रदायाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. खिल शब्द ऋग्वेदात सापडत नाही. संस्कृतात आहे, पण तो निराळ्या अर्थाने. हा शब्द दुसऱ्या कोणत्या भाषेत सापडतो की काय हे पहाणे अगत्याचे ठरेल.

ऋग्वेदी मंत्र किंबहुना सर्वच मंत्र स्वरसहित म्हणावयाचे असतात. या स्वरांचा उगम उद्गात्याच्या गायन पद्धतीत असावा. आरोह अवरोह हे गद्यापेक्षा पद्यातच अधिक स्पष्टपणे दिसतात. हे स्वरभेद आणि स्वरचिन्हे ही निरनिराळ्या वेदात निरनिराळी आढळतात. या वेगळेपणानेही गुरुपरंपरातर्क साफ ढासळतो.

आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. चरणव्यूहात चार वेद सांगितले. त्यांच्यावरील भाष्यात महीदास माहिती देतात. ती अशी : आश्वलायन गृह्यसूत्रात काही आचार्य मांडूकेय गणात, काही सांख्यायन गणात, तर काही आश्वलायन गणांत आहेत. गण शब्दाची व्याख्या न करता हे गण सांगितले आहेत. माझ्या मते सांस्कृतिक दृष्ट्या व सामाजिक दृष्ट्या संघटित झालेली जमात हाच अर्थ येथे प्रशस्त ठरेल. हिलाच हल्लीच्या शब्दात जात म्हणता येईल. मी पुढे जो आक्षेप घेणार आहे तो नीट समजावा म्हणून महीदासानी सांगितलेल्या गणातील आचार्यांची नावे[३] येथे देणे अगत्याचे आहे.

आता यामध्ये प्रथम गोष्ट मनात येते ती ही की, शाकल व बाष्कल या दोन शाखांचे स्वतंत्र गण नसावे. हे दोघे आचार्य आश्वलायन गणातील होत. यावरून एकाच गणात निरनिराळ्या शाखा प्रचलित होत्या असे समजावयाचे काय ? दुसरे म्हणजे शाकल्याचे नांव मांडूकेय गणात येते व शाकलाचे नांव आश्वलायन गणात येते. यावरून शाकल आणि शाकल्य या दोन वेगळ्या व्यक्ती होत्या असे ओघानेच म्हणावे लागते. वरील आचार्य व त्यांचे गण हे कालानुक्रमाने दिले असावे असे म्हणणे गैर होणार नाही. कारण आश्वलायन सूत्रांत त्यांची नांवे अगोदर घातली आहेत. हे सर्व आचार्य समकालीन होते असे म्हणण्यासही बऱ्याच अडचणी उत्पन्न होतील. अन्यत्र भाष्यकाराने शाकल्याच्या पित्याचे नांव वेदमित्र म्हणून दिले आहे. आणि वेदमित्र हा मांडूकेयाचा शिष्य होता. यावरूनही शाकल व शाकल्य हे दोन निराळे असावे असे वाटते. हा सर्व गोंधळ आहे. पुराणातील वचने पारखून न घेता तशीच्या तशीच उचलून घेण्याने असा गोंधळ उत्पन्न होणे स्वाभाविक आहे.

---

३. मांडूकेय गण
(१) जानन्ति
(२) बाहवि
(३) गार्ग्य
(४) गौतम
(५) शाकल्य
(६) बाभ्रव्य
(७) माण्डव्य
(८) मांडूकेय

सांख्यायन गण
(१) गर्गीवाचक्नवी
(२) वडवाप्रातीथेयी
(३) सुलभा
(४) मैत्रेयी
(५) कहोळ
(६) कौषीतक
(७) महा कौषीतक
(८) पैंग्य
(९) महापैंग्य
(१०) सुयज्ञ
(११) सांख्यायन

आश्वलायन गण
(१) ऐतरेय
(२) महैतरेय
(३) शाकल
(४) बाष्कल
(५) सुजातवक्त्र
(६) औदवाहि
(७) महौदवाहि
(८) सौजामि
(९) शौनक
(१०) आश्वलायन

. वालखिल्य सूक्तेही खिलच होत. त्यांचा समावेश वैदिक संशोधन मंदिराच्या ग्रंथात केला आहे. त्याचे विशिष्ट कारण समजत नाही. ह्यांच्यावर सायनानी भाष्य केले नाही. ही सूक्ते ८ व्या मंडलात मध्येच घातली आहेत (४९ ते ५९) एकूण ११. सायनाचार्यांच्या पोथीत सूक्तांचा क्रम कसा होता माहीत नाही. वालखिल्याची उत्पत्ति अद्भुत आहे. त्याचाच हा प्रभाव असावा. मनुष्यत्वच त्यांच्या ठिकाणी नसावे. अशा सूक्तांचा ऋषि अज्ञात आहे असे म्हणणे योग्य झाले असते. मनुष्य एका पार्श्वभूमीवरून अर्थ लावीत असतो; ती निराळी असली की, अर्थ निराळा होणे अपरिहार्य आहे.

असो एकंदरीत चरणव्यूहकार व भाष्यकार महीदास हे नितांत विश्वसनीय ग्रंथकार असे समजणे कठीण आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट राहिली. भागवताच्या आधारे भाष्यकार महीदास लिहितो : 'व्यासशिष्यो वैशंपायनो निगदाख्यं यजुर्वेदं पठित्वा ...... तच्च भागवते' वैशंपायनाने आपल्या शिष्याना निगद नावाचा यजुर्वेद शिकविला. हा निगदाख्य यजर्वेद कोठचा ? ऐतरेय ब्राह्मणाच्या प्रस्तावनेत निगद शब्दाचा अर्थ दिला आहे तो असा :

यद्धीतमविज्ञातं निगदेनैव शब्द्यते

आमच्या पुराणकारांचे व भाष्यकारांचे हे अज्ञान समजावयाचे काय ?

अनुक्रमणिका

लेखक : लाडिसलास तातारक्येवित्स अनुवादक वा. ल. कुलकर्णी

दोन हजार वर्षांतील काव्यशास्त्रविचार– (पूर्वार्ध)

[इंटरनॅशनल काउन्सिल फॉर फिलॉसफी ॲन्ड ह्यूमॅनिस्टिक स्टडीज या संस्थेमार्फत इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन, इटालियन आणि अरबी या सहा भाषातून ' डायोजिनिस ' नांवाचे एक त्रैमासिक गेली दहा वर्षे प्रसिद्ध होत आहे. श्री. रोजर केल्वा (Roger Caillois) हे या त्रैमासिकाचे पॅरिसहून संपादन करितात. मानवार्थी अभ्यसने (Humanistic Studies) आणि तत्त्वज्ञान या दोन्ही क्षेत्रात ' डायोजिनिस 'ने आतापर्यंत केलेले मूलग्राही कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ' डायोजिनिस 'चा ३८ वा अंक प्राचीन आणि आधुनिक सौंदर्यशास्त्रविषयक समस्यांच्या विचाराला वाहिलेला आहे. या अंकात लाडिसलास तातारक्येवित्स (Ladislas Tatarkiewicz) ह्या वॉरसॉ विद्यापीठातील तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांनी ' दोन हजार वर्षांतील काव्यशास्त्र ' नावाचा लेख लिहिला आहे. सदर लेखात इ. स. पूर्व तिसऱ्या शतकापासून तो इसवी सनाच्या सोळाव्या-सतराव्या शतकापर्यंत युरोपमध्ये झालेल्या काव्यशास्त्रविचाराचा आढावा घेतला आहे. हा आढावा संस्कृत आणि मराठी काव्यशास्त्राच्या अभ्यासकांना उपयुक्त वाटेल ह्या कल्पनेने ' डायोजिनिस'चे संपादक श्री. रोजर केल्वा यांच्या अनुमतीने अनुवादित केला आहे : युरोपीय काव्यशास्त्रावर लिहायला श्री. लाडिसलास तातारक्येवित्स हे किती अधिकारी आहेत हे पुढे दिलेल्या त्यांच्या अल्प चरित्ररेखेवरून वाचकांच्या ध्यानात येईलच. मूळ लेखात ज्या अनेक लेखकांची व तत्त्ववेत्त्यांची नांवे आली आहेत त्यापैकी ज्यांची माहिती उपलब्ध होऊ शकली त्यांची माहिती तळटीपांतूनच दिलेली आहे. ज्यांची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही त्यांच्यासंबंधी तळटीपेत प्रश्नचिन्ह टाकले आहे.]

— अनुवादक.

[लाडिसलास तातारक्येवित्स (Ladislas Tatarkiewicz) - जन्म वॉरसॉ येथे १८८६ मध्ये.

शिक्षण : वॉरसॉ, झूरिच, बर्लिन, मारबर्ग, पारिस. मारबर्ग विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी. वॉरसॉ विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक. सदस्य : पोलिश विज्ञान–सभा, क्रॅका (Cracow) साहित्य आणि विज्ञान सभा, आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान–सभा, आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान-सभाच्या फेडरशनचे कार्यकारी मंडळ; आंतरराष्ट्रीय ॲकाडेमिक युनियनचे प्रतिनिधि, कलेच्या इतिहाससंबंधीच्या आंतरराष्ट्रीय समितीचे सभासद, ' पोलिश रेव्ह्यू ऑफ फिलॉसफी ' ह्या नियतकालिकाचे डायरेक्टर : १९२५–१९५० ' इंटरनॅशनल रेव्ह्यू ऑफ फिलॉसफी ' ह्या नियतकालिकाच्या सल्लागार मंडळाचे सदस्य. प्रमुख ग्रंथ : History of Philosophy 1931, On the Good as an Absolute 1939; On Happiness 1947; Concentration and Reverie 1951 : (सौंदर्यशास्त्रीय प्रश्नांचा विचार), (History of Esthetics- १९५७; तत्त्वज्ञान, सौंदर्यशास्त्र, नीतिशास्त्र, आणि कलेचा इतिहास ह्यावरील अनेक प्रबंध. कलेतिहासविषयक प्रबंधात प्रामुख्याने १७ व्या १८ व्या शतकातील पोलंडमधील वास्तुकला आणि शिल्पकला आणि ब्राझिलमधील बरोक कला (Baroqueart) यांचा विचार. हे सर्व लेखन पोलिश भाषेत; शिवाय फ्रेंच, इंग्लिश, आणि जर्मन ह्या भाषात प्रसिद्ध झालेले इतर निबंध; अनेक परिषदांच्या इतिवृत्तात प्रसिद्ध झालेले लेखन. ' डायोजीनस ' मध्ये प्रसिद्ध झालेला अगदी अलीकडील म्हणजे ह्या मासिकाच्या २० व्या अंकातील (१९५७) पुढील निबंध : The History of philosophy and the Art of writing It.]

अनुक्रमणिका

दोन हजार वर्षांतील काव्यशास्त्रविचार

ॲरिस्टॉटलच्या 'काव्य-शास्त्रा'[1] शी कोणाचा परिचय नाही ? आधुनिक काव्यशास्त्र, कमीत कमी (Boileau) ब्वालोचे[2] Art Poetique ह्याच्याशी कोणाचा परिचय नाही ? परंतु तज्ज्ञांचा अपवाद वजा केला तर ॲरिस्टॉटलपासून (Pleiade) प्लर्द[3] किंवा (Boileau) ब्वालो पर्यन्तच्या सबंध मधल्या काळातील काव्यशास्त्रविषयक विचारांशी किती जणांचा परिचय आहे ? हा कालखंड जवळजवळ दोन हजार वर्षांचा आहे. शिवाय ह्या कालखंडाचा स्वतःचा असा काव्यशास्त्रविषयक विचार आहे. हा विचार अगदी काटेकोर तत्त्वप्रणालींनी बांधलेला आहे आणि अत्यंत तपशीलवार आहे. ह्या कालखंडाचे दोन मोठे कालविभाग पडतात : पहिला विभाग ग्रीक आणि रोमन युगांच्या अंतापर्यंत जातो, तर दुसरा सर्व मध्ययुग व्यापतो. ह्या दोन्ही कालखंडातील काव्यशास्त्र-विचार हा बराचसा समान होता; कारण दुसरा कालखंड हा वैचारिकदृष्ट्या प्रामुख्याने पहिल्या कालखंडावरच अवलंबून होता. परंतु असे असले तरी ह्या दोन्ही कालखंडातील काव्यशास्त्रविषयक विचारात काही फरक आहेत आणि म्हणूनच त्यांचा वेगवेगळा परामर्श घेणे आपणास प्राप्त आहे.

(१)

ॲरिस्टॉटलच्या मृत्यूनंतर फार झपाट्याने खिस्तपूर्व तिसऱ्या शतकातच काव्यशास्त्रविषयक विचाराला एक निश्चित रूप आले. त्याला हे निश्चित रूप देण्याचे कार्य थिओफ्रास्टर्स[4] आणि विशेषतः निओटॉलेमर्स[5] (Neoptolemus) यांनी केले. त्यांचे काव्यशास्त्र-विषयक लेखन आज अस्तित्वात नाही. त्यांच्यानंतर आलेल्या लेखकांच्या लेखनात केवळ त्यांचे अवशेष सापडतात. ह्या दोघांच्या लेखनाबरोबरच काव्य-शास्त्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ह्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे खिस्तोत्तर पहिल्या शतकात होऊन गेलेल्या पोसेयाडोनियस[6] (Poseidonius) ह्या स्टोइक तत्त्ववेत्याचे लेखनही आज उपलब्ध नाही. ह्याउलट खिस्तपूर्व पहिल्या शतकात होऊन गेलेले हॅलिकर्नसचा डायोनिसियस[7] आणि डिमिट्रियस[8] यांच्या काव्यशास्त्रविषयक विचारावरील भाष्ये आपणास उपलब्ध आहेत. ह्या भाष्यांबरोबरच नंतरच्या शतकात अत्यंत प्रसिद्धीला आलेले आणि आजही अनेकांच्या परिचयाचे असलेले दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यातील पहिला ऑन द

१. खिस्तपूर्व ३८४–३२२.

२. ब्वालो (१६३६–१७११) —फ्रेंच कवि आणि टीकाकार. फ्रान्समधील खालावलेल्या वाङ्मयाभिरुचीला याने इष्ट वळण लावले.

३. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेला काही फ्रेंच कवींचा संप्रदाय. ह्या कवींना प्राचीन कवींबद्दल आदर होता आणि ह्या प्राचीनांच्या मदतीने तत्कालीन फ्रेंच कवितेत सुधारणा घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. फ्रेंच कवितेत सदर संप्रदायातील कवींनी सुनीत रचना केली; व ह्याचा परिणाम सुनीत रचनेबद्दल इंग्लंडमध्ये उत्साह निर्माण होण्यात झाला.

४. खिस्तपूर्व (३७२/३६९–२८८/२८५) प्लेटो आणि ॲरिस्टॉटलचा शिष्य. ॲरिस्टॉटल आथेन्स मधून गेल्यानंतर त्याच्या प्रशाळेचा प्रमुख, प्रभावी शिक्षक. अनेक विषयांवर लेखन : वनस्पतिशास्त्र, तत्त्वज्ञान, भूगर्भशास्त्र, पदार्थविज्ञान, हवामानशास्त्र, वैद्यक इ. ॲरिस्टॉटलचा तर्कशास्त्र, वक्तृत्वकला, काव्यशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र आणि विज्ञान ह्या संबंधीचा तत्त्वविचार अधिक बळकट केला.

५. खिस्तपूर्व तिसरे शतक. ग्रीक कवि आणि टीकाकार. होरेसच्या Ars Poetica मधील मते सदर ग्रंथकाराच्या Poetics ह्या ग्रंथातील मतांवर मुख्यतः आधारलेली आहेत.

६. ग्रीक तत्त्वज्ञ, शास्त्रीय संशोधक आणि थोर इतिहासकार. ग्रेको-रोमन संस्कृतीचे व विचारसंपदेचे सार ह्यांच्या लेखनात आढळते.

७. व्याख्याता, इतिहासकार व शिक्षक (खिस्तपूर्व ३०–८). "On the Arrangement of Words", "On the Ancient Orators" इत्यादि ग्रंथांचा कर्ता.

८. "On style" ह्या ग्रीकमध्ये लिहिलेल्या अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथाचा अनामिक कर्ता.

सब्लाइम[९] ' हा ग्रंथ ग्रीक भाषेत लिहिलेला असून त्याचा लेखक कोण हे ठाऊक नाही. दुसरा ' आर्स पोइटिका ' (Ars poetica) हा लॅटिनमध्ये लिहिलेला असून तो खिस्तोत्तर पहिल्या शतकांतील आहे व त्याचा लेखक होरेस[१०] हा आहे. ह्या खेरीज गादाराचा (Gadara) फिलोडीमस[११] ह्या एपिक्युरियन गृहस्थाच्या ख्रिस्तोत्तर पहिल्या शतकातील ' ऑन पोएटिक वर्कस् ' ह्या ग्रंथाचे काही अधलेमधले भाग तेवढे आपणापर्यंत शिल्लक राहिले आहेत. हर्क्युलेनियमची[१२] जी जीर्ण हस्तलिखिताची गुंडाळी आहेत त्यात हे भाग जतन केलेले आहेत.

प्राचीन काळात जे काव्यशास्त्रविषयक लेखन झालेले असेल त्याचा हा केवळ अंशभाग होय हे खरे असले तरी ह्याला जर आपण सिसिरो,[१३] क्विंटिलियन[१४] किंवा हेर्मोजीनीस[१५] (Hermogenes) ह्याचे -हेटारिक्स, प्लूटार्क,[१६] सेक्सटस[१७] एपिरिकस, मॅक्झिमस ऑफ[१८] याचे चर्चात्मक निबंध, प्रूसाचा डिऑन (Dion) ह्याची प्रवचने आणि लूसियनचे[१९] निबंध ह्यात आढळणारा काव्यशास्त्रविषयक विचार याची जोड दिली तर आपणास ह्या काळातील काव्यशास्त्रविचार स्वच्छपणे डोळयापुढे येऊ शकतो.

काव्यशास्त्राची समस्या :

काव्याशास्त्रातील समस्यांचा विचार हा बव्हंशी एकाच प्रकारे करण्यात आला. त्यासाठी निओटॉलेमस (Neoptolemus) च्या पद्धतीचा अवलंब करण्यात आला. निओटॉलेमस हा काव्यशास्त्रविषयक विचाराचे तीन भाग पाडतो: पहिल्यात ' काव्या ' चा विचार येतो. दुसऱ्यात केवळ ' कविते 'चा विचार येतो आणि तिसऱ्यात ' कवी 'चा विचार येतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे पहिला विभाग काव्याचा सर्वसामान्यपणे विचार करितो; दुसरा काव्याचे जे विविध प्रकार (genres) त्याचा विचार करितो; आणि तिसरा कवीच्या व्यक्तित्वामुळे काव्यास अवतरणारे जे विशेष त्याचा विचार करू पाहतो. होरेसच्या ' आर्स पोओटिका ' (Ars Poetica) सारख्या

---

९. ह्या ग्रंथाच्या कर्त्याचे नाव लॅांजिनस (Longinus) असावे असा समज आहे. ह्या ग्रंथात ज्या प्रमाणे रीतिविचार आहे त्याचप्रमाणे कला आणि वाङ्मय यांची मूल्ये व त्यांचे मानदंड याचाही विचार आहे. प्राचीन ग्रीक साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्ति लक्षात घेण्याच्या दृष्टीने सदर ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

१०. कवि आणि टीकाकार. Ars Poetica ह्या ग्रंथात कलात्मक एकता, शैली, शब्दसंग्रह, छंद, कविताप्रकार, अभिनवता आणि अनुकरण, काव्याचा उचित शेवट, प्रतिभेला परिश्रमांची आवश्यकता इत्यादि अनेक प्रश्नांचा महत्त्वपूर्ण विचार आहे.

११. ग्रीक वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांचा शिक्षक. याने ग्रीक तत्त्वज्ञानाबद्दल लोकांच्या मनात आवड निर्माण केली. शुद्ध कलावादी भूमिका. मानसशास्त्र, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र, वक्तृत्वकला ह्यावरील विचार.

१२. हे शहर वेस्युवियस पर्वताच्या उतारावर वसवलेले होते. इ. स. ७९ मधील वेस्युवियसच्या स्फोटाने हे शहर नष्ट झाले. १८ व्या शतकात त्याच्या उत्खननाला प्रारंभ झाला.

१३. (खिस्तपूर्व १०६-४३) रोमन वक्ता, कवि, आणि शैलीकार. वक्तृत्वकलेला वाङ्मयाभ्यासाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन. वक्तृत्वकला आणि तत्त्वज्ञान ह्यावर लेखन.

१४. (इ. स. ३५ ? - १०० ?) रोमन. वक्तृत्वकलेचा शिक्षक आणि टीकाकार. त्याचा वक्तृत्वकलेवरील " Institutio Oratoria " हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे.

१५. (जन्म इ. स. १५०) प्रभावी वक्ता आणि तत्त्वचिंतक. वक्तृत्वकलेवरील ग्रंथांचा लेखक.

१६. (इ. स. ४६-१२० नंतर) नीतिशास्त्र, इतिहास, काव्यशास्त्र ह्यावर अनेक ग्रंथ.

१७. (इसवी सनाचे दुसरे शतक) आयुर्विद्याविशारद, संशयवादी तत्त्वचिंतक.

१८. (इ. स. १२५-१८५) सोफिस्ट तत्त्वचिंतक, फिरता व्याख्याता, ग्रीक वाङ्मयाचा अभ्यासक.

१९. (जन्म, इ. स. १२०-१८० नंतर) ८० संभाषणात्मक निबंध, व्याख्याता आणि तत्त्वचिंतक.

वर वर पाहता स्वैर भासणाऱ्या लेखनामध्येही भाषा-कोविदांना हीच विचारव्यवस्था आढळते.

'क्लासिकल' ग्रीसमध्ये ज्याप्रमाणे केवळ सयमक काव्याचा विचार केला जात होता त्याप्रमाणे हेलिनिस्टिक (Hellenistic) काळामध्ये केवळ वाङ्मयीन गद्याचा विचार होत होता. दुसरे म्हणजे ह्या दोन प्रकारच्या लेखनातील (geures) प्रकृतिभेद नीटसा स्पष्ट झालेला नव्हता. अगदी क्लासिकल ग्रीसमध्येही जॉर्जियाझने [२०] (Gorgias) काव्याची व्याख्या छंदोबद्ध भाषा अशीच केली आहे तर ॲरिस्टॉटलने ती अनुकरणात्मक भाषा (imitative language) अशी केली आहे, म्हणजे एक जण व्याख्या करिताना काव्याच्या बाह्य, गोचर रूपाचा (form) विचार करितो आहे तर दुसरा त्याच्या अंतरंगाचा किंवा आशयाचा (Content) विचार करीत आहे.

काव्याचे केवळ गोचर रूप आणि त्याचा केवळ आशय लक्षात घेऊ पाहणाऱ्या ह्या दोन भिन्न दृष्टिकोणांचा समन्वय घालण्याचा प्रयत्न पोसेडोनियसने (Poseidonius) केलेल्या व्याख्येमध्ये दिसून येतो. ही काव्याची व्याख्या काव्य ही एक तालबद्ध (measured) आणि लयबद्ध भाषा आहे हे ओळखते आणि त्याच्या गोचर रूपाच्या परीक्षेचा पाया मजबूत करिते. परंतु ही व्याख्या येथेच थांबत नाही, "एखादी कविता जेव्हा अत्यंत अर्थपूर्ण असते. आणि मानवी व दैवी समस्या प्रकट करिते तेव्हाच ती काव्यात्म ठरते" असे ही व्याख्या पुढे जाऊन म्हणते. 'काव्य' आणि 'कविता' ह्या दोहोमध्ये म्हणूनच ही व्याख्या फरक करिताना दिसते. कवितेचे बाह्य रूप हे केवळ ती गद्यापासून वेगळी कशी ते सांगत असते; परंतु 'कविता' ही 'काव्य' ह्या अभिधानाने संबोधिली जावी अशी इच्छा असेल तर तिच्यात आणखी काही असणे आवश्यक असते. आणि हे आणखी काही म्हणजे तिचा महनीय आशय. तेव्हा काव्य म्हटले की त्याला दोन अटी पाळाव्या लागतात. ते तालबद्ध पद्य असले पाहिजे आणि शिवाय त्याला महनीय आशय पाहिजे. काव्य ही शब्द-कला आहे. परंतु प्राचीन काळात इतिहास, तत्त्वज्ञान आणि वक्तृत्व ह्यातील प्रत्येकाचे म्हणणे आपण शब्द-कला आहोत असेच होते. काव्यशास्त्रापुढे पहिला प्रश्न होता तो हाच की ह्या सर्वांना काव्यापासून वेगळे काढायचे कसे ?

काव्य आणि इतिहास :

ह्या प्राचीनांनी प्रथम जी गोष्ट स्वयंसिद्ध आहे असे मानले ती ही की सर्व मानवी कृतींचे (activity) ध्येय सत्य हेच असले पाहिजे. मग ती कृति काव्य असो वा इतिहास असो. काही काळानंतर ह्या ध्येयाच्या संदर्भात इतिहास आणि काव्य ह्यांच्यात एक नेमका फरक आहे हे त्यांच्या लक्षात आले. खिस्तपूर्व पहिल्या शतकातील एका सूत्रात हा फरक नमूद केलेला आढळतो : ह्या सूत्रात (खरा) इतिहास, खोटा इतिहास आणि दंतकथा किंवा आख्यायिका (fable) असे तीन प्रकार मानून ह्यात फरक करण्यात आला आहे. लॅटिनमध्ये असलेले हे सूत्र असे : historia, argumentum आणि fabula.

काव्याने ह्यातील दोन क्षेत्रे व्यापिली आहेत. ती क्षेत्रे म्हणजे दंतकथा आणि 'खोटा' इतिहास यांची. एकाच्या बाबतीत त्याचा आशय किंवा तो जे व्यक्त करितो ते असंभाव्य तर दुसऱ्याच्या बाबतीत ते शक्य, परंतु दोन्हीकडे ते काल्पनिक (ficta res). तेव्हा इतिहास आणि काव्य ह्यांच्यातील प्रकृतिभेद थोडक्यात असा म्हणता येईल : इतिहास आणि काव्य हे प्रकृतीने वेगवेगळे आहेत : एकाचा संबंध प्रत्यक्ष वास्तवाशी तर दुसऱ्याचा कल्पिताशी.

इतिहास तुम्हाला सत्य देतो तर काव्य हे तुमच्या पदरात सत्य टाकू शकत नसल्यामुळे केवळ आनंद देते. सिसिरो आपल्या विवेचनाचा शेवट करिताना म्हणतो : 'इतिहासाचा संबंध केवळ सत्याशी आणि काव्याचा आनंदाशी हे जर खरे तर काव्याचे नियम वेगळे आणि इतिहासाचे वेगळे.'

---

२०. (खिस्तपूर्व ४८३-३७६) वादपटु आणि वक्ता. काव्याची बरोबरी करील असे गद्य लिहिले पाहिजे ह्या मताचा पुरस्कर्ता. काव्यात्म भाषा, रूपके, भाषेचे नादमाधुर्य इत्यादि प्रश्नांचा महत्त्वपूर्ण विचार. काव्यात्म गद्याचा पुरस्कर्ता ह्या नात्याने वक्तृत्वकलेच्या शिक्षणात त्याने शैलीच्या अध्यापनाला फार महत्त्व दिले.

अनुक्रमणिका

काव्य आणि तत्त्वज्ञान

काव्याचे इतिहासाशी कोणत्या प्रकारचे नाते आहे हे स्पष्ट करण्यापेक्षा त्याचे तत्त्वज्ञानाशी कोणत्या प्रकारचे नाते आहे हे स्पष्ट करणे प्राचीनांना फारच जड गेले; आणि ' तत्त्वज्ञान ' ह्या शब्दामध्ये ते इतिहासाचा अपवाद करून– कारण इतिहासाला ते केवळ हकीगत (chronicle) समजत होते, शास्त्र समजायला तयार नव्हते– सर्वच शास्त्रांचा समावेश करीत असल्यामुळे त्यांना काव्याच तत्त्वज्ञानाशी असणारे नाते स्पष्ट करिताना, खरे म्हणजे काव्याचे सवच प्रकारच्या शास्त्रांशी असणारे नाते स्पष्ट करावयाचे होते. अगदी प्रारंभी काव्य आणि शास्त्र यांचे प्रयोजन एकच आहे असे मानले जात होते. हे प्रयोजन म्हणजे देवांसंबंधीचे आणि मानवासंबंधीचे ज्ञान देणे. जोपर्यंत ह्या प्राचीनांना स्वतःचे तत्त्वज्ञान नव्हते तोपर्यंत भोवतालच्या जगासंबंधीचे आणि जीवनासंबंधीचे ज्ञान ते काव्यामध्ये, विशेषतः होमरमध्ये, शोधीत. ह्यामधून काव्य हा केवळ कल्पनेचा खेळ (fiction) नसून ते ज्ञानाचे एक साधन आहे हा समज निर्माण झाला. भोवतालच्या जगाचे ज्ञान आपल्याला आहे आणि आपणच ते स्पष्ट करू शकतो हा काव्याचा दावा. त्या विरुद्ध अगदी प्रारंभापासून तत्त्वज्ञानाला झगडा द्यावा लागला. ह्यातूनच काव्य आणि तत्त्वज्ञान ह्यांच्यातील ते अनपेक्षित मतभेद जन्माला आले की ज्या मतभेदाचे अनेक पडसाद आपणास प्लेटोमध्ये[२१] ऐकू यतात. हेलिनिस्टक काळात काव्य आणि तत्त्वज्ञान ह्यांच्यातील मतभेदाची ही तीव्रता कमी झाली.

आता दोन परस्परविरोधी मते प्रतिपादिली जाऊ लागली. एकीकडे एपिक्युरियन्स काव्य हे जगाचे चित्र शास्त्रापेक्षा वेगळ्याच प्रकारे सादर करिते म्हणून काव्याचा धिक्कार करू लागले. स्केप्टिक्स (संशयवादी) तर एक पाऊल पुढे जाऊन असे प्रतिपादू लागले की काव्यामध्ये जर काही तत्त्वज्ञान असेल तर चुकीचे टाकाऊ (bad) आहे ह्या उलट पोसेयाडोनियस हा स्टोइक तत्त्ववेता काव्य हे तत्त्वज्ञानाप्रमाणेच दैवी आणि मानुषी समस्यांचे प्रकटीकरण करिते, तेव्हा त्याची योग्यता तत्त्वज्ञानाइतकीच आहे असे म्हणू लागला. हे त्याचे मत सिसिरो, सेनेका,[२२] स्ट्राबो,[२३] प्लूटार्क, टायरचा मॅक्झिमस ह्या अनेकांनी उचलले. काव्य आणि तत्त्वज्ञान ह्या उभयतामध्ये दोन अगदी वेगवेगळ्या प्रकारचे परंतु अंतिम दृष्टया ज्याचा संपूर्णपणे मेळ घालता येतो असे ज्ञान व्यक्त करण्याची शक्ति आहे हे त्यांच्या लक्षात आले. काव्य हे छंदोबद्ध पद्यातून अवतरते हे खरे असले तरी स्ट्राबोच्या मताने तो महत्वाचा मुद्दा ठरत नाही. त्याच्या मते ते तालबद्ध असते ते लोकांचे लक्ष स्वतःकडे वेधून घेण्यासाठी, लोकांना आकर्षून घेण्यासाठी आणि त्याचे एवढे एक वेगळेपणं सोडले तर काव्य आणि तत्त्वज्ञान ही एकच होत.

प्राचीनांच्या काव्यविषयक समजुतीत दोन अगदी वेगवेगळे आणि त्याचबरोबर परस्परविरोधी असे मतप्रवाह दिसतात. काव्य हे कल्पितांची (fictions) निर्मिति करिते हा एक आणि त्याला सत्य हे ज्ञात असते. हा दुसरा. केव्हा पहिल्या मतप्रणालीचा तर केव्हा दुसऱ्या मतप्रणालीचा पगडा तत्कालीन काव्यविचारावर दिसून येतो. काव्याचा प्रांत निराळा, इतिहासाचा निराळा, असे म्हणताना काव्याचा कल्पिताशी असलेला संबंध विशेषत्वाने लक्षात घेतला जात होता, तर त्याचा तत्त्वज्ञानाबरोबर विचार करिताना त्यातून व्यक्त होणारे सत्य लक्षात घेतले जात होते.

काव्य आणि वक्तृत्व–कला (rhetoric)

काव्य आणि वक्तृत्व ह्याच्यातील नाते लक्षात घेताना प्राचीनांना बराच त्रास झाला. त्यांच्या हे लक्षात आले होते की काव्य आणि वक्तृत्व ह्यांचे अगदी निकटचे नाते असले तरी ह्या गोष्टी एकच नव्हत; पण त्यांचा वेगळेपणा कशात आहे ?

---

२१. खिस्तपूर्व ४२७ ते ३४८.

२२. (जन्म : खिस्तपूर्व ५५– मृत्यु खिस्तोत्तर ३७ ते ४७ च्या दरम्यान) वक्तृत्वकलेवर महत्त्वपूर्ण लेखन.

२३. (खिस्तपूर्व ६४-६३– खिस्तोत्तर निदान २१ पर्यंत). ग्रीक इतिहासकार आणि भूगोलशास्त्रज्ञ शेयरचा अभिमानी.

(अ) आज काव्य हे 'लिहिले' जाते, वक्तृत्व हे 'बोलले' जाते; त्यामुळे दोहोतील फरक विशेष जाणवतो. प्राचीन काळी काव्य हे कित्येक शतके केवळ मौखिक राहिले, त्याचे काव्यगायकांकडून (rhapsodes) पठन किंवा कथन होत असे, नाहीतर नटाकडून ते साभिनय म्हटले जात असे. ह्या उलट मोठमोठ्या वक्त्यांची भाषणे ही केवळ लोकांकडून ऐकली जात नसत, तर प्रसिद्ध केली जाऊन वाचली जात असत.

(ब) काव्य आणि वक्तृत्व ह्यातील भेद स्पष्ट करण्यासाठी ग्रीकांनी आणखी एक कसोटी शोधून काढली. काव्य हे लोकाना आनंद देण्यासाठी असून वक्तृत्व हे त्याना मार्गदर्शन करण्यासाठी (Flectere) असते ही ती कसोटी होय. परंतु ह्या प्राचीनांचे वक्तृत्वही आपला हेतु लोकाना आनंद देणे हा असून आपल्यालाही कलेचा दर्जा मिळाला पाहिजे असा हक्क सांगू लागले तर त्यांचे काव्य, विशेषतः नाट्यकाव्य, आपली निर्मिति केवळ लोकांना आनंद द्यावा एवढ्यासाठी नसून त्यांच्या मनातील काही समजुती दूर करण्यासाठी, काही गोष्टी त्याना नीट समजावून सांगण्यासाठी, आणि काहींची त्यांच्या मनात नवी बीजे पेरण्यासाठी आहे अशी आकांक्षा बाळगू लागले.

(क) काव्य आणि वक्तृत्व-कला ह्यांच्यातील तिसरा भेद असा: काव्याचा संबंध काल्पनिकाशी तर वक्तृत्वाचा संबंध प्रत्यक्षपणे समाजातील खऱ्याखुऱ्या समस्यांशी. तेव्हा ज्या कारणामुळे काव्य हे इतिहासापासून वेगळे पडते त्याच कारणास्तव ते वक्तृत्वापासूनही वेगळे उमटून पडते. हे मत स्वीकारायला रोमन लोक इतकेसे तयार नव्हते. त्याचे कारण असे की काव्य ज्या प्रकारच्या कल्पिताचा आश्रय घेते तसल्याच प्रकारच्या, कल्पित विषयावर बोलण्याची तयारी त्यांच्या वक्तृत्वशालातून करून घेण्यात येत असे आणि अशा रीतीने तयार झालेले हे त्यांचे वक्ते प्रत्यक्ष लोकासमोर भाषणे करण्याऐवजी असल्या तयार केलेल्या भाषणांच्या केवळ संथा घेण्यापलीकडे पुष्कळदा दुसरे काहीच करीत नसत.

(ड) काव्य आणि वक्तृत्वकला ह्यातील चौथा मूलभूत फरक लक्षात आला तो असा: काव्य ही एक तालबद्ध पद्यात अवतरणारी कृति आहे तर वक्तृत्व ही एक गद्यातून व्यक्त होणारी कृति आहे. वाङ्मयीन गद्य आणि वाङ्मयीन पद्य ह्यातील भेद स्पष्ट करीत असतानाच वाङ्मयीन गद्यामध्ये वक्तृत्वाचा समावेश करण्यामागे एक ऐतिहासिक कारण होते. हे कारण म्हणजे असे की जॉर्जिआस (Gorgias) पासून आयसोक्रेटिस[२४] (Isocrates) पर्यंतच्या दीर्घ काळात चर्चा, वादविवाद, प्रतिपादन हेच केवळ आणि हेच पहिले गद्याच्या द्वारा करण्यात येणाऱ्या कलाविष्कारांच्या प्रयत्नाचे माध्यम होते. स्वाभाविकच लवकरच वक्तृत्वकलेला सर्व प्रकारच्या गद्याच्या तत्त्वमीमांसेचे (theory) स्वरूप आले, आणि काव्य आणि वक्तृत्वकला ह्या दोन वाक्प्रचारातील (geures) फरक अगदी स्पष्ट झाला. काव्यशास्त्र हे पद्यरूप धारण करणाऱ्या कृतींचे सौंदर्यशास्त्र (esthetic) ठरले तर वक्तृत्वकलाशास्त्र हे गद्यरूपाने अवतरणाऱ्या कृतीचे सौंदर्यशास्त्र ठरले.

काव्य आणि सत्य

प्राचीन काळातील काव्यासंबंधाच्या सर्वसामान्य समस्या पुढील तीन प्रश्नात समाविष्ट झाल्या होत्या: सत्य, शिव (good) आणि सौंदर्य यांच्याशी असणारे काव्याचे नाते कोणत्या प्रकारचे असते ?

अतिप्राचीन काळात काव्य आणि सत्य याच्या परस्पर-संबंधाविषयींच्या प्रश्नावर दोन परस्परविरोधी मते होती: एक मत काव्याचा गाभाच असत्य आहे असे म्हणून त्याचा धिक्कार करीत होते, तर ह्या उलट दुसरे काव्याचा गाभा हा विशेषत्वानेच सत्य आहे, फक्त हे सत्य लाक्षणिक आहे, असे प्रतिपादित होते. चांगले काव्य हे सत्याशिवाय अशक्य आहे ह्यावर ह्या दोन्ही पक्षाचे एकमत होते.

हेलिनिस्टिक युगात मात्र ह्यात एक डोळ्यात भरण्याजोगा बदल घडून आला. हळूहळू सत्य हे केवळ काव्याला पुरेसे नाही हा समज बळावू लागला. कल्पिताचा उपयोग करण्याचा कवीला हक्क आहे असे

२४. (खिस्तपूर्व ४३६–३३८) सॉक्रेटिसचा मित्र, ग्रीक वक्ता. वक्तृत्वकलेचा शिक्षक. शिक्षणशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ.

म्हटले जाऊ लागले. प्लूटार्कने जीवनापेक्षा काव्य वेगळे कसे ह्याकडे लक्ष वेधले. काव्य आणि इतिहास ह्यात विरोध आहे, कारण स्वातंत्र्य आणि सत्य ह्यात विरोध आहे, असे मत ल्यूसियनने प्रतिपादले. इरॅटॉस्थेनिसची[२५] (Eratosthenis) मजल तर येथपर्यंत गेली की माणसांच्या मनावर संस्कार करण्याचे आपले कार्य साधण्यासाठी कवीला वाटेल त्या गोष्टींचा उपयोग करण्याची मुभा आहे असे तो प्रतिपादू लागला.

त्याच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरणारी गोष्ट म्हणजे जी सत्याची शिकवणूक तिला जर स्वातंत्र्य पारखे झालेले असेल तर त्या स्वातंत्र्याचा त्याग करायलाही प्राचीनांनी प्रारंभी अनमान केला नाही. नंतरच्या काळात मात्र काव्यांतर्गत सत्याने त्यांना चकविले. त्याचाही त्याग करायला ते एका अटीवर तयार होते. ती अट म्हणजे अशी की तेवढ्याने त्या सत्याचे स्वातंत्र्य अबाधित राहावे. हळूहळू काव्याचा आशय व त्याचे गोचर रूप (form) ह्यात आज जो फरक केला जातो तशा प्रकारचा मूलभूत फरक करण्यापर्यंन्त त्याच्या विचाराने मजल मारली. काव्याच्या संदर्भात जेव्हा सत्य आणि ज्ञान ह्यांच्याविषयी बोलले जाई तेव्हा त्याचा संबंध त्याच्या आशयाशी असे गृहीत धरले जाई. परंतु काव्याचे प्रमुख अंग म्हणजे त्याचे गोचर रूप हेच असून त्याचा आशय हे नव्हे हा समज मात्र ह्याच वेळी दृढमूल होऊ लागला. इरॅटोस्थेनिस म्हणतो, ' कविताची परीक्षा त्यात कोणत्या प्रकारचे विचार आहेत ह्यावरून करिता कामा नये किंवा त्यांच्याकडून आपण काटेकोर ज्ञानाची अपेक्षाही करिता कामा नये.' आणि फिलॉडेमसच्या लेखनात आपणास पुढील विचार पहायला मिळतो, " एखाद्या कवितेत सुंदर विचार आहेत किंवा खूप शहाणपणा आहे हे काही तिच्या सद्गुणांचे लक्षण नव्हे. '

काव्य आणि शिव (The good)

हेलिनिस्टिक युगात काव्य आणि शिवाची कल्पना (The idea of the Good) ह्यांच्यातील परस्पर संबंधाच्या विचारात अशीच उत्क्रांति घडून आली. अगदी प्रारंभी ग्रीकांच्या काव्यविषयक समजुतीवर नीतिवादाचा फार मोठा पगडा होता. काव्याचा राज्याला आणि सद्गुणांच्या अभिवृद्धीला उपयोग होत असेल, त्याच्याकडून मनाचे उन्नयन होत असेल, त्यांना चांगली शिकवणूक लाभत असेल, ती संस्कारित होत असतील तरच त्याच्या अस्तित्वाला अर्थ आहे असे प्रतिपादिले जात होते. ह्या विचाराची पराकोटि प्लेटोने गाठली : काव्य हे नैतिक दृष्ट्या अपायकारक आहे असे त्याचे मत होते. काव्याच्या अपायकारकत्वाबद्दल प्लेटोच्या मागून आलेल्यांचीही प्लेटोइतकीच खात्री होती. परंतु त्याबरोबर काव्याने नैतिक दृष्ट्या उपकारक असायलाच हवे काय ह्याबद्दलही त्यांच्या मनात हळूहळू शंका येत होती. एवढे खरे की मॉर्कस ऑरेलियसची[२६] इच्छा काव्याने जीवनशिक्षणाचे कार्य करावे हीच होती आणि अथेनियस[२७] (Athenaeus) काव्य हे अशिव नाहीसे करण्याचे व त्याला प्रतिबंध घालण्याचे साधन बनायला हवे असे मानीत होता, परंतु ह्या विचारांना विरोधी असे विचारही त्याच वेळी व्यक्त केले जात होते. फिलोडेमसच्या मते लोकांचे मनोरंजन करणे आणि त्याना शिक्षण देणे ही दोन कामे एकाच वेळी कोणालाही करिता येणे शक्य नसते. ' सद्गुणांनी लोकांचे मनोरंजन होत नसते. असे तो म्हणे.

काव्याने काय करावे ? त्याने शिकवावे की रिझवावे ? हा दीर्घ काळपर्यंन्त चाललेला वाद पुष्कळदा

२५. (खिस्तपूर्व २७५–१९४) अष्टपैलू विद्वान " On Ancient comedy " हा महत्त्वाचा टीकाग्रंथ. इतिहास, गणितशास्त्र, खगोलविज्ञान, भूगोलशास्त्र, तत्त्वज्ञान ह्यावर लेखन. कवि. ' हर्मिस ' ह्या छोटेखानी महाकाव्याचा कर्ता.

२६. (खिस्तोत्तर १२०–१८०). रोमन बादशहा आणि तत्त्ववेत्ता. वक्तृत्वकलेच्या अभ्यासाकडून वयाच्या उत्तरार्धात स्टोइक तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे वळला.

२७. क्लॉडियसच्या कारकीर्दीत (खिस्तोत्तर ४१–५४) ह्याने रोममध्ये भिषक्वर्य म्हणून नाव मिळविले. भिषकाचा अन्तर्भाव सर्वसामान्य शिक्षणात भरण्यात यावा असे त्याचे मत होते ह्याची शिक्षणशास्त्रावरील मते महत्त्वाची समजली जातात.

अनुक्रमणिका

तडजोडीने मिटवला जात असे. सिसिरो काव्याकडून अपेक्षा करित होता ती दोन्ही गोष्टींची : 'आवश्यक उपयुक्तता' (necessary utality) आणि 'स्वैर आनंद' (face joys) ह्या उभयतांची. काव्याने 'शिकवावे तसेच रिझवावेही' (docere and delectare) असेच होरेसने म्हटले आहे. काव्य हे एकाच वेळी आपणास उपयुक्त ठरले पाहिजे आणि त्याने आपणास आनंदही दिला पाहिजे (utile and dulce) अशीही आणखी एक तडजोड त्याने सुचविली आहे.

शिकवणे आणि रिझवणे ह्यात मूलभूत स्वरूपाचा फरक आहे हे थिओफ्रास्टसने (theofrastus) ह्या पूर्वीच स्पष्ट केले होते. त्याच्या मते एकंदर वाङ्मयाचे दोन प्रकार पडतात : Logos pros pragma आणि Logos pros tous akroatas : दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे विषयाशी संबद्ध असणारे वाङ्मय आणि श्रोत्याशी संबद्ध असणारे वाङ्मय. ह्या दोन्ही प्रकारच्या वाङ्मयाला त्याचे त्याचे स्थान आहे ह्याची जाणीव हेलिनिस्टिक युगात होती. हे जे दुसऱ्या प्रकारचे म्हणजे श्रोत्याशी संबद्ध असणारे वाङ्मय, त्याची परीक्षा लोकांच्या नैतिकतेवर ते कोणत्या प्रकारचा परिणाम करीत आहे हे लक्षात घेऊन केली पाहिजे आणि हा परिणाम अपायकारक आहे असे सिद्ध झाल्यास त्याचा निषेध केला पाहिजे असे म्हटले जात होते. परंतु त्याबरोबर ज्याला 'विषयाशी संबद्ध' ह्या शब्दांनी संबोधिले गेले त्या पहिल्या प्रकारच्या वाङ्मयालाही त्याचे स्वतःचे असे स्थान आहे हे मान्य केले जात होते; आणि हळू हळू काव्यात ह्याच गोष्टीला सर्वांत अधिक महत्त्व असते हा समज दृढ होत होता.

काव्य आणि सौंदर्य

काव्य आणि सत्य व काव्य आणि शिव ह्यांच्यातील परस्परसंबंधाविषयीच्या विचारातील उत्क्रांतीच्या नेमकी उलट उत्क्रांति हेलिनिस्टिक युगात काव्य आणि सौंदर्य ह्यांच्या परस्पर-संबंधाविषयीच्या विचारात दिसून येते. क्लासिकल युगातही काव्याचा संबंध सत्य आणि शिव ह्यांच्याशीच जोडला जात होता, तो सौंदर्याशी जोडला जात नव्हता. हेलिनिस्टिक युगात केवळ सत्य आणि केवळ शिव ह्यांचे काव्यातील स्थान कमी महत्त्वाचे गणले जाऊ लागले आणि सौंदर्याला अधिक महत्त्वाचे स्थान देण्याकडे विचारवंतांची प्रवृत्ति दिसून आली.

हेलिनिस्टिक युगातील काव्यशास्त्रविषयक विचारात नैसर्गिक सौंदर्य आणि कलेने निर्माण केलेले सौंदर्य ह्यात भेद केलेला आढळतो आणि काव्यामध्ये ज्या सौंदर्याला महत्त्व प्राप्त होते ते सौंदर्य ह्या दुसऱ्या प्रकारचे असते असा विचार मांडलेला आढळतो. आपल्या ह्या मताच्या पुष्ट्यर्थ सदर विचारवंत साक्ष काढतात ती जात्याच असुंदर असलेल्या वस्तूंच्या काव्यात आलेल्या वर्णनांची. ही वर्णने जी अनेकदा सुंदर भासतात ती ह्यामुळेच असे ते म्हणतात. काव्य हे सौंदर्याच्या साहाय्याने अनुकृति साधीत असते, ते नेहमी सौंदर्याचीच अनुकृति साधीत असते असे नव्हे. काव्यात महत्त्व असते ते, ते काय व्यक्त करिते ह्याला नव्हे, ते ते कसे व्यक्त करिते ह्याला.

दुसरे म्हणजे ह्या प्राचीनांनी सर्वांना सहजगम्य असे सर्वसामान्य (general) सौंदर्य आणि व्यक्तिपरत्वे, स्थलकालपरत्वे बदलू शकणारे, व्यक्तिगत (individual) सौंदर्य ह्यात भेद कल्पिला. ह्या व्यक्तिगत सौंदर्याला ग्रीकांनी prepon म्हटले तर रोमन लोकानी decorum म्हटले. हेलिनिस्टिक युगात व्यक्तिगत सौंदर्याला, कवितेतील decorum ला, वाढते महत्त्व दिले गेले. कविता सुंदर व्हावयाची असल्यास, हर्मोजीनिसच्या[२८] (Hermogenes) शब्दात ती औचित्यपूर्ण हवी, तिच्यातील सर्वच निवड योग्य हवी. क्विंटिलियनने म्हटले (Quintilian) आहे : Omnibus debetur suum decor प्रत्येकाला (आशयाला) त्याची सुयोग्य अभिव्यक्ति असतेच. त्याचे उचित गोचर रूप असतेच. (everything has

२८. मार्कस् ऑरेलियसच्या काळात (इ. स. १६१–१८०) होऊन गेलेला ग्रीक वक्तृत्वकला विशारद. त्याने लिहिलेल्या अनेक प्रबंधापैकी 'Art of speaking' हा प्रबंध विशेष प्रसिद्ध. ह्याने लिहिलेले प्रबंध त्याच्या काळात वक्तृत्व कलेवरील पाठ्यपुस्तके म्हणून प्रसिद्ध.

its apposite form) आणि हॅलिकॅर्नासच्या डायोनिसियसने म्हटले आहे, " भाषेत मोहकता आणि सौंदर्य येते ते चार महत्त्वाच्या गोष्टीतून : स्वरमेळ (melody), ताल, बदल (variations) आणि विषयाशी संवादित्व. " प्लूटार्कचे म्हणणे असे की एखादी गोष्ट सुंदरपणे व्यक्त करावयाची म्हणजे ती योग्यपणे व्यक्त करावयाची, तेव्हा जात्याच सुंदर अशा गोष्टींची अभिव्यक्ति सौंदर्याच्या मदतीने झाली पाहिजे तर असुंदराची अभिव्यक्ति असुंदराच्या मदतीने झाली पाहिजे.

काव्याचे सौंदर्य हे उघड उघडपणे त्यातील सुव्यवस्थेत, सुसंवादात, तालबद्धतेत आहे; हीच प्राचीन विचाराची परंपरा आहे. परंतु हेलेनिझमने ह्याला भव्यता, उदात्तता, कारुण्याची जाणीव, यांची जोड दिली. आणि श्रेष्ठ दर्जाची अभिरुचि (elegance) व बहुविधत्व ह्यांचा त्यात अन्तर्भाव केला. फिलॉडेमस नावाच्या एपिक्युरियनतत्त्वज्ञाने काव्यात्म अभिव्यक्तीचे विशेष म्हणून पुढील गुण नमूद केले आहेत : सकारणता, किंवा न्याय्यता (evidence) भरीवपणा, अल्पाक्षरत्व, काटेकोरपणा, प्रसाद किंवा नितळपणा (clarity) आणि तालबद्धता. बॅबिलोनचा डायोजीनस[२९] ह्या स्टोइक तत्त्ववेत्त्याने] कलल्या यादीत जवळ जवळ ह्याच परंतु पाच गुणविशेषांचा उल्लेख आहे. ते गुणविशेष असे : भाषिक निर्दोषत्व, नितळपणा, अल्पाक्षरत्व, तालबद्धता आणि नेमकी व निर्दोष रचना. बहुविधत्व हे आम्हास आनंददायक वाटते, (varietas delectat) हा विचार हेलिनिस्टिक युगातील लेखक वरचेवर बोलून दाखविताना आढळतात. जे अगदी साधे असते, सरळ असते (simple), त्याने कल्पनाशक्तीला चालना मिळत नाही आणि त्याने भावनाही हलविल्या जात नाहीत, असे प्लूटार्क म्हणतो. वाङ्मयात अवतरणाऱ्या दोन गुणविशेषात त्याचे श्रेष्ठ सामर्थ्य वसत असते असे हेलिनिस्टिक युगातील लेखकाना वाटत होते : हे दोन गुणविशेष म्हणजे enargia आणि evidentia,त्याची सकारणता (अर्थपूर्णता), आणि अनेकविध रूपे घेण्याची त्याच्या ठिकाणी असणारी शक्ति. (Plasticity).

प्राचीन काव्यशास्त्रविचारातून कितीतरी प्रश्न वेळोवेळी प्रगटले. काव्य हे अनुकरण की कल्पनाशक्तीचे कार्य ? त्याच्या मुळाशी शहाणपण की स्फूर्ति ? अन्तःस्फूर्ति की नियमांचे पालन ? भव्योदात्त की मोहक ? कवीच्या ठिकाणी आवश्यक ठरणारे सर्वात मोलाचे धर्म कोणते ?

अनुकरण की कल्पनाशक्तीचे कार्य ?

कवीसंबंधीच्या आणि एकंदर कलावंतासंबंधीच्या समजुतीमध्ये हेलिनिस्टिक युगात एकाएकी एक फार महत्त्वाचा बदल घडून आला. अतिप्राचीन काळात कवि आणि कलावंत हा केवळ अनुकरण साधतो अशी समजूत होती, हेलिनिस्टिक युगात तो निर्माता आहे आणि ज्या वास्तवाचे तो अनुकरण करितो त्या वास्तवापेक्षाही तो स्वतःच्या कल्पनाशक्तीवर अधिक अवलंबून असतो हे लक्षात आले. क्लासिकल युगातील ग्रीकांना कल्पनाशक्तीच्या अस्तित्वाचीच जाणीव नव्हती. परंतु हेलिनिस्टिक युगामध्ये काव्याच्या संदर्भातील तो एक निर्णायक घटक आहे ह्याची त्याना जाणीव झाली. ह्या जाणिवेपोटीच ते अनुकृतीच्या शेजारी कल्पनाशक्तीची स्थापना करून त्यांचा एकत्र विचार करू लागले. फिलॉस्ट्रॅटसने[३] म्हटले आहे, " अनुकृति (mimesis) केवळ जे दिसते ते व्यक्त करिते, कल्पना (phantasy) ह्या बरोबरच जे तिने पाहिलेले असणे शक्य नसते तेहि व्यक्त करिते." अंध काव्यगायकांची तेव्हा प्रथाच होती. ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये ह्यापेक्षा कल्पनाशक्तीच्या ठिकाणी केवढे प्रचंड सामर्थ्य वसत असते ह्याची साक्ष म्हणजे होमर ह्या महाकवीचे अंधत्व होय असे समजले जाई. होमरचे अंधत्व हे कल्पनाशक्तीच्या सामर्थ्याचे ते प्रतीकच समजत.

---

२९. (खिस्तपूर्व २४०–१५२) स्टोइक तत्त्ववेत्ता. स्टोइक तत्त्वज्ञानाने जो व्याकरणविषयक सिद्धान्त मांडला त्याच्या मुळाशी ह्या तत्त्ववेत्त्याने प्रतिपादलेली विचारसरणी होती.

३०. फिलॉस्ट्रॅटी ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कुटुंबातील एक. जन्म इ. स. १७०. ह्याचा ग्रंथ Life of Appolonius of Tyana. टीकाकार.

सेनेकाने आपल्या काळात प्रचलित असणारी एक कल्पना व्यक्त केली आहे. एखाद्या कलाकृतीच्या निर्मितीसाठी एक कलावंत, तो जे व्यक्त करू पाहतो ते (his project) ते व्यक्त करण्याचे साधन आणि त्या साधनाला तो जे रूप देतो ते, ह्या चार गोष्टींची तर आवश्यकता असतेच; परंतु ह्या शिवाय आणखी एका पांचव्या गोष्टीची तितकीच आवश्यकता असते. आणि ती गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष कलानिर्मिति करीत असताना कलावन्त जे चिंतन करीत असतो. जो विचार करीत असतो ती होय. ह्यापुढे तो म्हणतो, " ज्या नमुन्याबरहुकुम कलावन्त कलानिर्मिति साधीत असतो तो नमुना भोवतालच्या जगात असतो की त्याच्या कल्पनाशक्तीने त्याच्या अन्तर्मनात निर्माण केलेला असतो ह्याचा कलेशी कोणत्याच प्रकारचा संबंध नाही. " क्लासिकल काव्यातील ग्रीकांची मात्र निश्चित अशी समजूत होती की कला ज्या नमुन्याबरहुकुम निर्माण होते तो नमुना बाह्य जगातच असतो. हा नमुना केवळ कलावन्ताच्या अन्तर्मनातही असू शकतो ही जाणीव केवळ हेलिनिस्टिक युगातच दिसून येते. अन्तर्मनातील ह्या नमुन्याला उद्देशूनच 'प्रतिभा' (eikon) आणि अनेकदा 'कल्पना' (idea) हे शब्द त्या काळात योजिले गेले. सिसिरोने हा शब्दप्रयोग प्लेटोकडूनच घेतला व योजला. परंतु असे करिताना त्याला प्लेटोने दिलेला अर्थ काढून टाकला व नवा अर्थ दिला. कवीच्या आणि कलावन्ताच्या अभिव्यक्तीमध्ये काहीतरी दिव्यत्व अवतरत असते. त्याच्या अन्तःकरणात एका वेगळ्याच विश्वातून कल्पना प्रवेश करीत असतात व त्यांच्या साहाय्याने तो निर्मिति साधतो असे त्याने सुचविले. कवीच्या अन्तर्मनात वसत असलेली ही 'प्रतिभा' वा 'कल्पना' विशुद्ध असते, स्वायत्त असते आणि अचूक असते, असे प्लूटार्कचे म्हणणे आहे.

शहाणपण की स्फूर्ति ?

काव्याला विचाराची आवश्यकता आहे ह्यावर हेलिनिस्टिक युगातील लेखकांचे आणि लॅटिन (रोमन) लेखकांचे एकमत होते. पर्गेमॉनचा क्रेटिस[३१] ह्या स्टोइक तत्त्ववेत्त्याने असे म्हटले आहे की काव्यातील सौन्दर्यस्थलांचे रसग्रहण केवळ विचारवंतच करू शकतो. कलोपासना करावयाची असेल तर शहाणपणावाचून (तारतम्यज्ञानावाचून) भागणारच नाही असे सिसिरोचे मत होते. सर्व प्रकारच्या चांगल्या लेखनाचा जन्मच शहाणपणातून होत असतो असे होरेसने म्हटले आहे. (scribendi recte sapere est et principium et fons) शहाणपणा नसेल तर केवळ स्फूर्ति कुचकामाची ठरेल.

परंतु हे जसे खरे, तसेच ह्याच्या उलटही खरे. स्फूर्ति नसेल तर केवळ शहाणपणा असून भागणार नाही. कवीची ही उत्स्फूर्त अवस्था वर्णन करण्यासाठी ग्रीक आणि लॅटिन लेखक आपणहून enthousiasmos हा ग्रीक शब्द एकसारखा वापरतात. हा शब्द आहे तसा घेतला तर केवळ काहीतरी दिव्य असे तो सूचित करतो. स्फूर्ति ही एक दैवी कृपा आहे असे काही लोक खरोखरच समजत होते. काहींना स्फूर्तीमध्ये केवळ कविमनाचा अंतर्गत ताण जाणवत होता. प्लेटोनिस्टांना स्फूर्तीमध्ये देवाचा हात आहे असे वाटत होते, एपिक्यूरियन्सच्या मते तिला नैसर्गिक कारणे होती. काही केवळ स्फूर्तीवर जोर देत होते, काही शहाणपणावर किंवा ज्ञानावर भर देत होते, परंतु शेवटी हेलिनिस्टिक युगातील सर्व लेखकांचे, शहाणपणा आणि स्फूर्ति ह्या दोहोवाचून काव्याचे भागत नाही, ह्या एका बाबतीत एकमत होते.

अन्तःस्फूर्ति की नियमांचे पालन ?

प्राचीन काळात कलेसंबंधीची कल्पना ही कायमची नियमांच्या कल्पनेशी बांधली गेली होती. एखादी कृति ही नियमांना अनुलक्षून नसल्यास प्राचीनांच्या कलेसंबंधीच्या कल्पनेत ती बसूच शकत नव्हती. काव्य हे नियमानुसारी नसून ते स्फूर्तीवर अवलंबून असते अशी त्यांची समजूत असल्यामुळे अगदी प्रारंभी प्रारंभी ते काव्याला कलांच्या क्षेत्रात स्थान द्यावयाला फारसे तयार नव्हते. हेलिनिस्टिक युगामध्ये मात्र एक दुहेरी बदल घडून आला. इतर कलांप्रमाणे काव्य हेही काटेकोर नियमांचे पालन करीत असते हे जसे एकीकडे लक्षात आले तसेच दुसरीकडे त्यांच्या हेही लक्षात आले की आपण जितके दुसरीकडे

३१. क्रेटिस ऑफ मेलॉस हे दुसरे नाव. स्ट्रॅबोचा समकालीन. होमर, हेसिऑड, युरीपिडीस, ॲरिस्टॉफेनिस इत्यादींवर टीकात्मक लेखन. पर्गेमम येथील ग्रंथालयाचा प्रमुख.

त्यांच्या हेही लक्षात आले की आपण जितके समजत आलो तितके नियमांच्या काटेकोर प्रतिपालनाला कला आणि काव्य ह्या दोहोंच्याही बाबतीत महत्त्व नाही.

कलेचे नियम हे अचल व त्रिकालाबाधित असू शकत नाहीत, आणि त्यांचे अंधपणे प्रतिपालन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही ही समजूत हळूहळू बळावू लागली; आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की कलेच्या संबंधात नियमांचा विचार हा दुय्यम स्वरूपाचा आहे. कारण प्रथम होत्या त्या कलाकृती, नियम नव्हेत, आणि केवळ ह्या कलाकृतींच्या आधारे मग आपण हे कलेसंबंधीचे नियम बसवले हे लक्षात आले. "पद्यासंबंधीच्या विचारापूर्वी पद्य होते" ल्यूसियन तर ह्याहीपुढे जाऊन म्हणाला, "प्रत्येक गोष्टीला तिचे असे सौन्दर्य असते", व हे सौन्दर्य नियमात बसविता येत नाही. आणि ज्या अर्थी नियमांच्या अधिराज्यालाही त्याच्या स्वयंसिद्ध मर्यादा आहेत त्या अर्थी स्वातंत्र्यालाही निश्चित वाव आहे, आणि कवीच्या स्वातंत्र्याबरोबरच वाचकाच्या स्वातंत्र्यालाही. फिलोडेमेस म्हणतो, की चिओसच्या (chios) अरिस्टोने[३२] असे म्हटले आहे : "काव्य कसे पाहिजे तर वेगवेगळ्या प्रकारच्या अभिरुचींचे समाधान होईल असे" आणि स्यूडो–लॉजिनस[३३] स्पष्टपणे बजावतो, "ज्याला जे आवडेल ते त्याने आस्वादावे."

नियमांसंबंधीच्या अतिरिक्त आदराबरोबरच अचुकपणा हे काव्याचे सर्वश्रेष्ठ लक्षण आहे असे प्राचीन विचारवंतानी गृहीत धरले होते. परंतु आता एका नवीन विचाराला पुरस्कर्ते लाभले. तो विचार म्हणजे असा की काव्यात अचूकपणापेक्षाही ऐश्वर्याला, सामर्थ्याला, उदात्ततेला (grandeur) अधिक महत्त्व आहे. "अचूकपणाने साधते काय तर केवळ दोष निर्माण होण्याची भीति टळते: ऐश्वर्य, सामर्थ्य, उदात्तता ह्यातून प्रशंसा जन्माला येते." असे स्यूडोलॉजिनस म्हणतो आणि तो आपल्या विवेचनाचा शेवट करितो तो पुढील वाक्याने : 'श्रेष्ठ दर्जाचे लेखक फार क्वचित अचूक लिहितात.'

बुद्धि की इंद्रिये ?

स्यूडो-सिरियानस[३४] (Pseudo Syuianus) ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका अनामिक लेखकाने ह्या काळात जो प्रखर बुद्धि-विरोध व्यक्त केला आहे तो अगदी अर्वाचीन काळातील ब्रगसाँच्या तोडीचा आहे. बुद्धीच्या (logos) साहाय्याने आपण केवळ वस्तूंच्या घटकांची कल्पना करू शकतो परंतु त्यांचे एकसंघ स्वरूप हे केवळ त्यांचा आपल्यावर होणारा जो प्रत्यक्ष संस्कार त्याच्या द्वाराच आपल्या लक्षात (aisthesis) येत असते. विविध वस्तु आणि विविध गोचर रूपे (forms) बुद्धि पकडते ती केवळ नावापुरती, कारण तिच्या ठिकाणी त्यांची प्रत्यक्ष पकड घेण्याची ताकदच नाही. अशा रीतीच्या प्रतिमा की ज्या केवळ नावापुरत्या नाहीत तर वस्तूंच्या प्रत्यक्ष, मूर्तिमान् प्रतिमा आहेत, त्या व्यक्त करण्याचे त्या साक्षात् करण्याचे, कार्य हे कलावन्ताचे, बुद्धिवन्ताचे नव्हे.

हा जो विचार झाला तो केवळ कवीच्या संदर्भात नव्हे तर वाचकाच्याही संदर्भात : त्यांनी चर्चा केली ती केवळ कलाकृतीची नव्हे तर कलानंदाचीही, सौंदर्यभावनेचीही. काव्य हे ऐकण्यासाठी असते हे प्राचीन सौंदर्यशास्त्र गृहीतच धरीत होते. परंतु स्यूडो–लॉन्जीनस सारखे अनेक टीकाकार असेही होते की भाषेतील संगति ही केवळ श्रोत्यांच्या श्रोत्रेंद्रियांशी संवाद करीत नसून ती साक्षात् त्यांच्या अंतःकरणाशी संवाद करिते असे त्यांचे मत होते. परंतु असे असूनही प्राचीन काव्यशास्त्र त्याच्या विकास–मार्गावरही वेळोवेळी काव्याच्या संदर्भातील श्रवणेंद्रियांच्या कार्याला नेहमीच महत्त्व देताना आढळते. काव्यास्वादाच्या संबंधातील ह्या केवळ श्रोतृसंवेदनात्मक अंगाचा पाठपुरावा इतराबरोबरच स्टोइक तत्त्ववेत्यांनी आणि बॅबिलॉच्या डायोजीनसने केलेला आढळतो. हा विचारवंत संवेदनांचे दोन प्रकार मानतो : सर्वसामान्य स्वरूपाच्या संवेदना आणि विकसित संवेदना. त्यांच्या मते भाषेतील संगति जाणवते ती ह्या विकसित संवेदनांच्या द्वारा.

---

३२. (इ. स. पूव २५०) स्टोइक तत्त्ववेत्ता, झेनोचा शिष्यः नीतिशास्त्र हाच विषय केवळ अभ्यासास योग्य ह्या मताचा.

३३. ९ वरील तळटीप पाहणे.

३४. ?

वाचकांचा पत्रव्यवहार—

तर्कतीर्थ आणि सशस्त्र प्रतिकार

' मार्च 'च्या अंकात श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यानी मला दिलेले उत्तर वाचले. गोमांतक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यानी ' आत्मा ' शब्दाचा जो वापर केला तो वेदान्त-शास्त्राला गृहीत असलेल्या अर्थाने नसून राज्यशास्त्र आणि नीतिशास्त्राला गृहीत असलेल्या अर्थाने आहे; असे स्पष्टीकरण देताना तर्कतीर्थ म्हणतात, ' म्हणून राज्यशास्त्र आणि वेदान्तशास्त्र यातील परिभाषांचा गोंधळ करून मी माझे विचार मांडले असा माझ्या-वर दोषारोपही त्यानी केला आहे. वास्तविक मूळ भाषणात त्यांनी ' आत्मा ' शब्दाचा वापर ज्या पद्धतीने केला त्या पद्धतीतून तर्कतीर्थांना राज्य-शास्त्रातील अर्थच गहीत आहे याची कोणतीही (अस्पष्टसुद्धा) खूण निदर्शनास येत नाही. तेव्हा, माझ्यावरील दोषारोप निराधार म्हणून निरर्थक आहे असे मला वाटते.

तर्कतीर्थांनी ' भगवद्‌गीतेत सशस्त्रयुद्ध हे आत्म-शुद्धीचे साधन म्हणून सांगितले आहे ' असा पुरावा देऊन प्रतिकाराच्या सशस्त्र मार्गाचे, ज्याला ते नैतिकश्रद्धा म्हणतात, पुन्हा एकवार समर्थन केले आहे. जैन धर्मशास्त्र, म. गांधी आणि येशूख्रिस्त यांचाही आधार घेऊन ' राज्यसंस्था ही सशस्त्रच असावी लागते ' असे ठासून सांगितले आहे. एका विशिष्ट परिस्थितीत म. गांधी अथवा येशूख्रिस्तानी सशस्त्र प्रतिकारांना मान्यता दिलेली आहे, तरी म. गांधी अथवा येशूख्रिस्ताच्या जीवनात नैतिकश्रद्धेच्या रूपात सशस्त्र प्रतिकाराचा प्रवेश झाला नाही; हे अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट करता येईल हे मी नम्र-पणे सुचवू इच्छितो. उलट म. गांधी अथवा येशू-ख्रिस्त यानी आत्मसमर्थनार्थ सशस्त्रप्रतिकार केला नाही, आत्मबलिदानाचा मार्ग स्वीकारला, हे सूर्य-प्रकाशाइतके स्पष्ट आहे. तेव्हा सशस्त्र प्रतिकार विशिष्ट प्रसंगानी आणि भीरुता घालविण्याकरिता करावा लागला तरी ती जीवनातली मोठी कमजोरी होय याची जाणीव म. गांधी अथवा येशूख्रिस्त यांना किंवा अन्य कोणत्याही धर्मशास्त्रांना होती असे मला वाटते. आणि भगवद्‌गीतेबद्दलसुद्धा असे म्हणता येईल की कोणालाही सोयीचा अर्थ त्यातून काढता येईल. असो.

आजवर शस्त्रविहीन राज्यसंस्था अस्तित्वात आलेली नाही हे खरे आहे. पण ती अस्तित्वात आलेली नाही म्हणून सशस्त्र राज्यसंस्था न्याय्य ठरते असे म्हणणे मानवी विवेकशक्तीला आव्हान दिल्यासारखे होईल. मनुष्य ज्ञानाच्या आणि विवे-काच्या कर्तृत्वाने स्वतःवर पडलेली बंधने तोडून मुक्त होत आहे. आणि तो असाच मुक्तीचा मार्ग शोधीत राहणार. ज्ञान आणि विवेक जितक्या प्रभावी रूपात आणि गतिपूर्वक जीवनात स्थिर होऊ पाहतील तेवढ्याच गतीने माणूस स्वातंत्र्याच्या अंतिम स्थितीचा शोध घेईल. तेव्हां आज जी गोष्ट घडलेली नाही ती कालांतराने घडणारच नाही याची शक्यता जशी विज्ञानाने संपुष्टात आणलेली आहे तशी मनुष्य विवेकशील होऊन त्याची शांततामय सहअस्तित्वाची जाणीव प्रभावी होऊन तो राज्य-संस्था आज ना उद्या झुगारून देईल हेही नाकबूल करता येण्यासारखे नाही. म्हणून शांततामय सह-अस्तित्वाच्या जाणीवेत शस्त्र धरणे हे अन्याय्य ठर-णार म्हणूनच सशस्त्र राज्यसंस्थाही कालांतराने अन्याय्य ठरणार हे सांगायला नकोच !

' विचारस्वातंत्र्यातच सत्य जगते व वाढते म्हणून कोणत्याही विचारसरणीने विरोधी विचारावर शस्त्र चालवू नये ' हे तर्कतीर्थांचे म्हणणे पटण्या-सारखे आहे. पण सत्य कोणत्याही सशस्त्र प्रतिकाराने सिद्ध करता येत नाही. सत्याच्या सिद्धीकरता अहिं-सेचे साधनच वापरावे लागते. किंबहुना अहिंसे-

शिवाय सत्याची कल्पना येणेही दुरापास्त आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. विचारस्वातंत्र्याला हिंसेचे अथवा शस्त्राचे संरक्षण देणे म्हणजे खरे संरक्षण देणे नव्हे, उलट अशा संरक्षणामुळे विचारस्वातंत्र्य मुळातच खुरटून जाते, जे चीन-रशियामध्ये खुरटले. मनुष्याच्या पाशवी आणि आक्रमक वृत्तीत पालट करणारा आत्म-क्लेशाचा किंवा बलिदानाचा मार्गच विचारस्वातंत्र्याचे खरेखुरे संरक्षण करील.

— बाबूराव चंदावार

महाराष्ट्र आणि दिल्ली

'महाराष्ट्र आणि दिल्ली' हा लेख (फेब्रुवारी १९६३) प्रा. फाटक यानी परप्रांतीयांचे गैरसमज दूर करण्याकरिता लिहिला. एकतर हा लेख मराठीत लिहिला असल्यामुळे तो परप्रांतीय लोक वाचण्याचा संभव फार थोडा. दुसरे असे की, या लेखात लेखकाचच गैरसमज प्रतिबिंबित झालेले दिसतात. महाराष्ट्रात राजवाडेप्रभृति संशोधकांनी मराठी इतिहासासंबंधी एक चुकीची विचारसरणी निर्माण केली ती आता रूढ होऊन बसली आहे. या विचारसरणीला महाराष्ट्राबाहेर मान्यता मिळाली नाही आणि मिळण्याचा संभव दिसत नाही. इंग्रज इतिहासकार तर सोडाच, पण आमचे देशी बंगाल, उत्तर प्रदेश, राजस्थान, दक्षिण हिंदुस्थान येथील एकही संशोधक त्यांच्या अनुमानांना उचलून धरीत नाही, उलट विरोधच करतो. यामुळे मराठे व दिल्ली दरबार यांचे वास्तविक काय संबंध होते याची खरीखुरी, मनमोकळी, चर्चा झाली पाहिजे. प्रादेशिक अभिमान या चर्चेत आणण्याचे कारण नाही. इतिहासाचा विपर्यास नको हा हे टिपण लिहिण्याचा मुख्य उद्देश. प्रा. फाटक हे माझे परम स्नेही आहेत. त्यांचा अठराव्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास दांडगा आहे. पण त्यांच्या लिखाणातील काही विधाने अतिव्याप्त स्वरूपाची वाटल्यामुळे ही चर्चा केली आहे. एक मराठा नेफात कमांडिंग ऑफिसर होता किंवा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री संरक्षणमंत्री होतो याचा बादरायण संबंध मराठी इतिहासाशी जोडण्याचे कारण नाही. फाटकांच्या मराठा सेनापतीने नेफा विभागात काय पराक्रम गाजविले त्याची सरकार दरबारी झालेली गुप्त दखल फाटकांना असेल, पण जोपर्यंत त्याचा जाहिराणा झाला नाही तोपर्यंत त्यांचा उल्लेख करण्यात हाशील नाही. दुसरे म्हणजे श्री. चव्हाण दिल्लीस मराठा म्हणून काही आलेले नाहीत. एक कार्यक्षम, संघटनाकुशल हिंदी मंत्री म्हणून त्यांची नेमणूक झाली आहे. त्यांचे कर्तृत्व अद्यापि कसास लागावयाचे आहे.

प्रा. फाटकाच्या दोन चार मुद्याचे येथे विवेचन करूं. भाषावर प्रांतरचना चांगली का वाईट याचा विचार करण्याचे आता कारण नाही. भाषावार प्रांतरचनेला मान्यता दिली गेली याचे मुख्य कारण जनतेशी संपर्क वाढावा, लोकशाही दृढ व्हावी म्हणून. मराठी भाषिकांचा एक प्रांत असला तर महाराष्ट्रीय जनतेचे सहकार्य सरकारला सहज मिळेल अशी समजूत. ज्याप्रमाणे मराठी भाषिकांचे गणराज्य झाले त्याप्रमाणे आणखी तेरा गणराज्ये अस्तित्वात आली. यात मराठी इतिहासाचा संबंध कोठे येतो ?

आता फाटकांच्या ऐतिहासिक मुद्यांचे परीक्षण करू. सातव्या शतकातील चिनी प्रवाशाने केलेले वर्णन अठराव्या शतकातील किंवा आजच्या मराठ्यांना कितपत लागू पडेल याची शंका आहे. सातव्या शतकात प्रांतिक भावना फोफावली होती आणि आपण मराठे, कानडे, तेलंगी, बंगाली, बिहारी आहोत. ही आजची जाणीव लोकात आली होती हा इतिहासाचा विपर्यास आहे. परकी भाषा न जाणणाऱ्या चिनी (!) प्रवाशाच्या एका विधानावर आधार ठेवून अनुमाने काढणे ऐतिहासिक पद्धतीस मान्य नाही. सातव्या शतकात आजचा महाराष्ट्राचा मुलुख कर्नाटकी राज्यात

समाविष्ट होता आणि मराठी भाषा जन्मास याव-याची होती.

मुद्दा नंबर दोन : 'अगतिक होऊन शाहू महाराज्यांच्या पदरी दिल्लीने स्वराज्याचे दान टाकले' या विधानात अतिव्याप्ति झाली आहे. मराठ्यांशी लढा चालविता येत नाही हे पाहून औरंगजेबाने मिटते घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्या हयातीत काहीच घडले नाही. पण त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाने शाहूची कैदेतून मुक्तता केली ती एका अटीवर की शाहु दिल्लीच्या तख्ताशी एकनिष्ठ राहील. शाहूनेही हे मान्य केले आणि त्या वृत्तीने तो राहिला. शिवाजीनंतर निर्माण झालेले शाहूचे 'स्वराज्य' स्वतंत्र राज्य नसून मांडलिक राज्य होते. बाळाजी विश्वनाथाने ज्या 'स्वराज्याच्या सनदा' आणल्या त्यात या नात्याचे स्पष्टीकरण केलेले आहे. फारसी कागदपत्रात शाहूचा उल्लेख 'झमीनदार' असा येतो. त्याला साधा 'राजा' म्हणायला सुद्धा दिल्लीदरबार तयार नाही. कसले दुबळें हे 'स्वराज्य'! काही मराठी लेखक यथार्थतेने या सनदांना स्वराज्याच्या शृंखला म्हणतात. जय मिळविला असताना मांडलिकी पत्करण्याची शाहूस जरूर नव्हती. पण शिवाजीची स्वातंत्र्यप्रीति शिवाजीच्या नातवात उरली नाही. बादशाही व मराठेशाही यांच्यातील ज्या सलोख्याचा फाटक उल्लेख करतात तो सलोखा मांडलिकी स्वरूपाचा होता, बरोबरीच्या मैत्रीचा नव्हता. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने शाहूचे राज्य स्वतंत्र राज्य ठरत नाही.

मुद्दा नंबर तीन : "शेजारच्या मुलुखातील हिंदु जनतेला मराठे हे स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते व प्रतिनिधि वाटत. मोगल सुभेदाराच्या जुलुमातून मुक्त होऊ इच्छिणारी जनता मराठ्यांना आपल्या प्रदेशांत बोलवीत असल्याची बरीच उदाहरणे आहेत." छत्रसालाचे उदाहरण फाटकांनी दिले आहे. पण छत्रसालाच्या मुलांच्यामध्ये व मराठ्यांच्यामध्ये कित्येक लढाया पुढील शतकात झाल्या त्याची त्यांना आठवण राहिलेली दिसत नाही! शेजारची हिंदु प्रजा मराठ्यांना मित्र मानी ही एक इतिहासातील दंतकथा आहे. तिला सत्याचा आधार मुळीच नाही. माळव्यात मराठ्यांचा प्रवेश झाला तेव्हा जयपूरच्या जयसिंगाला व उदेपूरच्या राण्याला बाजीराव पेशव्याने मैत्रीची आश्वासने देऊन कित्येक पत्रे लिहिली. जयसिंगही मोठा महत्वाकांक्षी होता. आपल्या राज्याला माळव्याचा मोठा सुभा त्याला जोडावयाचा होता. बुभुक्षित मराठ्यांना काही पैसा दिला म्हणजे त्यांच्या फौजांचे साह्य विकत घेता येईल ही त्याची कल्पना! या धोरणाने तो वागत होता. मराठ्यांनी चौथ-सरदेशमुखी मागता मागता शेवटी नायब सुभेदारीची मागणी केली आणि शेवटी १७४३ त बादशाही सनदेने ती मिळविली. पण इतक्याने कोठे भागले? बुंदेलखंड, राजस्थान, बंगाल, कर्नाटक इकडे चोहोंकडे मराठी फौजा चौथ जमा करण्याच्या हेतूने संचार करू लागल्या. त्याच्या दरसालच्या मागणीने राजेरजवाडे रंजीस आले, प्रजा हैराण झाली, इतकी की त्यानी मराठ्यांना सर्व प्रकारे विरोध आरंभिला! शाहू-बाजीरावाचा मित्र जयपूरचा जयसिंग याचा मुलगा ईश्वरीसिंग याने मराठ्यांच्या ससेमिऱ्याला कंटाळून विष खाऊन मराठ्यांना शाप देत प्राण सोडला! त्याचा भाऊ माधोसिंग (जो मराठ्यांचा हस्तक होता) त्याने मराठ्यांच्या विरुद्ध मोठी फळी उभारली आणि त्यांना सतत प्रतिकार केला. मराठ्यांच्या लुटारू वृत्तीने मराठ्यांना हिंदुस्थानात सर्वत्र शत्रूच निर्माण झाले. राजस्थानी दोहऱ्यात मराठ्यांची तुलना रक्तपिपासु ढेकूण-पिसवांबरोबर केली आहे! बंगाल्यातील मराठ्यांच्या स्वाऱ्यांनी उडवून दिलेल्या हाहाःकाराचे वर्णन महाराष्ट्रपुराणात वाचावे. शत्रुसैन्याशी समोरासमोर सामना न करता मुलुखाची

जाळपोळ करावयाची, प्रजेला लुटावयाचे,या मराठ्यांच्या मुलुखगिरीने सर्वत्र त्याच्याबद्दल अप्रीति निर्माण झाली ! मराठ्यांच्या लुटारू वृत्तीने हिंदुस्थानात त्याना सर्वत्र शत्रू निर्माण झाले. पानपतावर एकही हिंदु राजा त्यांच्या मदतीस आला नाही !

इंग्रजानी राज्यविस्तार केला, ज्यांच्यावर खंडणी बसविली त्यांच्या संरक्षणाची तरी जबाबदारी घेतली. मराठ्यांच्या भालेराईने हिंदुस्थानात एक शतकभर मोठे अराजक माजले, जीविताची मालमत्तेची शाश्वति राहिली नाही !

बादशाहसकट दिल्ली संभाळण्याची जबाबदारी मराठ्यांनी कितपत पार पाडली याला इतिहासच साक्ष आहे. नादिरशहाच्या स्वारीच्या वेळी बाजीराव तापीपुढे जाऊ शकला नाही. नादिरशहाचा प्रतिकार करण्याची मोठी योजना त्याने तयार केली असे समजण्याचे कारण नाही. त्याच्या एकदोन पत्रातील अंधुक उल्लेखावरून वाटेल ते अंदाज करू नयेत.

अबदाली एकदा नाही तर चार वेळा हिंदुस्थानात येऊन प्रचंड लूट करून संहार करून गेला. तो जोपर्यंत दिल्लीच्या आसपास राही तोपर्यंत मराठी फौजा राजपुताना येथील गावात झांबडाझांबड करीत. तो निघून गेला की मराठे आगेकूच करून दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशावर आपला चौथ लागू करीत– यात शौर्य कोणते, आणि राजनीति कसली ?

सदाशिवराव भाऊ याला एक अपवाद दिसतो. अबदालीने मराठी वर्चस्वाला शह दिला तेव्हा तो फौज घेऊन उत्तरेस गेला पण सर्व हिंदुस्थान विरोधी बनले आहे हे पाहून तो निराश झाला; ही त्याची निराशा त्याच्या पत्रात स्पष्ट झालेली दिसते. दिल्ली सोडून त्याने पुढे पानिपतावर आगेकूच केले. त्याची भोळी समजूत की तसाच प्रसंग आल्यास माझा नाना दक्षिणेतून मदतीस धावून येईल, हिंदुस्थानचे राजेरजवाडे आपणास सर्वतोपरी साह्य करतील. पण वास्तविक काय घडले ? मराठी धोरणाला अपवाद असलेला सच्चा माणूस जिवानिशी वाया गेला !!

महादजी शिंद्याचे बहुतेक शहाणपण आणि शक्ति ही राजपुतांचे शौर्य खची करण्यात वाया गेली. त्याच्या दिल्लीच्या दिवाणगिरीने मराठी राज्याचे सामर्थ्य वाढले म्हणावें तर त्याच्या मृत्यूनंतर अवघ्या आठ वर्षांत मराठी राज्याचा डोलारा का कोसळावा ?

अठराव्या शतकात मराठ्यांनी दिल्ली सांभाळली ही भ्रामक समजूत आता सोडून द्यावी. दिल्लीस वर्चस्व प्राप्त व्हावे हे मराठराज्याच्या धोरणाचे सूत्र. पण ते ना धड मांडलिक म्हणून वागले ना स्वतंत्र ! राजपूत, जाट, शीख, मुसलमान जसे स्वार्थाने बरबटलेले होते तसेच मराठे. हिंदुस्थानच्या राज्याची घडी त्याना बसविता आली नाही. उलट आपसात स्वार्थाने ते झगडले, आणि स्वातंत्र्य गमावून बसले. इंग्रजी राज्यस्थापनेला आमच्या घरातील शत्रूंनीच हात लावला ?

मराठ्याच्या राजकारणात विशेष ध्येयवाद होता किंवा मराठे इतर प्रांतीयाहून म्हणजे राजपूत, जाट, शीख, मुसलमान याहून वरचढ किंवा विशेष शाहणे होते हा खोटा अभिमान आता सोडून द्यावा. मराठशाहीत शिवाजी, बाजीराव, अशी थोर माणसे होऊन गेली पण ती खरोखर अपवाद होत. शिवाजीनंतरची मराठराज्याची धोरणे नादानीची होती. त्यानी ना हिंदूचे, ना हिंदुस्थानचे ऐक्य साधले. विद्येत, राजकारणशास्त्रात, राजकीय, सामाजिक, विचारात कोठेच अठराव्या शतकात प्रगति दिसत नाही. एकोणिसाव्या शतकात जो नवा हिंदुस्थान उदयास आला त्याच्या निर्मितीला सर्वांनी–बंगाल्यांनी, मराठ्यांनी, तामिळानी–हातभार लावला आहे. राष्ट्रीयत्वाच्या भावनेने प्रादेशिक अभिमानाला आता दुय्यमपणा आला आहे. वास्तविक परिस्थिति अशी

आहे कीं हिंदुस्थान स्वतंत्र राहिला तर आमचे स्वातंत्र्य अबाध राहील. दिल्लीच्या म्हणजे हिंदुस्थानच्या संरक्षणाची जबाबदारी सर्वांची आहे, महाराष्ट्राने आपला वाटा उचलला म्हणजे मिळवली.

नवी दिल्ली — वि. गो. दिघे

' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति '

गेल्या डिसेंबरच्या अंकातील श्री. ना. गो. चापेकर यांचा ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' हा लेख वाचून सुचलेले विचार कळवीत आहे. स्त्रीने एकटे, अलग म्हणजे (मनुस्मृतीच्या मते) स्वतंत्र राहू नये, कारण त्यामुळे विवाहसंस्था व कुटुंबसंस्था या दोहोवरही जबरदस्त आघात होतो असे नानासाहेबांचे मत दिसते. ज्या अर्थी या मताचा त्यानी पुनरुच्चार केला आहे त्याअर्थी मनूच्या काळापासून आजवर समाजरचनेत काही परिवर्तन झाले नाही व झाले असले तरी त्यामुळे ही कल्पना गतार्थ झाली नाही असे त्यांचे मत असावे असाच कोणाचाही ग्रह होईल. परंतु खुद्द मनूने- " विद्वान समाजशास्त्रज्ञाने " — असा दावा केला असावा असे वाटत नाही; नाहीपेक्षा स्मरणपूर्वक श्री. चापेकरानी तो खचित उद्धृत केला असता. समाजातील एका मूलभूत परस्परसंबधामध्ये (Inter-relationship) काहीही बदल घडावयाला नको, कारण भूतकालातच याबाबत सर्वोत्तम विचार मांडलेले आहेत, अशी पुच्छप्रगत विचारसरणी ही नवी—समाजशास्त्रातही—नाही.

एक अपेक्षा अशी होती की श्री. चापेकर किंचित खोलात जाऊन स्त्रीपुरुष भेदाचे निसर्गनिर्मित स्वरूप व त्याला सामाजिक कार्यविभाजनात मिळालेली कलाटणी याची मूलभूत चिकित्सा करतील. याबाबतीत एक प्रश्न सरळच विचारावासा वाटतो. तो हा की, आजची समाजरचना ही स्त्रीपुरुषातील निसर्गनिर्मित भेदच व्यक्त करते की, त्या भेदाला सामाजिक व्यवहारात अतिरेकी साचेबंद स्वरूप देऊन स्त्रियांच्या इच्छाशक्ति व क्रियासामर्थ्य यांना विशिष्ट स्वरूपातच व्यक्त होऊ देते व असे करणे हेच योग्य आहे असे मानते ? किंबहुना स्त्री आणि पुरुष हे शब्द उच्चारले असता शारीरिक, मानसिक व बौद्धिक गुणसमुच्चयाच्या ज्या दोन प्रतिमा दृष्टीसमोर उभ्या राहतात तितक्या त्या खरोखरच स्वतंत्र आहेत की एकाच नाण्याच्या दोन बाजूसारख्या सुसंबद्ध आहेत ? एकापक्षी असे मत मांडण्यात येते की नाण्याची एक बाजू संपून दुसरी बाजू एका विशिष्ट ठिकाणापासून सुरू होते हे सांगणे जितके कठीण तितकेच पुरुषत्व व स्त्रीत्व या कल्पनांचे विभिन्नीकरण करणे कठीण भासेल. हे मत मान्य झाल्यास सामाजिक कार्यविभाजनाची परंपराधिष्ठित आजची पद्धति— मग ती कुटुंबसंस्थेतील बालसंगोपनाबाबत असो वा पुनर्विवाहाच्या सवलतीची वा स्त्रियांच्या नोकरी करण्याबाबत असो— हीच बरोबर आहे. कारण ती प्राचीन कालापासून चालत आलेली आहे; मनूने मांडलेल्या विचारांना अनुसरणारी आहे, असे मत कितीही ज्ञानवृद्ध व्यक्तीने मांडले तरी मान्य करणे अशक्य होईल. गेल्या शे—दीडशे वर्षांतील सामाजिक परिवर्तनाच्या (फक्त हिंदुस्थानातील नव्हे) दिशेचा अंदाज स्थूलमानाने जरी घेतला तरी असे आढळेल की स्त्री—पुरुष संबंधामध्ये होणाऱ्या परिवर्तनाची वाटचाल ही परंपरेने चालत आलेल्या सामाजिक संकेताना थारा न देता निसर्गनिर्मित भेदांपुरती त्यांच्यातील विषमता अटळ मानून इतरत्र दोघांच्याही इच्छाशक्ति व क्रियासामर्थ्य यांना सारखाच वाव देण्याचा प्रयोग करून पाहण्याच्या दिशेने होत आहे. अर्थातच हा प्रयोग यशस्वी झाला आहे असे आज म्हणता येत नसले तरी भविष्यकाळी तो यशस्वी होईल की नाही याची खात्री देता येत नाही.

परंतु असे प्रयोग करून पाहण्याची भीती वाटणाऱ्यांना वा तसे करण्याची परवानगी मनुस्मृतीत दिलेली नसल्याने त्या प्रयोगाच्या शास्त्रशुद्धतेबद्दल शंका असणाऱ्यांना अर्थातच समाधानकारक उत्तर देणे कठीण आहे.

— हे. वें. बलकुंदी

अनुक्रमणिका

सार-संकलन

दक्षिण व आग्नेय आशियातील तांत्रिक शिक्षण

आशिया व आफ्रिका खंडातील नव्याने अस्तित्वात येणाऱ्या अनेक राष्ट्रांमध्ये निष्णात तंत्रज्ञ उपलब्ध नसल्यामुळे तांत्रिक शिक्षण व त्यासंबंधीचे संशोधन यास बाध येत आहे. म्हणून या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरिता कोलंबो योजनेशी निगडित असलेल्या दक्षिण व आग्नेय आशियातील राष्ट्रांच्या तांत्रिक शिक्षणाची पहाणी करण्याची योजना हाती घेण्यात आली होती. या पहाणीच्या रिपोर्टने तांत्रिक संशोधन व तांत्रिक कामगारांचे शिक्षण यावर चांगलाच प्रकाश पाडला आहे.

दक्षिण व आग्नेय आशियामध्ये शास्त्रीय शोधांचा उपयोग इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी यांचेद्वारा करण्यास मुख्य अडचण तांत्रिक शिक्षण घेऊन उद्योगधंद्यात काम करणाऱ्या कामगारांची व त्याना शिक्षण देणाऱ्या संस्थांची कमतरता ही होय. याचे एक कारण म्हणजे या देशातील कारखानदार व व्यापारी यांचे शास्त्रीय संशोधनाकडे संपूर्ण दुर्लक्ष होत असून देशाच्या उद्योगधंद्यात व अर्थव्यवस्थेत शास्त्रांचा उपयोग करण्याबद्दल त्यांचेतील औदासीन्य होय. कारागीर कुटुंबातून पिढीजात चालत आलेल्या लहानसहान उद्योगधंद्यात सुद्धा तंत्रविद्येच्या उपयोगाबद्दल औदासीन्यच आहे.

दुसऱ्या बाजूस तांत्रिक शिक्षण तज्ञांना आपण करीत असलेले काम अत्यंत महत्त्वाचे वाटते व म्हणून हे तज्ञ उद्योगधंद्यात उपयुक्त होईल त्यापेक्षा जास्त वरच्या दर्जाचे शिक्षण आपल्या विद्यार्थ्यांना देत बसतात. अनेक संस्था इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजीचे शिक्षणाबाबत विश्वविद्यालयाशी स्पर्धा करू पहातात. व जरूर असलेले तांत्रिक कामगार तयार न करिता इंजिनिअर्स व टेक्नॉलॉजिस्ट तयार करण्याचा प्रयत्न करतात. या विषयातील पदवी हेच बहुतेक सर्व विद्यार्थ्यांचे ध्येय बनते. या संस्थातून असलेले शिक्षक बहुतेक पदवीधर असून त्यांना कारखान्यातील कामाचा काहीही अनुभव असत नाही. त्यामुळे आपण शिकलेले विषय जरा जास्त पांचट करून ते आपल्या विद्यार्थ्यांना शिकवितात. त्यात अनुभवाच्या अभावाबरोबरच इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी या विषयांच्या मूलभूत अभ्यासाचाही अभाव असतो.

उद्योगधंदे व तांत्रिक शिक्षण यांचेमध्ये सहकार्य सापडत नाही. तांत्रिक शिक्षणाचे अभ्यासक्रम उद्योगधंद्यांच्या गरजा लक्षात न घेता आखण्यात येतात. परंतु हे शिक्षण घेऊन बाहेर पडणारे लोक उद्योगधंद्यातून कामाला यावेत असेही वाटते. एखादा उद्योगधंदा अस्तित्वात नसला तरी त्याचा अभ्यासक्रम ठरवून शिकविण्यात येतो तर अस्तित्वात असलेल्या उद्योगधंद्यांच्या विशिष्ट गरजांकडे संपूर्ण दुर्लक्ष करण्यात येते. त्यामुळे हे शिक्षण घेतलेले विद्यार्थी कारखाने किंवा सरकारी नोकऱ्या करण्यास लायक ठरत नाहीत. पुष्कळसे कारखानदार स्वतः अशिक्षित असतात, सुशिक्षित लोकांवर त्यांचा विश्वास नसतो, व त्यामुळे त्या शिक्षणाची त्यांना किंमतही वाटत नाही.

एका प्रचंड विविधलक्षी शाळेची पहाणी करता असे आढळून आले की तेथील मुख्याध्यापकाचा शाळेपासून अर्ध्या मैलावर असलेल्या कारखान्याशी कोठल्याही तऱ्हेचा संबंध नव्हता. या शाळांचे काम एक विशिष्ट अभ्यासक्रम पुरा करून विद्यार्थ्यांना डिप्लोमा देणे एवढेच असते. प्रत्यक्ष कारखान्यात काम पहाण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे अशी त्यांची अपेक्षा असते.

चांगल्या तांत्रिक शिक्षकांची उणीव सर्वत्र भासते. इतर विषयांचे शिक्षकांची परिस्थिती फारशी चांगली आहे असे नाही. या देशातून सत्तर टक्के शिक्षक शिकविण्याकरिता लागणारे पुरेसे शिक्षण घेतलेले असत नाहीत.

पुष्कळशा तांत्रिक शिक्षणाच्या शाळा-कॉलेजातून पुस्तकी ज्ञानावर भर देण्यात येऊन प्रत्यक्ष कारखान्यातील कामाकडे दुर्लक्ष होते. त्याचे कारण यातून काम करणारे बहुतेक शिक्षक पुस्तकी-

ज्ञानातच तरबेज असतात व आपल्याच प्रतिमा ते तयार करीत बसतात. याचा संबंध सरकारी नोकरीस लागणाऱ्या पात्रतेशी जोडण्यात यतो. त्यामुळे हा प्रश्न सोडविणे फार कठीण आहे. कारखान्यात कामे करून तरबेज झालेल्या कामगारात, तान्त्रिक कामगार होऊ इच्छिणाऱ्या दुय्यम शाळातील विद्यार्थ्यांना आपले कसब शिकविण्याची पात्रता असलेले किती कामगार सापडतील हाही प्रश्नच आहे. व अशा तऱ्हेच्या पात्र असलेल्या लोकांना उद्योगधंद्यात मिळणारा पगार सरकार किंवा शिक्षणसंस्थांना झेपणारा असेल की नाही हा दुसरा प्रश्न आहे.

तांत्रिक कामगारांना दिले जाणारे शिक्षण अशा तऱ्हेचे पाहिजे की ज्यामुळे तज्ञ टेक्नॉलॉजिस्टांच्या कल्पना स्वतः समजावून घेऊन त्या आपल्या हाताखालील शिक्षित किंवा अर्धशिक्षित कामगारांना त्याला सांगता येतील व त्यांचेकडून कामे करून घेता येतील. त्यांच शिक्षण पदवीधरांचे तोडीचे असण्याची गरज नाही. इंजिनिअर्स व कारागीर यांचेतील अंतर सांधणारा, तांत्रिक कामगार हा दुवा आहे. या दोन वर्गातील अंतर नुसत्या पगारातील अंतराने मोजता येणार नाही. त्यांची भाषा एकमेकांना कळत नाही. कारण शास्त्रीय शिक्षण इंग्रजीतून दिले जाते. या उलट तांत्रिक कामगारास इंग्रजी समजते व इंजिनिअरिंगची भाषाही समजते व दुसरे बाजूस देशीभाषा त्यास अवगत असल्यामुळे तो आपले ज्ञान कारागिरास देऊ शकतो. त्याला काम शिकवू शकतो. या देशात कुशल कारागीर पुष्कळ आहेत. परंतु त्याचेवर देखरेख करून त्याचेकडून काम करून घेणाऱ्यांचा तुटवडा आहे. पदवीधर इंजिनिअर्स व टेक्नॉलॉजिस्ट हे अशा तऱ्हेचे काम करण्यास असमर्थ असतात. त्यांची भाषा इंग्रजी असते. कारागीरही पुष्कळसे शास्त्रीय शब्द इंग्रजीच वापरतात. परंतु त्यांना इंग्रजीत दिलेले आदेश समजत नाहीत. म्हणून तांत्रिक कामगारांची फार गरज भासते.

तांत्रिक कामगारांचे शिक्षणाबद्दलचे औदासीन्य हे या देशातील कारखानदारात सामान्यपणे सापडणाऱ्या शास्त्रीय ज्ञानाच्या उपयुक्ततेबद्दल शंकेखोर दृष्टिकोणाचा भाग आहे. या शिक्षणाची उपेक्षा नोकरी शोधणारात व ती देणारात सारखीच सापडते. शालान्त परीक्षा पास होणाऱ्या प्रत्येक मुलास विश्वविद्यालयात जाण्याची महत्त्वाकांक्षा असते. 'श्रमाची प्रतिष्ठा' अनेक वेळा सांगण्यात येते, पण प्रत्यक्षात ती प्रस्थापित करण्याचा प्रयत्न कोणीही करीत नाही. शालान्त परीक्षा पास झाल्यावर 'सफेत कॉलर कामगार' होण्याची अनेकांची धडपड असते. आपली आवड, योग्यता किंवा शिक्षण यांचा विचार करण्याची त्याना जरूरी वाटत नाही. तांत्रिक शिक्षण घेऊन अंगमेहनत करण्यापेक्षा कचेऱ्यातील खडघाशी ही मुले जास्त पसंत करतात !

तांत्रिक शिक्षणातील शाळाकॉलेजांतील शिक्षक व विद्यार्थी त्या शिक्षणाबद्दल फारसे आग्रही दिसत नाहीत. या संस्थातील वर्कशॉपमधून क्वचित् एखादाच शिक्षक ओव्हरऑल घालून काम करीत असलेला दृष्टीस पडतो. बरचसे विद्यार्थीसुद्धा पांढरे स्वच्छ कपडे घालून टाय बांधून वर्कशॉपमध्ये फिरताना दिसतात. हे विद्यार्थी अर्धा वेळ शिकण्यात घालवतात व बाकीचा वेळ आपले कपडे चांगले कसे रहातील व आपले श्रम कसे वाचतील या खटपटीत घालवतात. अनेक संस्थाना भेटी दिल्यानंतर फक्त दोन की तीन संस्थात ओव्हरऑल सक्तीचा असल्याचे सापडले ! एका लोखंडी कारखान्यात शारीरिक श्रमाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी हमाली करणाऱ्या कामगारापासून तो पदवीधर तंत्रज्ञापर्यंत सर्वांना सारखेच ओव्हरऑल्स सक्तीचे करण्यात आलेले दिसते.

या राष्ट्रातून सुशिक्षित व अशिक्षित कामगारात सामाजिक दृष्ट्या फार फरक करण्यात येतो व त्यामुळे चांगला सुशिक्षित मुलगा निवडून त्याला दोनतीन वर्षे तान्त्रिक शिक्षण देऊन तयार केल्यास तो अशिक्षित कामगाराबरोबर काम करण्यात कमीपणा मानतो ! त्याला टेबलावर किंवा कचेरीत काम करण्याची महत्वाकांक्षा असते. म्हणून थोडे शिकलेली, कामगारात काम करणारी हुशार मुले निवडून त्याना शिक्षण देणे जास्त उपयुक्त ठरेल असे वाटते. परंतु अशा तऱ्हेची मुले समाजाच्या ज्या वर्गातून मिळू शकतील त्या वर्गाच्या दारिद्र्यामुळे शिक्षणास लागणारा वेळ त्याना मिळू शकत नाही. हलके सलके काम करून थोडेफार

पैसे मिळवून कुटुंबास पैशाची मदत करण्याची त्याना फार लहानपणापासून आवश्यकता असते.

मागील पिढीचा हा दृष्टिकोण परिस्थितीमुळे बदलत चालला आहे. कारागिरातील बुद्धिमान मुलांना तान्त्रिक शिक्षण देऊन त्यांचा उपयोग कारखान्यातून करून घेता येईल असे पुष्कळाना वाटू लागले आहे. त्यातील काहींना अशा तऱ्हेचे शिक्षण देऊन जबाबदारीची कामे त्यांचेवर सोपविण्यात येऊ लागली आहेत. हा बदल समाधानकारक असून कामगारांच्या भावनांची कदर करून त्याना कुशल कारागीर बनविण्यात फायदा आहे हे पण लक्षात येऊ लागले आहे.

चांगले शिक्षक तयार करण्याचा कार्यक्रम फारच महत्त्वाचा असून त्याचा परिणाम फार मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता आहे. एक चांगला शिक्षक अनेक तान्त्रिक कामगार निर्माण करू शकतो. कराची व खरगपूर येथील तन्त्रशिक्षणाच्या संस्था चांगल्या नावारूपास आलेल्या आहेत. परंतु येथेही कारखान्यात मिळणाऱ्या चांगल्या पगारामुळे चांगले शिक्षक टिकविणे जड जात आहे. माणसांची कमतरता, पत्रद्वारा शिक्षण, सिनेमा किंवा चित्रध्वनीचा उपयोग करून थोडीफार भरून काढता येईल असे वाटते,

(मिनर्व्हा. दिवाळी अंक १९६३)

सोविएट आर्थिक गुन्हे

सोविएट रशियात नुकतीच एक नवी संघटना निर्माण करण्यात आली असून तिचे कार्य सर्व सोव्हिएट नागरिकांचेवर पहारा करण्याचे आहे. या संघटनेचे काम व्यवस्थित सुरू झाले म्हणजे त्यात लक्षावधी माणसांचा समावेश होणार असून तिचे प्रतिनिधी कोण काय बोलते, कोण काय करते यावर जागता पहारा ठेवणार आहेत !

या संघटनेला यु. एस्. एस्. आर. च्या मंत्रीमंडळाची व कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ति कमिटीची, पक्ष व राज्य यांची, नियंत्रण कमिटी (Party state control committee of the communist party central committee and of the council of ministers of the USSR) असे लांबलचक नाव देण्यात आले आहे. थोड्याच दिवसात या कमिटीचे काम चालू होणार असून ते कारखाने, खाणी व शेते या प्रमाणेच प्रत्येक घरात, हॉस्पिटल्स मधून व शाळातून सुद्धा सुरू होणार आहे. या कमिटीचे मुख्य काम सरकारी अधिकारी, दुसऱ्याचे जिवावर मजा मारणारे, चोर, काळाबाजार करणारे, बनवाबनवी करून लाच देणारे व घेणारे या सर्वांवर पाळत ठेवून सोव्हिएट समाजाच्या शिक्षाकरण्याचे शक्तीबद्दल त्यांचेमध्ये दहशत बसविणे हे होय !

या संघटनेची जरूरी भासण्याचे मुख्य कारण म्हणजे सोव्हिएट समाजात अस्तित्वात असलेले 'आर्थिक गुन्हे' काबूत आणण्याची जरूरी हे होय. राज्याला बनवून स्वतः श्रीमंत होणारा एक मोठा वर्ग या समाजात आहे अशी ओरड वर्तमानपत्रातून चालू आहेच. हे लोक सरळ सरळ चोऱ्या करतात. पैशाची अफरातफर करतात, खोटे हिशोब ठेवतात, व दुसऱ्याही अनेक प्रकारे राज्यसरकारला लुबाडतात. सोविएट राष्ट्राची, म्हणजेच जनतेची, मालमत्ता म्हणजे या लोकांचा खेळ होऊन बसला आहे, असे सांगण्यात येते.

अशा तऱ्हेचे गुन्हे सोव्हिएट समाजात किती प्रमाणात घडतात हे कळणे कठीण आहे. कारण पाश्चात्य जगाला त्याबद्दल माहिती उपलब्ध नाही. परंतु त्यांचेकडे लक्ष वेधून त्यावर इतकी कडक उपाययोजना करण्याची जरूरी ज्या अर्थी निर्माण झाली आहे त्या अर्थी या गुन्ह्यांचे प्रमाण बरेच असले पाहिजे. तीन ते पांच टक्के राष्ट्रीय उत्पन्नाची यामुळे अफरातफर होत असावी असा अंदाज आहे. जी थोडीशी माहिती बाहेर आली आहे त्यावरून हे गुन्हे समाजाच्या सर्वच थरात होत आहेत असे दिसते. कम्युनिस्ट पक्षाचे मोठमोठे पुढारी सुद्धा सरकारी पैसे स्वतःसाठी वापरताना सांपडले आहेत.

हे गुन्हे नवीन नाहीत. परंतु स्टालिन नंतरचे काळात ते बरेच वाढले मात्र आहेत. या तऱ्हेच्या मोठ्या गुन्ह्यास मृत्यूची शिक्षा द्यावी असाही ठराव दोन वर्षांपूर्वी करण्यात आला होता. स्टालीनच्या मृत्यूनंतर गुप्तपोलिसांचे अधिकार व त्यांचे हातातील शिक्षा करण्याची साधने कमी करण्यात आली त्याचा हा अकल्पित परिणाम आहे असे वाटते. स्टालीनच्या कारकीर्दींत, विशेषतः शेवटच्या दहा वर्षात, राजकीय

गुन्ह्याबरोबरच अशा तऱ्हेच्या गुन्ह्यावर पाळत ठेवून त्यासंबंधी इत्थंभूत बातमी मिळविणे व त्यावर आळा घालणे ही कामे देशव्यापी गुप्तपोलीस खाते करीत असे. हे गुप्तपोलिसाचे जाळे कमी करण्यात आले असून पोलिसांची संख्याही कमी केल्यामुळे पकडले जाण्याची भीती कमी झाली आहे. अफरातफर, चोऱ्या किंवा इतर गुन्हे शोधून काढण्याचे काम गुप्तपोलिसांव्यतिरिक्त कम्युनिस्ट पक्षाची केंद्रे, अमेरिकेतील जनरल अकौंटिंग ऑफिसचे काम करणारे मंत्रिमंडळाचे राज्य निर्बंध खाते (Ministry of state control), अर्थमंत्र्यांचे खाते व सोव्हिएट बँका करीत असतात. सोव्हिएट नागरिकांना सुद्धा अशा तऱ्हेचे गुन्हे उघडकीस आणण्यास प्रोत्साहान देण्यात येते.

परंतु गुप्तपोलिस व त्यांचे हेर याशिवाय हे खाते फारसे कार्यक्षम राहिलेले दिसत नाही. याचे कारण सोव्हिएट समाजात सांपडते. स्थानिक अधिकारी आपला एक गट करून एकमेकाला संरक्षण देतात व मिळालेली लूट वाटून घेतात. एखाद्या कारखान्याचा प्रमुख अधिकारी आपल्या हाताखालच्या काही लोकांना विश्वासात घेऊन तयार होणारा काही माल खाजगी रीतीने विकतो. व ते पैसे सर्वजण वाटून घतात. स्थानिक पक्षप्रमुख व कायदा राबविणाऱ्या अधिकाऱ्याला त्यातील वाटा दिला म्हणज झाले. ही कृत्ये पूष्कळांना माहीत असतांत परंतु अधिकाऱ्यांचे भीतीने बहुतेक सर्व गप्प बसतात. एखादा दुसरा गाजावाजा करू लागला तर त्यास चुगलखोर ठरवून त्रास देतात किंवा वेळप्रसंगी कामावरून कमी करतात.

या पार्श्वभूमीवर ही नवी संघटना म्हणजे जुनीच यंत्रणा नव्या स्वरूपात अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न आहे. परंतु ही संघटणा सार्वजनिक असून तिच्या कामाची रूपरेखा आखून दिलेली आहे. या पद्धतीत कोणीही नागरिकाने तक्रार केल्यास त्याची चौकशी होईल. अधिकाऱ्यांना एकमकास संरक्षण देता येऊ नये म्हणून निरनिराळया क्षेत्रातील लोकांची यात नियुक्ति केलेली आहे. शिवाय या संघटनेच्या स्थानिक कमिटीला वह्या तपासणे, साक्षी देणे, शिक्षा करणे, नोकरीत खालच्या जागेवर ढकलणे किंवा नोकरीवरून काढून टाकणे वगैरे अधिकार दिलेले आहेत या कमिटीकडे होणारा पुरावा न्यायालाकडे पाठविण्याचापण कमिटीला अधिकार आहे.

या संस्थेचे प्रमुख अलेक्झांडर शेल्विन असून ते कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी आहेत. ते रशियन राज्यकर्त्यांच्या प्रभावळीतील एक उगवते पुढारी असून त्यांचे नेमणुकीमुळे या संघटनेची प्रतिष्ठा फार मोठी आहे हे सिद्ध झाले आहे. सर्व स्थानिक कमिट्यांनी जोराचा प्रचार करून कायदे मोडणाऱ्या गुन्हेगारांना शोधून काढून शिक्षा कराव्यात असा त्यांना आदेश देण्यात आलेला आहे.

या कमिट्यांचे कामात अनेक अडचणी येण्याची शक्यता आहे. पहिली अडचण म्हणजे सत्तास्पर्धेच्या राजकारणात व वरची अधिकाराची जागा पटकावण्यात प्रतिस्पर्धी असलेल्या व्यक्तीच्या वैयक्तिक वागणुकीवर शिंतोडे उडवून त्याला नामोहरण करण्याची पद्धति सोव्हिएट रशियात पूर्वापार चालत आली आहे. त्यामुळे कमिटीपुढे येणाऱ्या सर्वच तक्रारी खऱ्या व योग्य असतीलच अशी खात्री देता येत नाही. खोट्याबरोबर खरेही भरडले जाण्याची शक्यता पुष्कळच आहे. त्यामुळे खरे खोटे सर्वच आरोप सार्वजनिक चव्हाट्यावर येऊन त्यातून गोंधळ व गैरसमज पसरण्याची शक्यता वाढेल. दुसरे म्हणजे एकमेकास संरक्षण देणारे अधिकाऱ्यांचे गट सर्वत्र अस्तित्वात आलेले आहेत. सत्ता थोड्यांचे हातात केंद्रित झालेली आहे. अशा परिस्थितीत महत्त्वाची माणसे गुन्ह्यामध्ये गोवली गेल्यास त्यांचेबद्दल तक्रार करण्यास धजणारास अचाट धैर्याची गरज लागेल.

परंतु सर्वसाधारण विचार करता या संघटनेमुळे रशियात उघड उघड चालू असलेल्या लाचलुचपतीस आळा बसून सामाजिक जीवन सुधारण्यास मदत होईल. सोव्हिएट सरकार व मुख्य प्रधान क्रुश्चेव्ह यांची ही संघटना कार्यक्षम होऊन सामाजिक जीवनातील खोटेपणा कमी व्हावा अशी मनापासून इच्छा आहे. परंतु या संघटनेसाठी द्यावी लागणारी किंमत वाजवी आहे काय हाही एक प्रश्नच आहे. लक्षावधी लोकांना आर्थिक पोलीस बनवून त्यांचा वेळ व त्यांची शक्ति या कामात दवडल्यामुळे उत्पादनावर परिणाम

होणार नाही का ? यात खोटे आरोप करून अनेकांची नावे बद्दू करण्यास पुष्कळ वाव आहे. त्यामुळे अधिकारी संशयाच्या पलीकडे रहाण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे कामाचा उरक कमी होईल व उत्पादनात घट होईल. हे सर्व दोष लक्षात येऊनही मुख्य प्रधान क्रुश्चेव्ह यांना आर्थिक व्यवहार सुधारण्यास अशा तऱ्हेची संघटना अवश्य आहे अशी खात्री पटलेली आहे असे दिसते. ही गोष्ट तेथील परिस्थितीची कल्पना येण्याच्या दृष्टीने महत्त्वाची होय.

('न्यू लीडर'च्या १९ फेब्रुवारी अंकावरून)

रशियाबद्दलच्या कंड्या-

इटलीतून येणाऱ्या बातम्यावरून मॉस्कोमध्ये लवकरच आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार असून क्रुश्चेवचे नेतृत्व धोक्यात असल्याबद्दल शंका उत्पन्न होऊ लागली आहे. यातील अतिरंजित बातम्यावरून पक्षाचे सेक्रेटरीपद व मुख्य प्रधानकी या दोन्ही महत्त्वाच्या जागा त्याने एकट्याने सांभाळण्यास विरोध असलेल्या गटाचे पक्षात बहुमत झाले आहे असे वाटते. तथापि हे जर खरे असते तर काळ्या समुद्रावर क्रुश्चेव्ह सुट्टीसाठी गेला असता असे वाटत नाही. आपल्या मताचे व आपल्याला पाहिजे असलेले लोक पक्षाच्या मध्यवर्ती समितीत समाविष्ट करण्यास त्याला अनेक वर्षांचा अवधी मिळाला व त्याचा त्याने प्रयोगही करून घेतला आहे. याखेरीज दुसरेही लहान सहान आरोप क्रुश्चेव्हचे विरुद्ध ल्युनिटा (L'unita) च्या मॉस्कोतील प्रतिनिधीने केले आहेत. त्यावरून क्रुश्चेव्हच्या धोरणाबद्दल मॉस्कोत मतभेद आहेत एवढे मात्र सिद्ध होते. आणि अशा तऱ्हेचे मतभेद अस्तित्वात असले तर त्याबद्दल क्रुश्चेव्हला जाब विचारला जाण्याची शक्यता पुष्कळच आहे.

अंतर्गत प्रश्नाबाबत परिस्थिती फारशी बिकट नाही. उद्योगधंद्याची प्रगति समाधानकारक होत आहे. शेती मध्ये मात्र सुधारणा होत असली तरी परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. लहान व मोठ्या शहरांच्या गरजा भागत नसल्यामुळे सामुदायिक शेतीवरील निर्बंध उगीच सैल केले असे कट्टर विचारसरणीचे लोकांना वाटत आहे व काही नवे निर्बंध घालण्यास सुरुवातही झाली आहे. उद्योगधंदे व कारखाने यांचेमध्ये सुरू केलेल्या सत्ताविकेन्द्रिकरणाच्या धोरणास मुरड घालावी लागत आहे. परन्तु लेखक व कलावन्त याचे स्वातंत्र्यावर घालण्यात आलेल्या निर्बंधामुळे सर्वात जास्त नाचक्की झालेली आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात पण अशाच तऱ्हेचे नागमोडी धोरण स्वीकारलेले दृष्टीस पडते. क्यूबातील साहस अजूनही लोकाना बोचत आहे. परंतु आणीबाणी उत्पन्न होणार ती चीनच्या प्रश्नावर. कारण मॉस्कोतील क्रुश्चेवच्या अगदी सौम्य टीकाकारांना सुद्धा आपल्या पुढाऱ्याला पेकिंगच्या मार्क्सिस्ट 'साधू'शी झालेल्या चकमकीत वैचारिक तरवार बरोबर चालविता आली नाही याबद्दल खेद वाटला या बद्दल शंका नाही.

यातून एकच निष्कर्ष निघतो. तो म्हणजे पराजय झाला तो आशयाचा नसून पद्धतीचा झाला व अपयश आले ते सुद्धा संधिसाधू माणसाला ! कट्टर कम्युनिस्टांचे कानात चिन्यांनी केलेला (क्यूबाबाबत) साहसीपणाचा आरोप अजूनही घुमत आहे व त्यामुळे ते असेही म्हणतात की ही वागणूक जागतिक कम्युनिस्ट नेत्याची नसून रशियन पुढाऱ्याची होती.

चीन व रशिया यांचे वादात क्रुश्चेव्हची होणारी दैन्यावस्था पहाण्याचा मोह अनावर असला तरी तो गैरवाजवी असण्याचा पुष्कळच संभव आहे. क्रुश्चेव्हला आपल्या देशात भरपूर पाठिंबा आहे व त्याचे पाठीराखे पेकिंगच्या धक्क्यांना दाद देणार नाहीत. क्रुश्चेव्हबद्दल सर्वसाधारण रशियन माणसाच्या भावना चांगल्या असून त्यावर पक्षाच्या सत्तायंत्रणेचा फारसा परिणाम होणार नाही. रशियन समाज हा कम्युनिस्ट क्रांतीसाठी मोठ्या धैर्यवान नेत्यांचे मागे जाणारा समाज आता राहिलेला नाही. क्रुश्चेव्हच्या धोरणामुळे बसणारे धक्के सुद्धा कमी होऊन समाजाची सतत प्रगति व्हावी एवढीच त्याची इच्छा आहे, रशियात क्रुश्चेव्हला पाखंडी म्हणणारे किंवा अस्सल कम्युनिस्ट चाकोरीत बसणारे किती लोक आहेत ? फारच थोडे, जवळजवळ नाहीतच. क्रुश्चेव्ह हा रशियन जनतेच्या स्वभावाशी व महत्त्वाकांक्षेशी जुळणारा व्यवहारकुशल माणूस आहे. त्यामुळे त्याचे हातून फारच मोठ्या घोड चुका झाल्या खेरीज चीनच्या वैचारिक ध्येयवादाच्या नव्या उन्मादाच्या पसंतीचा एखादा नेता त्याला बाजूला सारू शकेल असे वाटत नाही.

(लंडन टाइम्स, वीकली रिव्ह्यू, ११ एप्रिल १९६३)

अनुक्रमणिका


त्यांचे स्वप्न
साकार व्हावे म्हणून...
हा तरुण मुलगा भारताच्या स्वप्नांचें प्रतीक आहे. तो अध्ययन व परिश्रम करण्यास अतिशय उत्सुक आहे. त्यामुळें तो राष्ट्रीय पुनर्रचनेच्या कार्यांत सक्रीय भाग घेऊं शकतो. त्याचे आईवडिल सूज्ञ आहेत. आपल्या मुलाचे स्वप्न साकार व्हावे म्हणून त्यांनीं अल्प बचत योजनेंत रक्कम गुंतविली आहे.
अल्प बचत योजनेंत
रक्कम गुंतवा
तपशीलवार माहितीसाठीं लिहा :-
उपसंचालक, अल्प बचत योजना बृहन्मुंबई, सचिवालय, मुंबई.
जिल्ह्याच्या ठिकाणांसाठी कलेक्टर
तालुक्याच्या ठिकाणांसाठी मामलतदार/महालकरी.
प्रकाशन संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई